कवितेच्या गावा

धर्मकिर्तीचा …

… पाहिलेला महाराष्ट्र

माझ्या (अनोळखी) मैत्रिणी

विचार वेडे आणि वाकडे

एडिटर्स पीक

मॅन + वुमन = डामा

शोधुया नव्या वाटा

आम्ही बोलतोय

कथा

तरुणाई

सिने अँगल

एक पानी

वर्ष १
अंक : पहिला
जानेवारी २०१२

अतिथी संपादक – ज्ञानेश्वर मुळे

- अतिथी संपादक
  **ज्ञानेश्वर मुळे**
- संपादक
  **विनायक पाचलग**
- सहा. संपादक
  **सोनाली नवांगुळ, प्रसाद**
- डिझाईन
  **भक्ती पेठकर**
- अंक सजावट व मांडणी :
  **विद्याधर गोंधळी**
- वेब निर्मिती
  **दीपक शिंदे**
- मार्केटींग
  **अंकित राठी**
- मार्गदर्शन व व्यवस्थापन
  **कुलभुषण बिरनाळे**



- अंकात व्यक्त झालेली मते त्या त्या लेखकांची आहेत. त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

(अंक फक्त खासगी वितरणासाठी)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** : ज्ञानेश्वर मुळे

**कवितेच्या गावा** : आश्लेषा महाजन

**धर्मकिर्तीचा कॉलम** : धर्मकिर्ती सुमंत

**न पाहिलेला महाराष्ट्र** : कमलेश देवरुखकर

**माझ्या (अनोळखी) मैत्रिणी** : राजीव तांबे

**एडिटर्स पीक** : संजय आवटे

**विचार वेडे आणि वाकडे** : अवधूत परळकर

**कथा** : अखिलेश परब

**शोधुया नव्या वाटा** : लीना मेहेंदळे

**१० X ५०** : पंकज कोपर्डे

**सिने अँगल** : श्रीनिवास नार्वेकर

**आम्ही बोलतोय** : सोनाली नवांगुळ

**एक पानी** : नीलिमा देशपांडे

**मॅन + वुमन = ड्रामा** : विद्यासागर अध्यापक

**तरुणाई** : लक्ष्मीकांत देशमुख

**शब्द शलाका** : विक्रांत - पंकज

# आहे म्हणू स्वप्न एक!



ज्ञानेश्वर मुळे

**नमस्कार!**

या क्षणी नव्या प्रवासाच्या सुरवातीला होते तशी मनःस्थिती आहे. एका बाजूला थ्रिल ! दुसरीकडे मंदसा संभ्रम ! पण हा काही 'एकला चलो'चा प्रयोग नाही. इथे रंगीबेरंगी रस्ते आणि त्याहीपेक्षा कलंदर असे सहप्रवासी आहेत. मालदीवमध्ये अथांग हिंद महासागरात रात्रीचा समुद्रप्रवास करताना एक आदिम अशी भीती काळजावर दाटते. अशावेळी सहप्रवाशांकडे पाहिलं की मनोबल तर वाढतंच पण, त्या गूढ अंधारातील रोमान्सची मजा लुटता येते. असंच काहीसं वाटतंय या क्षणी. 'शुभाऽस्ते पंथानः सन्तु' असं या मासिक जहाजातील सहप्रवाशांसकट स्वतःला 'विश' करायला काय हरकत आहे?

ही एका नव्या संवादाचीही सुरूवात आहे. माणसामाणसांमधला संवाद तुटण्याच्या आजच्या जमान्यात कोणत्याही नव्या संवादाचे स्वागत केले पाहिजे. इथं अनेक प्रथितयश बोलतील, नवोदित सांगतील, मुरब्बी लोक कुजबुजतील, जाणकार मार्ग दाखवतील, कुणी डिवचेल, कुणी चिमटा काढेल, कुणी शर्ट ओढेल, कुणी थाप मारेल, कुणी लाथही मारेल, पण 'ऑल इन द स्पिरीट ऑफ द गेम' हा मंच माणसामाणसांमधला, समाजासमाजांमधला, समुहासमुहांमधला सुसंवाद वाढावा यासाठी आहे; विसंवादासाठी नाही.'सहवीर्य करवा वहे' अशा उंचीला नेण्याचे ध्येय आहे पण वेडा अट्टाहास नाही! उडण्याची इच्छा असणाऱ्यांना पंख देण्यासाठीचा प्रांजळ प्रयत्न आहे पण, त्यासाठी विमा नाही.

हा सहप्रवास आणि संवाद आनंदासाठी आहे. सशक्त, निर्भेळ, भविष्योन्मुख, सकारात्मक असा आनंद. इथं व्यथा, दुःख, निराशा, आपदा, विनाश यांच्या अभिव्यक्तीला स्थान आहे पण, त्याचं उदात्तीकरण करण्यासाठी नव्हे. या सहप्रवास आणि संवादाच्या सगळ्या प्रेरणा आणि उर्मी सुखद आणि चैतन्यवर्धक आहेत. उन्मेष, उत्साह, सक्रियता, पुढाकार, नावीन्य, नेतृत्व, प्रकाश, झेप, उड्डाण, प्रयोगशीलता, सहभाग, सहकार्य, स्नेह व प्रेम इत्यादी शब्द या प्रक्रियेतील परवलीचे शब्द आहेत. जगण्यातला निखळ आनंद वृद्धिंगत व्हावा अशी अपेक्षा मनोमन आहे.

या निमित्ताने अंतर्जालाच्या 'निःस्वार्थ आणि विपुल' अशा प्रदेशात आम्ही पाऊल टाकतोय, विश्वव्यापी अशा या जाळ्यात सर्जनशील माणसाचा आणि त्याच्या शब्दांचा प्रवेश ही एका नव्या उत्सवाची नांदी आहे. आमचे शब्दप्रभू जीवनाच्या विविध अंगांचं प्रतिनिधित्व करीत आत्मशोध आणि जीवनवेध घेत समोर येतील. माणसाचं आणि जीवनाचं अंतरंग-बहिरंग सगळंच ते इथं मांडतील. प्रशासक, लेखक, शास्त्रज्ञ, राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ, माहिती तंत्रज्ञ, खरं तर 'जो जे वांछिल' त्याचं स्वागत आहे. युवावर्ग आणि स्त्रिया यांच्या सहभागावरही आमची भिस्त आहे. लेखक म्हणून, वाचक म्हणून, इंटरनेटविषयी वाटणारी भीती, संकोच, गोंधळ सगळ्यांवर मात करू शकणारी ही शब्दयात्रा असेल. काही तरी नवे देणारी... विशेषतः तरुणाईला!

या नव्या प्रवासाची मुख्य किनार नवनिर्मितीची अदम्य इच्छा आहे. काहीतरी नवीन चांगलं, भिडणारं इथं यावं असा प्रयत्न राहील. त्यासाठी कधी प्रस्थापित समजुती, विचार, रुढी, कार्यपद्धती यांचं बेदर्दी विच्छेदनही होईल, पण त्यातही काही शिदोरी असेल. पुढे जाण्यासाठी धर्मकीर्ती सुमन्त, लीना मेहेंदळे, संजय आवटे, अवधूत परळकर, सागर अध्यापक आणि राजीव तांबे हे महत्त्वाचे सहप्रवासी आहेत. पण वाचकहो हे जहाज तुमच्या मालकीचे आहे. विनायक पाचलग मुख्य कप्तान आहे आणि खलाशांचा कार्यक्षम चमूही आहे.

चला तर ! आता कसली दिरंगाई? एकमेकांचे हात धरू.... शिडे उभारू...अनंत अमुची ध्येयासक्ती...किनारा 'नसे' पामराला!

पुनर्दर्शनायच ! नमस्कार!

**ज्ञानेश्वर मुळे**
dmulay@ hotmail.com



आश्लेषा महाजन

कवितेचे गाव ..कधी अलगद फुलणारे, कधी खो खो हसवणारे ,तर कधी अंतर्मुख करणारे ....दरवेळचा कवी कदाचित वेगळा ,कविताही ...पण अनुभव मात्र तोच .. मन समृद्ध करणारा ...

# उत्तर

तू काढलेलं चित्र नि चित्र काढणारी तू ....
असे दोन्हीही पाहतोय मी
तुझ्या चित्रातले ओथंबलेले मेघ
थेट तुझ्या ओठांसारखे ...!
आणि इंद्रधनुष्य अगदी स्वप्नील डोळ्यांसारखे ...
चित्रातील प्रत्येक रंगरेषेत
तू किती झिरपून आलीयस...!

तिकडे कोपऱ्यात
दूर तुफानातून होडी वल्हवनारी
नुसती काळी सावली आहे-पुरुषाची ...
ती सावली कुणाची?
माझा सूचक प्रश्न.
शांतपणे स्मित करत तू म्हणालीस -
ङ्कलेतल्या प्रत्येक बाबीला
वास्तवातलं प्रतिरूप द्यायलाच हवं का?
अमूर्त सौंदर्याला शब्दांमध्ये कोन्दायालाच हवं का?
हे खर की,
कलेमध्ये आपलं जीवनच उतरून येतं...!
पण काही निगूढ गोष्टी
धूसर प्रतीकांतच शोभून दिसतात,नाही का?

तुझ्या ह्या प्रश्नाचं उत्तर
शोधतोय मी
अंतर्मुख होऊन
चित्रापल्याडच्या
विराट अनाकलनीय जगण्यातून
रंगांतून
रेषांतून
बिंदूतून ....!

# श्वास नवा ...भास नवा ...

श्वास नवा ...भास नवा ....
जगण्याचा हा ध्यास नवा ....
काळ धावतो
भाळ रेखितो
हवाहवासा फास नवा ...
खेळ मांडिते
दैव भांडते
तरी फुले मधुमास नवा ...
जगणे सुंदर
आणि शुभंकर
आसोशीचा ग्रास नवा ....
सत्य शिवाची
सुंदर गाथा
जगण्याचा हा रास नवा ....

# (न) निर्मितीप्रक्रिया..



धर्मकिर्ती सुमंत

'घराखालून टीम अण्णांची रॅली जात असताना तो त्याच्या थरथरत्या हाताने गर्लफ्रेंडचा जीमेल अकाऊंट चेक करत होता.'

हे असं काहीतरी लेखाचं पहिलं वाक्य असावं. तरूणांची निष्क्रियता, अॅपॅथी वगैरे लेखकाला लिहायचंय असं वाटू दे .. फालतू लोकं ..

किंवा हयाच लेखांच पहिलं वाक्य हे ही असू शकतं..

सकाळी उठल्यावर डोक्याच्या मध्यभागामध्ये. डोळयांच्या पापण्या डोळयांचा खालचा भाग जड जड जाणवतोय.'

झालं का हयाचं सुरू.. मंदपणा निष्क्रीयता.. आता हे पुढे ट्रॅफिकमध्ये झोपलेल्या मुलाच्या स्वप्नामध्ये जाणार असं वाटणार लोकांना.. बथ्थड साले..

ही सुरूवात चांगली झालीये. दोन सुरूवाती. लोकांना हाड केलं की जान येते आणि जरा. किती का इररॅशनल असेना.

A Lot of people think. that I worship the devil.
that I do all types of .. retarded shit
Look, I cant change the way I think
And I cant change the way I am
But if I offended you? Good
Cause I still dont give a fuck.

हया काही ओळी पण चांगल्यायत सुरूवात म्हणून. एनिनेमच्या आहेत.

किंवा माईक ली च्या फिल्म मधला एक सीन आहे. ऐंशी वर्षाच्या एक म्हाताऱ्या बाई दाराचं लॅच लावून चावी आतच विसरतात आणि त्यांच्या शेजारच्या मध्यमयीन बाई त्यांना अंगणाबाहेर उभं करून, 'काय? कुठून आलात?' चावी कुठेय? विसरलात ? का? मग दुसरी कोणाकडे आहे? मग त्यांच्या तुमचयाकडे नंबर आहे का? माझ्याकडे डिरेक्टरी आहे. त्यांच नाव सांगता का मीच शोधते. जरा मोठयांनी बोला.. असं म्हणत विचारत राहातात. शेवटी त्या म्हाताऱ्या आज्जीच 'जरा आत येऊन बसलं तर चालेल का' असं विचारतात. 'या आता काय..' असं एक म्हणतात आणि म्हाताऱ्या बाईच्या मुलीचा फोन डिरेक्टरीत मिळवून त्यांच्या मुलीला लावलात, त्यांची मुलगी जोरजोरात व्यायाम करत असते. 'आता आपला व्यायाम अर्धवट त्यात आई अशी बाहेर अडकलेली - मला घाम आलेला.. कसं करू आता..' असं म्हणत नवऱ्याला 'कार पाठव' असे म्हणते. नवरा म्हणतो की आत्ता कार मला लागतीये. त्यावर टेन्शन येऊन.. 'काय करू.. काय करू..' या मनस्थितीत व्यायाम घालण्याच्याच ट्रकसुटमध्ये बेडवर पडते. तिला वाटतं की शवासन केलं तर शांत वाटेल..असं करत ती झोपून जाते.

आज्जी आपल्या शेजारच्या मध्यमवयीन बाईंच्या पॅसेजमध्ये तश्याच उभ्या राहतात.

हा सीनही चांगलाय सुरूवात करायला..

खरतर सांगायचा मुद्दा एकच आहे माझ्याकडे.. निर्मितीप्रक्रियेविषयी आणि तो आधी सांगूनही झालाय. तो मुददा असा. 'माझा जन्म ८८ साली एका मध्यमवर्गीय लोकशाही समाजवादी, गांधी, फुले, आंबेडकर, मार्क्सवादी कुटुंबात झाला, त्यावेळी भारतात ग्लोबलायझेश स्वीकारण्याचे आणि आर्थिक उदारीकरण होण्याचे वारे वाहत होते. स्वातंत्र्यानंतर आणि त्यानंतर आणिबाणी भाजपच्या, कॉंग्रेसच्या राजकीय भूमिकांमध्ये झालेली तफावत वगैरे लक्षात घेता खरंतर लोकशाही धर्मनिरपेक्षता, समाजवाद, या भूमिका, मुल्यं स्वीकारणारी माणसं

मला आजही महत्वाची वाटतात. अशा अर्थांनी ‘बाहय मी’ हा एक आदर्शवादाच्या वातावरणात वाढत होतो.’

माझ्या ‘आतला मी’ मात्र सुरूवातीपासूनच कार्टून नेटवर्क नंतर स्टार स्पोर्टस्, ईएसपीएन, त्यानंतर एम टीव्ही, व्ही टीव्ही, त्यानंतर एफ टीव्ही, सायमलटेनियसली कॉम्प्युटर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांनी भारावून गेलेलो होतो आणि तो माझ्यावरचा परिणाम आजही कायम आहे.

काळाचा आणि ओघाने माझ्या नाटकांचा विचार करताना मला, एकाचवेळी बहात्तर/शंभर किंवा चारशे चॅनेल्स चालू असताना रिॲलिटी च्या डायमेन्शन्स कशा बदलतात  हे बघावं लागेल.  एकाचवेळी चारशे व्हर्च्युअल जगं एकाच ठोकळयामध्ये चालू असतात.  त्यातलं, 'आवडतं''हवं ते', 'हवं तसं' तुम्हाला निवडता येत असतं त्यामुळे सोय प्रमाणाबाहेर वाढलेली असते.  टिव्हीतलं जग इतकं हवं असलेलं जग इतकं हवं असलेलं निवडता आल्याने बाहेरच्या 'खऱ्या' (आता माझ्यासाठी दोन्ही विश्व तितकीच खरी होती पण तरीही..) जगाशी संबंध प्रस्थापित करत असताना माझ्या आतल्या मी आणि बाहेरच्या मी सांधे असलेली प्रचंड तफावत मला सतत जाणवायची.

टीव्हीवरचं जग हे सर्वार्थानं परिपूर्ण होतं. त्यातले रंग नट, नटयांचे सुबकच असलेले चेहरे सोबत होणारा म्युझिकचा वापर, कॅमेरांची ट्रीटमेंट, एडिटस् आणि कटस् मधून साधला जाणारा परिणाम, हा घरातली, शाळेतली मूल्य कितीही महत्वाची असली तरी त्यांच्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त होता.

माझ्या आठवी नववीत मला पॉर्नची ओळख झाली.  त्यासाठी कुठे जाऊन काही चोरून आणून पहावं लागत नव्हतं तर जे काय होतं ते घरीच, इंटरनेटवर बघायला मिळत होतं.  स्त्रीच्या शरीराची माझी झालेली ओळख, ही इंटरनेटच्या पॉर्नसाईटस्मार्फतच झालेली होती. त्यामुळे सिनेमातल्या नटया, प्रेम, नातेसंबंधातला रोमॅंटिसिझम मरून त्यामध्ये एका प्रकारचा कडवा रूक्षपणा आला.

एकाबाजूला 'जगण्याचा वेग, करावयाची इच्छा असलेल्या व व्यवस्थेच्या अटी पूर्ण करण्यासाठी गरजेच्या असलेल्या गोष्टी' आणि 'नैतिकता' दोन्हीचा ताळेबंद एका मुल्यव्यवस्थेत बसवण्याच्या फंदात न पडता मी जगणं पुढे पुढे रेटत गेलो.  आता विचार करताही हेच लक्षात येतं की ही सर्व माध्यम फॅसिस्ट होती.  त्यांनी सुरूवातीला मला हवं तसं इतकं सगळं दिल की मी त्यांच्या आधीन झालो, पण आधीन होत असताना, माझ्या लक्षात येत होत की मी त्या एका विश्वातला राजा होत होतो.  तिथे मला हवं तसं मी घडवून आणत होतो, गाजवत होतो, तिथे दुसऱ्यांची मध्यस्थी चालणार नव्हती आणि त्यामुळे मी अशा अर्थाने, लोकशाहीला पूर्ण तडा देत होतो.

मला वाटतं आज माझ्या वयाचा प्रत्येकजण त्याच्या त्याच्या व्हर्च्युअल जगाचा राजा आहे असे प्रत्येक जगाचे अनेक राजे एकाचवेळी प्रत्येक माणसामध्ये जगत आहेत.  आणि हेच माझ्यामते फॅसिझमचं व्हर्जन आहे.

व्हर्च्युअल जगांमध्ये आपले राजे असलेले आपण, जेंव्हा खऱ्या आयुष्यात माणसाशी संवाद, स्पर्श हयापैकी कुठलाही व्यवहार करता असतो, तेंव्हा त्या व्यवहाराची परिमितीच बदलून उलटी पालटी झालेली असते. अनेकदा व्हर्च्युअल-रिअल गोष्टी की एक्झिस्ट होतात/होण शक्य असतं.

आता काही वेळापुरतं आपण अस इमॅजिन करू की आता मी हे बोलत असताना बाजूला 'रेस' हया सिनेमातलं 'टच मी .. किस मी..' हे गाण शेजारी प्रोजेक्टरवर स्क्रिन होत आहे, त्यावेळी त्याच गाण्याची ब्लू टूथ वरून देवाणघेवाण चालू आहे.  त्याचवेळी, आपल्याला हव्या त्या लोकांशी आपण संवाद करू शकतो आहोत, त्याचवेळी आपल्या मेल्स आपण चेक करू शकतो, त्याचवेळी आपल्या ऑर्कुट फेसबुकवरच्या आयडेंटीटीज

अलाईव्ह आहेत. त्याचवेळी आपण वाट्टेल ती ऑनलाईन खरेदी करू शकतो. हया इतक्या सगळया गोष्टीमध्ये आपण किती होतो हे पहायचे झाले तर एकाचवेळी सगळयात आहोत आणि त्याचवेळी कशातच नाही. आपण तयार केलेली ही सिच्युएशन काही अर्थाअर्थी घडायचं कारण नाही, ती आत्ताही आपल्या वैयक्तिक जगांमध्ये अस्तित्वात आहेच. त्यामुळे लिखाणातल्या माझ्या प्रभावांबद्दल बोलायचं झालं तर मी काय बोलणारं, अनेक लेखक आहेत अनक फिल्म्स आहेत. लोकांचे मी वाचलेलं आहे पण हया अश्याचं अवस्थेत मला हे लोक काय म्हणतात हे 'माहीत आहे' असं म्हणता येईल. पण त्याचं माझ्यावर काही 'होईल' असं काही मला वाटत नाही. माझ्या घरातून कामाच्या ठिकाणी जाताना मला जे एक लाख एकापेक्षा एक धड आणि सक्ती करणारे अनुभव येतात त्यांच्याच प्रवाहात मी आहे ते सगळे मिळून जे बनत ंतो मी आहे ते माझं लिखाण आहे असं म्हणावं लागेल.

हयाच माध्यमांची अजून एक गंमत म्हणजे ती आपल्याला आपल्या स्वत:च्या, घराच्या शहराच्या बाहेर येउच देत नाहीत. जळगाव येथे पाणीप्रश्न आहे ते बगदाद मध्ये काय चालूए हयाची सर्व माहिती मला सर्व फिल्म, विकिपेडिया, न्युज चॅनेल्स, डॉक्युमेंटरी अशा माध्यमा मधून हव्या त्या फाँटमधून मिळते. त्यामुळे मला घर, शहर सोडावसं वाटतच नाही, त्यामुळे आज एका एकवीस वर्षाच्या शेतकऱ्याला मुलाला काय वाटत असेल, एका गरीब मुलाला काय वाटत असेल, बसऱ्याला स्थायीक असलेल्या मुलीच्या काय व्यथा असतील हयाबद्दल पूर्ण माहिती असूनही त्यांच्या दृष्टीकोनातून माझे प्रश्न जी नलीफाय होण्याची/त्याला नवीन आयाम देण्याची जी शक्यता असते ती मरण पावते. मग हयावर 'उठा, करा, पहा'... असं म्हणत येईल पण ते हया सर्व बॅगेजमध्ये करण आज मला अवघड जातयं. आणि शेवटी होतं असं की माझ्यापर्यंतचे सर्व अनुभव एकारलेले रहातात, एकांगी होतात. आपल्या मर्यादांना कारण देत बसतात.माझ्या लिखाणातून हा कारण देण्याचा भाग घालवून टाकावा असं मला वाटतं. त्यासाठी त्या लिखाणाला अनपेक्षितपणे धक्का देऊन सत्याच्या दरीत ढकलून द्यावं लागेल हयाची मला कल्पना आहे.

असा तो मुद्दा.. आता हेही माझं लिखाण जस्टिफाय करणच आहे एका अर्थानी ..

बंडल .. सगळंच बंडल..

पझेसिवनेस मधून ब्रेकअप होण, आणि अण्णांचं आंदोलन यशस्वी होणं हे दोन्ही एकच आहेत. माझ्या वाढीमध्ये झालेली गडबड जर मुळापासून अभ्यासली तरच भ्रष्टाचाराचा नीट विचार होऊ शकतो.

हया लेखातून काय म्हिालं.. काय मिळालं.. काय मिळालं.. तुला तिला त्याला.. बुलशिट..

हया वरच्या मुद्दयावर कथा होउ शकते. पण कथा हया फॉर्ममध्ये जो वेळ आणि जी एनर्जी जो तेवढी घालवायची इच्छा होत नाहीय माझी.

खूप जाड झालं तर व्यायाम करायचा खूप .

कंटाळा येतो.

काहीच नाही करावसं वाटत.

मग मरावसं का वाटत नाही??

जगण्यासाठी सतत क्रिएटीव्ह असायला लागतं.. हे कोणी ठरवलं?

मला हा लेख पण नाही लिहायचाय..

मला काहीच नाही करायचयं..

काहीच नसलेलं काही कसं असतं??

मला नुसतं बसून रहायचयं..

मी नुसता बसून रहाणार कारण सगळं जगही तसच आहे..

बसून राहिलेल..

मला काहीच कश्याबद्दल म्हणायचं नाहीये..

मला काहीच कश्याबद्दल म्हणायचं नाहीये..

हयालाच निर्मिती म्हणता येईल का?

निर्मिती करायचं थांबवायचं म्हणजेच निर्मिती होते.

असं मी म्हटंल तरं

काहीच नसण्याबद्दल लिहिलं तर??

असंच लिहित राहिलं तर कोण छापेल..

जे वाटतं ते लिहायचं.. लोकापर्यंत जाणे लोकांना कळणे हा पुढचा मुद्दा झाला.

बर लिहिलेले सगळे शब्द आळया आहत.  माझ्या गुटखा खाऊन सोलवटलेल्या तोंडातून पडणाऱ्या..

सगळंच कसं छान असेल?? दरवेळी..

मला एवढच वाटतयं..

# न पाहिलेला महाराष्ट्र



कमलेश देवरुखकर

**एका कार्यक्रमासाठी महाराष्ट्र फिरताना कमलेश वेगवेगळे अनुभव घेतोच ..त्यातलाच एका वेगळ्या अनुभवानंतर त्याने फेसबुक वर लिहिलेली एक नोट ...एखाद्या घटनेनंतरचे हे साधेसे कथन बरेच काही सांगुन मात्र जाते.**

**...शिक्षण ते कला ...एका पानाचीच छोटीशी ही ई भेट ..**

यमगरवाडीच्या त्या गेस्टहाऊसवर उमाकांत मिटकर मला भटक्या विमुक्तांच्या एकेका जाती-जमातीविषयी सांगत होते आणि मी मघासचा आयुष्यात पहिल्यांदाच पाहिलेला मुठभर लांबीचा आणि तितक्याच जाडीचा काळा किटक आठवत आठवत मिटकर कधी जाणार, कधी जाणार याची वाट पाहत होतो. परभणीला स्वप्नभूमीवरून उस्मानाबाद आणि तिथून तुळजापूरच्या यमगरवाडीत आलो होतो ते गिरीश प्रभुणे, दादा इदाते आणि इतर कार्यकर्त्यांनी सुरू केलेली भटक्या विमुक्तांसाठी आणि विशेषतः पारध्यांसाठी सुरू केलेली आश्रमशाळा पाहण्यासाठी. आदल्या रात्री जागरण घडलेलं पण मिटकर सांगत असलेले पारधी हत्याकांडाचे किस्से पापणी मिटू देत नव्हते. यमगरवाडीचा तो अडतीस एकरचा माळरानाचा परिसर. मिट्ट काळोख. आणि त्यात आमच्या या असल्या चर्चा. पारध्यांमधल्या जाती, गायपारधी, फासेपारधी, लक्ष्मीपारधी वगैरे वगैरे. त्यांच्यातली आडनावं वगैरे वगैरे.

"गायपारधी अतिशय भयानक. वेळ आली तर कितीही क्रूर होतात. गोरे गोरे असतात. क्वचित लालसर चेहरा. डोळे पिंगट असतात त्यांचे" इति मिटकर.

मी मनातल्या मनात,"च्यायला सगळ्यांचेच डोळे कसे काय पिंगट असतील. काहीजणांचे असतील. पण सगळ्याच्या सगळ्या गायपारध्यांचे कसे काय शक्य आहे?

मी मिटकरांना म्हटलं, मिटकर आता झोप आली. उद्या बहुरुप्यांच्या वस्तीवर जायचंय. आता मी झोपतो.

साधारण तासाभराने कडी वाजली. बारा वाजून गेलेले.

"मी दिलीप" बाहेरून आवाज.

कोण दिलीप मला माहिती नव्हतं. आणि तो इतक्या रात्री कशाला?

उमेशला उठवलं. उमेश आमचा कॅमेरामन. आणि मनाचा हिय्या करून दरवाजा उघडला.

दिलीप आला, आणि सॉरी म्हणत त्याची रुममधली चादर घेऊन गेला.

दुस-या दिवशी दहा वाजता बहुरुप्यांच्या वस्तीवर गेलो. तुळजापूरपासून चार किलोमीटर अलीकडे.

हायवेच्या बाजूला एका कारखान्याच्या पाठीमागे उजाड माळावर ही वस्ती आहे. हायवेपासून साधारण अर्धा किलोमीटर आतमध्ये

बहुरुप्यांची पंचवीस एक घरं.

पालावरची शाळा काही भरली नव्हती. तिथल्या बारावी पास मुलीला सांगितलं की मुलं गोळा कर, शुट करायचं आहे.

आम्ही आदल्या दिवशी तशीही तिला पूर्वकल्पना दिलीच होती.

उमेश शुट करू लागला. मुलांचे क्लोज-अप्स, कट-अवेज. सिक्वेन्सेस वगैरे.

मिटकर मला घेऊन एका बहुरुप्याच्या घरात गेले. त्यांचा मुलगा यमगरवाडीच्या आश्रमशाळेत शिकत होता. मिटकर म्हणाले, बहुरुप्यांचं एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना आवाजाची देन असते. वाद्य वाजवण्याची कला परंपरागत. बहुरुपी वेगवेगळी सोंग घेतात. तसंच देवादिकांचे फोटो विकतात. तो ही यांचा व्यवसाय. आपल्याकडे मुंबईतसुद्धा देवादिकांचे फोटो विकणारे, नकाशे, पोस्टर्स विकणारे जे आहेत त्यातही ब-यापैकी बहुरुपी जमातीतले आहेत.

तिथून बाहेर आलो, बघतो तर पालावर पन्नास एक जणांची गर्दी.

उमेशच्या हातात कॅमेरा नव्हता.

त्याचा कॅमेरा दुस-याच कोणाच्या तरी हातात.

बायकांचा हा गोंगाटा... कचाकचा ओरडत होत्या.

क्षणार्धात तिथे सगळी बहुरुपी वस्ती गोळा झाली.

त्या गर्दीत आणि आमच्यात साधारण पन्नास पावलांचं अंतर. उमेश तिथे गराड्यात सापडलेला. मला बोलवत होता.

मिटकर म्हणाले... अरे बापरे, हे कुठून झालं, हे कुठून आले... इथून निघायचं बघा पटकन

मिटकर असं म्हणाले त्याला एक कारण होतं, कारण तिथे बायका मुलांसकट वीस-एक पारधी गोळा झाले होते.

मी आणि मिटकर त्यांच्याजवळ गेलो.

तेवढ्यात एक पारधी ओरडला- तुझ्या आईचा बसवला दाणा तो... भेंच्योद! इथे का आलात. का आलात बोला. आमच्या बायकांचे फोटो काढतात. नागडे दाखवतात त्यांना आणि पैसा कमवतात तुम्ही. थांब कॅमेराच फोडतो.

तो पारधी मिटकरला बोलला- ए मिटक-या, खांडोळी करतो तुझी. इथे यायची हिंमत कशी झाली. या तुमच्या संघाने आमची वाट लावली. काय दिलं आम्हाला. हे असेच फोटो काढू काढू नेले आणि पैसे जमवले. आणि यमगरवाडीत शाळेच्या बिल्डिंगी बांधल्या. आणि आम्हाला. आम्ही अजून झोपडीत.

मला कळलं की वाद राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्या पारध्यांमध्ये होता. पारध्यांपैकी काही अंसतूष्ट होते आणि त्यांनी गोंधळ घालायला सुरुवात केली होती.

बहुरुपी वस्ती मात्र आमच्या मदतीला यायला कबूल नव्हती. आम्ही पुरते अडकलेलो आणि पारधी तर मारण्याशिवाय दुसरी कुठलीच भाषा करत नव्हते.

मी त्यांना अक्षरशः हात जोडले. म्हटलं- आम्हाला माफ करा, आम्हाला माहिती नव्हतं की तुम्हाला इथे त्रास होतोय ते. आम्ही जातो. शुटिंग नाही करत.

मघासचा पारधी परत म्हणाला- कसं जातो ते बघतो. यांना अडवून ठेवा. पोलीस कंप्लेटच करा. आमच्या बायकांचे नागडे फोटो काढतात.

या आरोपावर आमच्याकडे उत्तर नव्हतं. कारण एक तर आम्ही तसं करतच नव्हतो. आणि इथे तर पारधी बायकाच तावातावाने ओरडत आमच्या अंगावर येत होत्या.

मी त्यांना म्हटलं की, तुम्ही त्या मुलीला विचारा की आम्ही काय शुट करत होतो ते. ती तुमच्यातलीच आहे. ती खरं सांगेल.

त्या बहुरुप्यालाही म्हटलं की आम्ही तर तुम्हाला काल सांगून गेलो होतो ना की आज पालावरची शाळा शुट करायला येणार म्हणून. तुम्ही तरी यांना सांगा.

बहुरुपी म्हणाला- आमचं दोनीकडून मरण हाय. आम्ही संस्थेच्या विरोधात जाऊ शकत नाय आणि पारध्यांच्याही.

मघासचा पारधी परत म्हणाला- काय काय रेकॉर्डिंग केलं ते दाखवा. नायतर कॅमेरा फोडतो.

आणि असं बोलून तो स्वतःच कॅमे-याची हाताला येतील ती बटणं दाबू लागला.

उमेश म्हणाला, तुम्ही नका बघू, मी दाखवतो. आणि उमेश त्यांना रिवाईंड करून दाखवणार तोच माझ्या लक्षात आलं की

मघाशी पालावरच्या शाळेत येणारी जी लहान लहान मुलं-मुली आम्ही शुट करत होतो त्यातले दोघंतिघंजण उघड-नागडे, फक्त चड्डीवर असेही होते. आणि रिवाईंड करून या पारध्यांना दाखवलं तर ते तोच मुद्दा पुन्हा उचलणार. स्वतःचच खरं करणार. आणि आम्हाला पडणार.

मी म्हटलं तुम्ही हवं तर टेप घ्या, आणि कॅमेरा परत द्या. तो फोडू नका. उमेशने त्यांना टेप काढून दिली.

एवढ्यात मिटकरला बहुरुपी वस्तीतल्या कोणीतरी सांगितलं की तुळजापूरवरून या पारध्यांचा म्होरक्या येतोय.

प्रमोद काळे.

मिटकर हबकला. माझ्या कानात म्हणाला. पळा इथून. तो खूप खतरनाक आहे. माझ्या घरी येऊन मला रक्तबंबाळ होईपर्यंत मारलेलं एकदा त्याने. चौदा टाके पडलेले.

त्यावेळी काय बुद्धी सुचली देव जाणे. पण पळालो नाही. कारण पळण्यासाठी दोन पावलं जरी धावत टाकली असती तर तिथेच मुडदा पडला असता. पन्नास-पंचाहत्तर जणांच्या गर्दीसमोर पळणं अशक्य होतं.

ड्रायव्हर विनायकने त्यातल्या त्यात गाडीचं तोंड वळवून घेतलं तेव्हा एकजण म्हणाला, आहे तिथेच थांब नाही तर गाडीच फोडतो.

मिटकरला सांगितलं तू कोणाला फोनाफोनी करायची नाहीस. आता पोलिसांनाच येऊ दे. कंप्लेंटच करतो.

पोलिस येणं खरं तर आमच्या पथ्यावर होतं कारण त्यामुळे आम्ही सुरक्षित होणार होतो. पण ती फक्त हुलपट्टी होती. पारधी कधीही पोलिसांना बोलवणार नाहीत असं मिटकरने सांगितलं.

या सगळ्या प्रकाराला एक तास उलटला.

तेवढ्यात मिटकरने गुपचूप फोन लावून संस्थेच्या कुठल्यातरी माणसाला कळवलं होतं.

तेवढ्यात तुळजापूरहून प्रमोद काळे आणि त्याच्यासोबत काही पारधी आले आणि त्यांनी मिटकरला मारायला सुरुवात केली.

आल्या आल्या प्रमोद काळे ओरडला- तुझ्या आईचा दाणा बसवला तो... भेंच्योद वस्तीवर यायचं नाय म्हणून सांगितलं होतं ना. मी वाटच बघत होतो कधी येताय ते. आता दाखवतोच. पोलिसांना आम्ही घाबरत नाय.

कोण कोण आलंय तुझ्याबरोबर...

मी पुढे झालो. आणि पुन्हा हात जोडले. म्हटलं आम्हाला माफ करा. तुमच्यातले वाद आम्हाला माहिती नाहीत. आम्ही आयबीएन लोकमतचे आहोत. तुमचं काही म्हणणं असेल तर मांडा. आम्ही ते रेकॉर्ड करू.

आणि त्याच क्षणी माझं त्याच्या डोळ्यांकडे लक्ष गेलं...

आईशप्पथ- मिटकरचं कालचं वाक्य मला आठवलं.

''गायपारधी अतिशय भयानक. वेळ आली तर कितीही क्रूर होतात. गोरे गोरे असतात. क्वचित लालसर चेहरा. डोळे पिंगट असतात त्यांचे''

फाटली... अक्षरशः फाटली.

त्याच्याबरोबर आलेल्या सगळ्यांचेच डोळे तसेच होते.

इतकंच काय आम्हाला ज्या पाच-सहा पारध्यांनी मघापासून जेरीस आणलं होतं त्यांचेही डोळे तसेच. पिंगळ्यासारखे.

तेवढ्यात एक वयोवृद्ध पारधी म्हणाला की तुम्हाला काही करणार नाही शांत राहा.

एवढ्यात सोलापूरहून ज्ञानेश्वर भोसले नावाच्या एका फासेपारधी तरुणाचा फोन त्यांना आला. संस्थाचालकांनी ज्ञानेश्वरला फोन करून समजूत घालायला सांगितली होती. ज्ञानेश्वरने त्यांना फोनवरूनच समजावलं असावं. प्रमोद काळेचा आवेश थोडा कमी झाला होता. पण पुढचे तीन तास आम्ही त्यांच्या तावडीत होतो आणि तो त्याच्यावर कसा अन्याय झाला याच्याच कहाण्या सांगत होता.

मी त्याला म्हटलं की तुम्ही हे कॅमे-यासमोर बोला.

इथे स्टोरीत एक आणखी वेगळाच ट्विस्ट आला. त्याने त्याच्या नेत्याला फोन लावला. हा नेता म्हणजे नेर्ल्यातल्या आश्रमशाळेचा प्रमुख. अशोक तांबे. अशोक तांबे म्हणजे कोल्हाट्याचं पोर वाले किशोर शांताबाई काळे यांचे मावसभाऊ. ते माझ्याशी फोनवर बोलले. मी त्यांना म्हटलं की मी उद्या नेर्ल्याला येतो. तुमचं काय म्हणणं असेल ते मांडा. नेर्ले तुळजापूरहून जवळपास ७५ किमीच्या पुढे. पण सध्यातरी प्रमोद काळेच्या तावडीतून सुटण्याचा तोच एक मार्ग होता. प्रमोदला म्हटलं की मी उद्या जातोय अशोक तांबे यांच्याकडे. पण तुम्ही तुमचं म्हणणं मांडलं असतं तर बरं झालं असतं कॅमे-यासमोर. पण कॅमे-यासमोर बोलायची वेळ आली तेव्हा प्रमोद चूप. कारण त्याच्या नेत्याचा आदेश.

काही पत्रकार मित्र बोलले नेर्ल्याला जाऊ नकोस.त्याला भाव देण्याची गरज नाही.

पण मला तपासून पाहायचं होतं. आणि दुसरं म्हणजे ते पारधी इतर वस्तींवरही शुटिंगच्या वेळेस धुडगूस घालणार नाही याची गॅरेंटी कोणी द्यावी. शिवाय जर परस्पर मुंबईला परतलो असतो तर यमगरवाडीसारख्या खरोखर एका चांगल्या प्रोजेक्टवर फिचर बनवायचं राहून गेलं असतं.

दुस-या दिवशी बॅकअप प्लॅन तयार केला. सोबत एक पत्रकार मित्र. दुस-या गाडीत घेतला.

जर दगाफटका झाला आणि नेर्ल्याला शाळेत गेल्यावर दोन तासांत आमचा काहीच कॉंटॅक्ट नाही झाला तर तो पत्रकार मित्र डायरेक्ट पोलिसांना घेऊन त्या शाळेत येणार होता.

दोन्ही गाड्यात दहा मिनिटांचं अंतर. हे त्या पत्रकार मित्राचंच डोकं. फुल टू फिल्मीस्टाईल.

नेर्ल्याच्या शाळेत पोहोचलो. दहा मिनिटांनंतर अशोक तांबे पोहोचले. कालचा एवढा सगळा प्रकार होऊनही आम्ही दोघंच आलोय यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. शाळेचं शुटिंग केलं. मुलांची प्रात्यक्षिकं पाहिली. शेळगावमधील पारधी हत्याकांडात ज्याचे आईवडील मारले गेले त्या गणेश काळेशी बोललो. नंतर अशोक तांबेंचा इंटरव्ह्यूही घेतला. तांबे एकदम शांतपणे बोलले. त्यांना म्हटलं इतर संस्थांकडून तुम्हाला काही विरोध असेल तर तो ही सांगा. माझा रोख यमगरवाडी प्रोजेक्ट राबवणा-या संघावर होता. पण तांबेंनी संघाच्या विरोधात काहीच म्हटलं नाही.

मग कालचा एवढा ड्रामा कशासाठी होता. मी मनाशी म्हटलं.

तिथून निघताना त्यांनी आमची कालच्या प्रकाराबद्दल माफीपण मागितली.

मी परत मनात म्हटलं की च्यायला आता माफी मागायला तुम्हाला काय जातंय.

तिथून आम्हाला सोलापूरला जायचं होतं. मोहोळमध्ये ज्ञानेश्वर भोसले या फासेपारधी समाजातील तरुणाचं कार्य पाहायला. त्याला भेटलो. दोन पारध्यांमध्ये, त्यांच्या विचारांमध्ये किती फरक. हे सगळं शिक्षणामुळे.

तिथले काही पत्रकार मित्र म्हणालेले की तू पोलिस कंप्लेंट कर. पण मला ती करायची नव्हती. ऑफिसमध्ये एक फोन केला असता तर ती न्यूजही झाली असती की पारध्यांचा पत्रकारांवर हल्ला म्हणून. पण मला तसंही होऊ द्यायचं नव्हतं. त्यामुळे यमगरवाडीच्या त्या प्रोजेक्टला उगाचच निगेटिव्ह प्रसिद्धी मिळाली असती. आणि बहुधा तेच करण्याचा हा एक पूर्वनियोजित प्लॅन होता असं नंतर जाणवलंही.

या सगळ्यातून जेव्हा बाहेर आलो तेव्हा वाटलं की स्साला आपण नेमके कुठल्या परिस्थितीतून बाहेर आलोय. तुळजापूरच्या त्या बहुरुपी आणि पारध्यांच्या वस्तीवर त्या चार तासात काहीही घडू शकलं असतं.

या सगळ्या प्रकारात कॅमेरामन उमेश आणि आमचा ड्रायव्हर विनायक ( वय २१ पूर्ण असं तो म्हणतो. पण तो लहान असावा. ड्रायव्हिंग लायसनसाठी त्याने वय वाढवून घेतलं असावं असं माझं मत ) या दोघांनीही तितकीच समयसूचकता दाखवली. धारिष्ट्य दाखवलं. हे मानावंच लागेल.

आतापर्यंत गर्जा महाराष्ट्राचे जितके म्हणून एपिसोड झाले. त्यातला हा एपिसोड मी कधीही विसरू शकणार नाही. एकतर या प्रकारामुळे आणि दुसरं म्हणजे ते काम मला आतापर्यंतच्या सर्व संस्थात्मक कामात इतकं जेन्युईन वाटतंय कारण ते अशा लोकांसोबत गेली २१ वर्ष केलं जातंय ज्यांच्यासोबत चार तास राहणंही आम्हाला आता मरतोय की मग मरतोय अशा स्थितीतलं होतं. मग यमगरवाडीच्या त्या प्रोजेक्टला संघाचं बॅकिंग असू दे नाहीतर अजून कोणाचं. मला त्याचा फरक पडत नाही. कारण माझ्यासाठी तिथलं भटक्या विमुक्तांसाठीचं काम महत्त्वाचं आहे.

## माझ्या (अनोळखी) मैत्रिणी



राजीव तांबे

# कळसुत्री बाहुली

खरं तर ही गोष्ट मी लिहिणारच नव्हतो. तसा माझा या गोष्टीशी फारसा संबंध पण नव्हता आणि त्यातले सगळे डिटेल्स सुद्ध मला निटसे माहित नव्हते. अर्धवट माहितीवर का लिहायचं? असा मी विचार करत मीराचं प्रकरण मी डोक्यातून डिलीट करुन टाकलं.

पूर्वी एका सेमिनारला मीरा मला भेटली होती. त्यावेळी एक पकाव भाषण बंक करुन आम्ही बाहेर गप्पा मारत बसलो. नंतर दोन एक वर्ष आमची भेटच झाली नाही. पुन्हा भेटलो तेव्हा तिने मला मागील तीन वर्षातल्या घडामोडी सांगितल्या होत्या.

पण काल अचानक मीरा पुन्हा भेटली. 'चला कॉफी घेऊ' असं तिने म्हंटल्यावर , मला ही नाही म्हणता येईना. कॉफी घेताना खूपच नवीन गोष्टी समजल्या आणि मग ठरवलं, आता हे लिहायचंच.

मीरा एका सामाजिक संस्थेत अकाऊंटंट म्हणून काम करते. तिच्याकडे फायनान्स मधली कुठली तरी मोठी पदवी आहे. संस्थेत काम करताना मीराकडे मोकळावेळ खूप असायचा. मग तीने विचार केला आपल्या संस्थेतर्फे झोपडपट्टीतल्या मुलींसाठी शिवणाचे वर्ग चालतता, मुलांसाठी अभ्यासाचे वर्ग चालतात आपण थोडं इथंही लक्ष घालूया. तिच्या या निर्णयाचं संस्थेत सर्वांनी स्वागतच केलं.

मीरा हुशार, देखणी आणि उत्साही मुलगी. लग्न लहान वयातंच झालेलं. तिला एक लहान मुलगा आहे. पण तिने आपली तब्येत अशी काही मेंटेन केलेली की तिच्या मैत्रिणी नेहमी म्हणत, "मीराला संतूर साबणाच्या जाहिरातीत पाठवलं पाहिजे." मीराला प्रत्येक नवीन गोष्ट शिकण्यात प्रचंड रस. वेळ असेल तेव्हा इंटरनेटचा वापर करून नवनवीन गोष्ठी शिकणारच ती. आपल्या संस्थेला उपयोगी पडेल अशी माहिती इंटरनेटवरुन शोधून काढणारच ती. ती एकदम संगणक सॅव्ही!

मीराला तिच्या संस्थेने एक नवीनच जबाबदारी दिली. त्यांची संस्था पाहण्यासाठी परदेशी डोनर्स सतत येत असतात. त्यांना पटवून त्यांच्या खिशातून हजारो डॉलर्स बाहेर काढणं तसं कठीण काम असतं. यासाठी त्या समोरच्या माणसाला नेमकं कुठलं काम व्हावं असं वाटतंय हे ओळखता येणं महत्वाचं. हे एकदा समजलं की, त्यांची संस्था कसं हेच काम प्रभावीपणे करते हे त्यांना दाखवलं की त्यांचा खिसा मोकळा होतो.

वेगवेगळया परदेशी डोनर्सना वेगवगेळया गोष्टी दाखवल्या जातात. आणि त्याचप्रमाणे भारतीय डोनर्सना आणखीन वेगळया. या फंड रेझींग टीम मधे चार जणं होती. डोनर्सचा इंटरेस्ट आयडेंटीफाय करणारी वसुधा. त्यांच्या साइट व्हीजीटस् करणाऱ्या सायरा व रश्मी. सगळयात शेवटी त्यांच्यावर मोहीनी मंत्र घालून, त्यांना भारावून टाकाणारा अमन.

वसुधाला प्रमोशन मिळालं आणि त्या ठिकाणी मोठया उत्साहात मीरा दाखल झाली.

मीरासाठी हे सारं विश्वंच नवीन होतं. आपल्या संस्थेला परदेशातून पैसा येतो. हा पैसा येथील गोर गरिबांची मुले शिकण्यासाठी किंवा हलाखीत जीवन जगणाऱ्या महिलांसाठी वापरला जातो असा तिचा समज होता. ती फायनान्सवाली असल्याने एकंदर किती प्रमाणात पैसा येतो आणि तो किती योग्य

प्रकारे वापरला जातो याची तर तिला खडानखडा माहिती होती.

अमन हा संस्थेचा सिइओ होता. एकदम चॉकलेट हिरो. बोलणं तर इतकं गोड मधाळ की ऐकतंच रहावं. सगळी माहिति अगदी तोंडावर. बोलता बोलता पटकन ग्राफ काढून किंवा चित्र काढून समजावून सांगण्याची त्याची हातोटी तर वाखाणण्यासारखी. अमनची सगळ्यात मोठी खासियत म्हणजे आलेला डोनर तर डॉलर्सची खैरात करुन जात असेच पण जाताना पुढच्या वर्षीचा करार सही करुन जात असे.

पहिला एक महिना तर मीरा पार भिरभिरली होती. आपण नेमकं कुणासाठी काम करतोय? कशासाठी काम करतोय? येणारे पैसे खरंच कामासाठी खर्च होताहेत की तसं फक्त कागदावरंच दाखवलं जातंय? आपण एव्हढं शिकलो,ध्येयाची स्वप्नं पाहिली ती कशाला.. परदेशी डोनर्सना पटवायला? त्यांचे खिसे कापायला? कुठलीतरी थातुरमातुर कामं दाखवून त्यांच्याकडून पैसे उकळायला? तिच्या डोक्यात या साऱ्या प्रश्नांची खिचडी झाली आणि हे तिला कुणाजवळ बोलता ही येईना. कारण या कटात सारेच सामील. त्यांची रोजीरोटीच मुळी यावर अवलंबून.

हे सारं घडत असताना अमन परदेशी गेला होता. संस्थेला मदत करणारे मोठे मासे पकडण्यासाठी अमन वर्षातून दोन-तीन वेळा परदेशी जातोच. अमन परत आला तेव्हा कोअर ग्रुपची मिटींग झाली. काही क्षणातच मीराची बेचैनी त्याच्या लक्षात आली.

मीरा त्याक्षणी फारच इनोसंट होती. तिचा असा समज झाला होता कि अमन परदेशी गेला असल्याने, हा सारा गोंधळ इथे सुरू आहे. एकदा सविस्तर अमनच्या कानावर घातलं तर सारे सुरळीत होईल.

परदेशातून येताना अमनने साऱ्यांसाठी काहीनकाही गिफ्ट आणल्याच होत्या. फक्त मीरासाठी काहीही नव्हते. अर्थात मीराची तशी अपेक्षा पण नव्हती. मीराकडे पहात तोंडवर करुन सायरा म्हणाली, ''आय कॅन स्पेअर माय गिफ्ट.'' मीराने थंड नजरेनेच नकार दिला.

मिटींग सुरू असतानाच अमनने मीराला एसेमेस केला,''नंतर थांब. बोलायचं आहे. ए सरप्राइज गिफ्ट फॉर यू!'' मीराला अतिव आनंद झाला. कारण तिला खटकलेल्या खूप गोष्टी, तिला अमनला सांगायच्याच होत्या आणि त्याही फक्त त्यालाच, इतरांच्या पुढ्यात नव्हे.

त्या संध्याकाळी अमन व मीरा जेवायला गेले. त्या जेवणानंतर मीरा पूर्ण बदलूनच गेली! ती अमन भक्त झाली. तिच्यासाठी अमन हा परमेश्वरच!

जेव्हा अमन मीराला घेऊन एका पंचतारांकित हॉटेलात गेला, तेव्हा तिला वाटलं होतं,'काय गरज आहे इतके पैसे खर्च करण्याची?'

मीरा काही बोलण्याआधीच अमन ने तिला विचारलं, ''तुझ्याकडे पासपोर्ट आहे ना? पुढच्या महिन्यात तुला लंडनला जायचं आहे. मला खूप वाटतं कि तू जग फिरावंस. नवीन शिकावंस.

तुझ्यात खूप टॅलेण्ट आहे. हं आता बोल काय म्हणते आहेस तू?''

मीराने जे काही बोलायचं ठरवलं होतं, ते ती काही बोलूच शकली नाही.

मग अमनच बोलत होता. तिला तिची नवीन असाइनमेंट किती महत्वाची आहे हे समजावून सांगत होता. आता मीराच्या मदतीने परदेशात काम कसं वाढवायचं आहे याचं प्लॅनिंग सांगत होता. डोनर्सचं नेटवर्कींग आणि मीराचं लंडन बेस ऑफीसचं स्वप्नं तो तिच्यासमोर अलवारपणे उलगडत होता आणि एकदम रिलॅक्स होऊन मीरा हे ऐकत होती. मीरा त्याच्या बोलण्यावर फार प्रभावित झाली होती.

तो नेमका क्षण अमनने ओळखला. आणि मीराची परवानगी न घेताच त्याने स्वत:साठी हार्ड ड्रिंक व मीरासाठी जिमलेट ऑर्डर केलं.

मीराची असं काही घेण्याची ही पहिलीच वेळ होती. पण त्याला विरोध करण्याचं साहस काही तिला झालं नाही. अमन म्हणतोच आहे तर एकदा पिऊन पहायला काय हरकत आहे? असा विचार तिने केला.

त्या रात्री मीरा उशीरा घरी गेली. घरी गेल्या- गेल्या कामाचा ताण व डोकेदुखी यामुळे ती लगेचच डोक्यावरुन पांघरूण घेऊन झोपी गेली.

मीराचा नवरा या ना त्या निमित्ताने महिन्यातून दहा-बारा दिवस दौऱ्यावर असतो. छोटा मुलगा सांभाळायला सासू सासरे असल्याने मीरावर फार जबाबदारी नाही. त्यात मीरा समाजकार्य करणाऱ्या प्रतिष्ठीत संस्थेत काम करत असल्याने सासू बाई तिला आणखीनच मदत करतात. नवरा ही समजून घेतो.

आता 'लंडनची तयारी' या निमित्ताने मीराला घरी येण्यासाठी वारंवार उशीर होऊ लागला. महिनाभरातच मीरा व अमनला एकमेकांची सवय झाली.

अमनकृपेमुळे मीरा आठ दिवस लंडनला जाऊन आली खरी. पण ठरविलेले कुठलेच काम झाले नाही. आणि मग मीराच्या कामाची घडी बसविण्यासाठी पुढच्या महिन्यात मीरा व अमन दोघेही लंडनला गेले.

आता मीरा पूर्ण बदलली होती. अगोदर तिला पडणारे प्रश्न तिला अगदी फजूल वाटत होते. तिचं घराकडे, मुलाकडे पार दुर्लक्ष झालं होतं. ती दिवसोंदिवस बहकत चालली होती आणि घरच्यांना मात्र वाटत होतं की,'तिने समाजकार्याला स्वत:ला वाहून घेतलं आहे.'

निरनिराळया सेमिनार्सची निमंत्रणं मिळवणं. सेलेबल प्रोजेक्ट तयार करणं, डोनर्ससाठी इव्हेंट अरेंज करणं. शो ऑफ करणं, स्वत:च्या कामाची डमडम करण्यासाठी मिडिया मॅनेज करणं या कामात आता ती माहीर झाली होती.

आता ती शिक्षण आणि फायनान्स यातली तज्ज्ञ समजली जात होती अमनच्या बरोबरीने. आता त्यांच्या संस्थेच्या भारतभर शाखा झाल्या होत्या. परदेशातून डॉलर्सचे कालवे त्यांच्याच धरणात वहात येत होते. आता काम होतं की नाही हे महत्वाचं नव्हतं. कारण सगळा मिडिया त्यांचा उदोउदो करत होता.

पण अचानक एके दिवशी हा फुगा फुटला.

अमन आपल्या फसवतो आहे. परदेशातून पैसा खेचण्यासाठी तो आपला वापर करुन घेत आहे. मिडियात आपल्या संस्थेची इमेज राहण्यासाठी तो आपल्यालाच पुढे करतो आहे याची जाणीव तिला होऊ लागली.

अमनला प्रश्न नाही विचारायचे. अमनला चॅलेंज नाही करायचं. अमनला विरोध नाही करायचा. अमनच्या कुठल्याच गोष्टी विषयी शंका घ्यायची नाही आणि मिडिया समोर बोलताना, अमनने जे सांगितलं असेल तेच बोलायचं. बस्स इतकंच!!

बाकी तुम्ही स्वतंत्र. इतकंच वगळलं तर संस्थेत पूर्ण लोकशाही. सगळयांना सारखेच स्थान. सगळयांच्या गुणांची कदर.

आपण त्याचि एक कळसुत्री बाहुली आहोत, असंच तिला सतत वाटू लागलं.

याचं मुख्य कारण वेगळंच होतं.

वसुधाला प्रमोशन मिळून त्याजागी जशी मीरा आली होती. आता पुढच्या महिन्यात मीराला प्रमोशन मिळणार होतं आणि त्या जागी येणार आहे नव्यानेच आलेली पियू.

पियू प्रचंड डिप्लोमॅटिक आहे. पियू आल्यापासूनच मीराचं महत्व कमी होऊ लागलं होतं. अमन व पियूच्या मिटींग्ज वाढल्या होत्या. मीराशी बोलायला आता अमनकडे फार वेळ नसे. मीराचे फोनसुध्दा तो प्रत्येकवेळी घेत नसे.

आणि आता मीराचे ज्युनियर्स पियूच्या भोवती रुंजी घालत होते. पियूला जेव्हा वाटेल तेव्हा ती मीराला बोलवत होती. काम सांगत होती. पण पियूच्या परवानगी शिवय मीरा तिला भेटू शकत नव्हती.

-------------

कॉफी पिताना मीरा म्हणाली,‘‘ नवऱ्याचा, घराचा इतकंच काय माझ्या मुलाचाही विचार न करता सारी जिंदगी मी अमनवर ओवाळून टाकली. आपण खरंच समाजासाठी खूप काम करतोय अशी झिंग मला होती. पण आता त्या दोघांमधला खोटेपणा मला दिसायला लागला आहे अमन मधला

आणि संस्थेमधला.

मी कशी त्याच्या इतकी आहारी गेले की त्याच्या शिवाय मला काही दिसेच ना रे? कुठल्या गोष्टींना भुलले असेन मी? परदेश प्रवास? सामाजिक कामाची खोटी झिंग? त्याचं आकर्षक बोलणं आणि कन्हव्हीन्सींग पॉवर? मिडियाने दिलेलं ग्लॅमर? काहीच कळेनासं झालंय बघ मला.

आता मी नाही माझ्या नवऱ्याची, माझ्या मुलाची, अमनची आणि माझ्या संस्थेची पण.

खरंतर आता मी माझी तरी आहे का रे?

मी आता नक्की कोण आहे आणि कुणाची आहे?

अनेक संस्था मला घेण्यासाठी उत्सुक आहेत. मी सांगेन ते पॅकेज ते मला देणार आहेत. कारण मी त्यांच्यासाठी मोठा मासा आहे. पण हा मोठा मासा आता आतून पार पोखरला गेला आहे, हे कुणालाच माहीत नाही!

**एक प्रश्न सतत मनात डसतोय तो विचारतेच तुला.**
**आपण आपल्या नकळत आपल्या प्रिय माणसाकडून वापरले गेलो याचं दुःख होतंय. आपली गरज संपल्यावर आपल्याला फेकून दिलं जातंय याची चीड येतेय.**

**आपल्याला झिडकारल्यावरंच का कळतं की आपण छान छान दिसणारी पण हतबल कळसूत्री बाहुली आहोत..? की आधी ही हे कळलेलं असतं.. पण ते मानायला मन तयार नसतं?"**

**मी तिच्या प्रश्नाचं उत्तर देऊ शकलो नाही. तुम्हाला देता येईल ?**


संजय आवटे

आपल्या लेखणीतून समाजाला दिशा देणारे संपादक. नव्या पिढीतल्या अशाच काही संपादकांना वेगवेगळ्या विषयांवर लिहिते करण्याचा हा प्रयत्न. यावेळी लिहीत आहेत दै. कृषीवल चे संपादक आणि प्रसिद्ध लेखक संजय आवटे, रवींद्रनाथ टागोरांवर 'जन गण मन' च्या शतकपूर्तीचे निमित्त आहेच

# चाकोरीबाहेरचे रवींद्रनाथ

**'शारीरिक श्रमापेक्षा मानसिक श्रम करण्याचा कंटाळा माणसाला अधिक आहे. मळलेल्या वाटेने जाणे जेवढे शरीराला सुखावह; त्याहून जास्त मनाला. त्यामुळे विचार न करता जगण्यासाठी चाकोरी उत्तम!' असे गोपाळ गणेश आगरकरांनी म्हटले होते. अशा चाको-या आपण निर्माण केल्या 'शिक्षण' या नावाखाली. मग आपोआपच कला अदृश्य झाल्या. पुस्तकी व्यवस्था चाको-यांसाठी आदर्शवतच. अशी पुस्तकं बदलत्या जगात निरुपयोगी ठरली नाहीत, तरच नवल. कोणतीही चाकोरी एक फूटपट्टी तयार करीत असते.**

अशा फूटपट्ट्या एकदा तयार झाल्या की, मग कोणताही विचार न करता त्या प्रस्थापित होऊ लागतात. त्याच फूटपट्ट्यांनी प्रत्येकाच्या आयुष्याचे मूल्यमापन केले जाते. व्यक्तिवादाचे स्तोम आता कितीही वाढले असले तरी, प्रत्यक्षात मात्र आपल्या आवडीचे जगणे व्यक्तीला जगता येत नाही. मुळात आपल्याला कशा प्रकारचे जगायचे आहे, हेच त्याला ठाऊक नाही! तो ज्याला स्वातंत्र्य मानतो, ते ही खरे स्वातंत्र्य असतेच, असे नाही. 'दि फिअर ऑफ फ्रीडम' हे पुस्तक आले १९४१ मध्ये. मात्र, आजही ते तेवढेच लागू आहे. ते पुस्तक त्या काळात आले, जेव्हा वेगवेगळ्या छोट्या मोठ्या देशांमध्ये स्वातंत्र्यांची अनिवार भूक निर्माण झाली होती. या पुस्तकामध्ये एरिक फ्रॉमने लोकशाही आणि स्वातंत्र्य या संकल्पना विशद केल्या आहेत. बाहेरून मिळणारे स्वातंत्र्य तुम्हाला तेव्हाच वापरता येते, जेव्हा तुम्ही आतून स्वतंत्र असता. हे बौद्धिक, मानसिक आणि भावनिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय ख-या स्वातंत्र्याचा आनंद उपभोगता येत नाही. एखादा समाज फुलण्यासाठी त्याला अंतर्बाह्य स्वातंत्र्य मिळणे, ही पूर्व अट असते. फ्रॉच्या शब्दांत सांगायचे तर,The way to become truly free in an individual sense is to become spontaneous in our self-expression and behaviour and respond truthfully to our genuine feelings सारांश रूपाने हे सांगताना फ्रॉम एक सूत्र सांगतो There is only one meaning of life : the act of living it. या सूत्राचा विसर ज्यांना पडतो, ते इमाने इतबारे फक्त चाको-या निर्माण करतात. बदलणाऱ्या काळात आणखी नव्या चाको-या निर्माण झाल्या आहेत. भौतिक समृद्धी आणि सुखासीनता असा पाया नव्या चाको-यांना लाभला आहे! चाकोरी अनेक अर्थांने सोयीची असते. त्यामुळेच निर्णय लादला जाणे लोकांना सोयीचे वाटते; म्हणजे कशावर तरी खापर फोडता येते! स्वतःचे निर्णय स्वतःच घेणे गैरसोयीचे असते. निर्णय लादला गेला तर चडफड करता येते! मुख्य म्हणजे, त्यामुळे एक्सक्यूज मिळते. अशा अनेक अंगांनी चाकोरी सुखावह. भौतिक साधने आणि तंत्रज्ञान यांच्याशीच आधुनिकतेचा संदर्भ जोडला जातो, तेव्हा तर अशा चाको-यांना गर्तेचे स्वरूप प्राप्त होते. बदलत्या संदर्भात मला सातत्याने रवींद्रनाथ टागोर आठवतात. टागोरांच्या सामाजिक-राजकीय विचारांचा मी संपूर्ण समर्थक आहे, असे नव्हे; मात्र, कलेचे मोल जेवढे

टागोरांना समजले, तेवढे जगात आणखी कोणाला समजले असेल, असे वाटत नाही. कला ही माणसाच्या अभ्युदयाची आशा आहे, या अंगाने कलेकडे पाहणा-या टागोरांनी एक नवी दृष्टी दिली; मात्र, पाठ्यपुस्तकात टागोरांवरील एखादा धडा टाकण्यापलीकडे आपण अक्षरशः काही केले नाही. भारताच्या शिक्षणव्यवस्थेवर, कलेच्या रंगरूपावर टागोरांचा प्रभावही दिसत नाही. दुसरीकडे, चीनवर मात्र टागोरांचा प्रभाव आहे! शांघायमध्ये त्यांचा पुतळा तर उभा केला जातो आहेच; पण त्यांच्या समग्र साहित्याचा चिनी भाषेत अनुवाद करण्यासाठी मोठा प्रकल्प चीनने हातात घेतला आहे. टागोर  मध्ये चीनला गेले होते. या माणसाने त्या देशाला किती प्रभावित केले, हे सांगणारी पुस्तिकाच त्या सरकारने प्रकाशित केली आहे.

पश्चिम बंगालमधल्या कम्युनिस्टांनी टागोरांचा प्रभाव पुसून टाकण्याचा प्रयत्न सातत्याने केला. कारण त्यांच्या लेखी टागोर हे भाबडे-स्वप्नाळू कवी. (कम्युनिस्टांप्रमाणे बुद्धिवादी वगैरे नव्हेत!) दुसरीकडे, चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्राने, 'पीपल्स डेली'ने, चीनवर प्रभाव टाकणाऱ्या पन्नास परदेशी नागरिकांमध्ये टागोरांचे नाव अगदी सुरुवातीला घेतले आहे. आपल्या चीन भेटीत टागोर जिथे राहिले, त्या शांघायमध्ये 'शांतीनिकेतन'च्या स्मारकाप्रमाणे काही उभारण्याचे चीनने ठरविले असून, टागोरांच्या कलाजीवनाशी संबंधित प्रयोगांसाठी ते स्मारक उपयोगात आणले जाणार आहे. चीनला टागोर दोन वेळा गेले. त्यांना खूप लोकप्रियता मिळाली. प्रचंड वादविवादही झाले. मात्र, आज सात दशके उलटल्यानंतर त्या महाकाय देशाला हे समजावे आणि त्यांनी टागोरांच्या नावाने अध्यासन सुरू करावे, शिष्यवृत्ती द्यावी, कलाविषयक प्रयोग करावेत, हे आनंददायक आहेच; पण तेवढेच क्लेशकारकही. कारण भारताने मात्र टागोर पुसून टाकले. शांतीनिकेतनचा वसा घेण्याऐवजी जे होते, तेही संपवले. महाराष्ट्राने तर कलेचा विचार या अंगाने कधी केला नाहीच, पण बंगाल त्यापेक्षाही करंटे ठरले.

साहित्य संमेलनांना किती निधी द्यावा, कलावंतांना कोणते पुरस्कार द्यावेत, कोणाला राज्यसभा-विधानपरिषदेवर पाठवावे आणि रानकवीच्या शिवारातील जोंधळ्याला थकबाकी लगडून गेल्यानंतर त्या कवीला कसे बाहूत घ्यावे, असला विचार म्हणजे आपले कलाविषयक धोरण. शिवाय हे काही आजचे नाही. महाराष्ट्राच्या जन्मापासून स्थिती हीच. कलासक्त मुख्यमंत्री असोत वा कलानिरक्षर मुख्यमंत्री; महाराष्ट्राने या प्रांतात कधीही प्रयोग केलेले दिसले नाहीत. पहिलीपासून इंग्रजी ते सर्व शिक्षा अभियानांपर्यंत अनेक 'अर्थपूर्ण' प्रयोग झाले आणि शिक्षणाधिकाऱ्यांचा हेवा महसूल विभागातील अधिका-यांनाही वाटू लागला; पण असे मूलगामी प्रयोग आपल्याकडे कधीच झाले नाहीत. गंमत पाहा. चीनमध्ये टागोर गेल्यानंतर माओ दूनने चीनमधील एका नियतकालिकात लेख लिहिला. माओ दून (-) हा चीनमधील प्रख्यात कादंबरीकार, कलासमीक्षक आणि पत्रकार. चीनचा सांस्कृतिक मंत्री म्हणूनही त्याने लक्षणीय काम केले. आधुनिक चीनमधील सर्वश्रेष्ठ कादंबरीकार, वास्तववादी लेखक म्हणून त्याची ओळख आहे. 'माओ दून' हे त्याचे टोपण नाव! त्या शब्दाचा अर्थ 'अंतर्विरोध' असा आहे. तर, त्याने लिहिलेल्या त्या लेखाचे शीर्षक होते- 'टागोरांकडून चीनच्या अपेक्षा'. त्याने दोन अपेक्षा व्यक्त केल्या होत्या- त्यापैकी महत्त्वाची होतीः आजचा चिनी तरुण गोंधळलेला आहे. स्वप्नाळू आहे, पण वास्तवाचा मुकाबला करण्याचे धैर्य त्याच्यापाशी नाही. आभासी दुनियेत रमायला त्याला आवडते. अशा आजारी देशात आम्हाला असा तत्त्वज्ञ-कलावंत हवा, जो या तरुणांना बळ देईल; त्यांना वास्तवासाठी तयार करेल. आम्हाला असे वाटते की, रवींद्रनाथ टागोरांमध्ये ती क्षमता आहे. त्यांनी या तरुणाईला बळ द्यावे. कारण त्यासाठी आवश्यक असणारे उपाय त्यांच्याकडे आहेत! माओ दूनने टागोरांच्या त्याला वाटणार्या मर्यादा आणि बाकी गोष्टींविषयीही लिहिले आहे. त्याचा हा लेख भक्तीभावाचा नाही. पण शास्त्रशुद्धपणे त्याला असे वाटले की, तरुणांना फुलवणारी शिक्षणप्रणाली जगात फक्त या एकाच माणसाकडे आहे! सा-या विश्वात पसरुन राहिलेल्या निर्मात्याचं चैतन्य जेव्हा आपण देऊळ, मशीद, चर्च यात बंदिस्त करुन टाकतो; त्यावेळी आपण देवत्वाच्या सर्वव्यापी कल्पनेपासून दूर जातो. ज्ञानाच्या क्षेत्रालाही अशी कुंपणं घातली जातात, तेव्हा विशाल ज्ञानक्षेत्राकडे पाहण्याची माणसाची सवय नाहीशी होते. मग वाहत्या नदीपेक्षा नकाशातली नदीची निळी रेघ महत्त्वाची ठरू लागते. आकाशात रोज रात्री फुकट पाहायला मिळणाऱ्या नक्षत्रांची

ओळख करुन न देता पुस्तकातून अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी अशी नावं घोकून पाठ करुन घेतली जातात. पुस्तक हे ज्ञानाचं साधन न राहता अंतिम साध्य होतं. ज्ञानेंद्रियांना सबळ करण्याऐवजी आणि दाही दिशांना उत्सुकतेने पाहून त्यांच्या जोडीने कर्मेंद्रियांना कार्यप्रवण करण्याऐवजी शासन संस्थेने घालून दिलेल्या चाकोरीतूनच हालचाल करायची सक्ती व्हायला लागते. अशी सक्ती आणि विकास यांचं नातं कधीही जुळत नाही. निसर्गाला ते मंजूर नाही, असे मांडत निसर्गाचा स्वभाव ओळखून काम करण्याची प्रेरणा रवींद्रनाथांनी ज्या प्रमाणात आणि ज्या उत्कटतेने घेतली; तशी भारतातल्या तर जाऊ दे, पण जगातल्या इतर कलावंत, विचारवंत किंवा शिक्षणतज्ज्ञ यापैकी किती लोकांनी घेतली होती, याविषयी मला शंका आहे. ज्ञान, विज्ञान, कला, चिंतनशीलता आणि प्रत्यक्ष कार्यप्रवणता हे सारे व्यक्तीच्या आणि पर्यायाने साऱ्या मानवजातीच्या देहांचे अवयव आहेत. म्हणून रवींद्रांची शाळा हा त्यांच्या जीवनव्यापी तत्त्वज्ञानाचाच आविष्कार आहे, असं पु. ल. सांगतात; तेव्हा चीनचा माओ दून वेगळे सांगत नाही, असे वाटते. टागोरांच्या प्रतिभेचा कलावंत-तत्त्वज्ञ महाराष्ट्राला लाभला नाही. एक तर साऱ्या कलांचा अदमास घेण्याइतकी कुवत क्वचितच कोणाच्या वाट्याला येते. कलाप्रकारांमध्ये असणाऱ्या भिंतींना सेतूत रूपांतरित करण्याची कल्पकता फार कमी जणांकडे असू शकते. कलेमुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वाला कितीतरी मिती मिळतात! काळ आणि अवकाश यांची व्याप्ती समजते. आयुष्याला असणारे आयाम समजतात.

सर जमशेटजी जीजीभाई नावाच्या द्रष्ट्या माणसाला कलेचे हे मोल समजले होते. म्हणून तर त्यांनी सांगितले, ‘सुयोग्य प्रशिक्षणाअंती भारतीय लोक श्रेष्ठ दर्जाचे चित्र-शिल्पकार व कारागीर तर बनतीलच, पण त्या प्रशिक्षणातून व्यापक उद्यमशीलतेचा एक मार्ग त्यांच्यासमोर खुला होईल. त्यावरच्या कसोट्या समोर येतील. जर त्या उत्तीर्ण करण्याच्या वैचारिक अभिसरणाला देशभर प्रोत्साहन मिळालं, तर भारत ‘पुन्हा एकदा’ प्रगत उत्पादक देशांच्या यादीत सर्वोच्च स्थानी पोहोचेल! ’ मुंबईत आर्ट स्कूल’ स्थापन करण्याची कल्पना त्यांच्या मनात उगाच आली नव्हती. मुंबईत ‘सर जे.जे. स्कूल अँड आर्ट ॲण्ड इंडस्ट्री’ ची स्थापना झाली ती १८५७ मध्ये. त्यानंतर दोनच वर्षांनी जमशेटजींचे निधन झाले.‘आर्ट’आणि ‘इंडस्ट्री’ यांचा एकात्म विचार करणारा माणूस काळाच्या पडद्याआड गेला. इमारतीला त्यांचे नाव मिळाले; पण त्यांच्या विचारांचा आशय मात्र कोणाच्याही पचनी पडला नाही. टागोरांचे झाले, त्यापेक्षा वेगळे काही जमशेटजींच्या वाट्याला आले नाही. रवी परांजपे यांच्याच शब्दात सांगायचे तर, ‘तयार हातांची दृश्य किमया’ या पलीकडचं दृश्य कलांचं आकलन जितकं ब्रिटिशांना होतं, तितकं मराठी चित्रकारांपर्यंत कधीच पोहोचलं नाही. स्वातंत्र्याबरोबर ‘प्रगत उत्पादक देश’ बनण्याचं प्रयोजन मराठी दृश्य कलांना लाभलं असतं, तर ‘पोरकेपण-न्यूनगंडाच्या जळवां’ पासून कायमची मुक्ती मिळाली असती, पण ती न मिळाल्यानं मराठी माणसांना सर जमशेटजींच्या कृपेनं दृश्य कलांचा फक्त ‘गड’ मिळाला, पण त्या ‘गडा’ला संरक्षण देणारा सांस्कृतिक परंपरेच्या सम्यक् भानाचा मजबूत दरवाजाच नव्हता.‘जीवनाभिमुख पद्धतीने सर्वंकषपणे कलेकडे पाहून व्यक्तिमत्त्व फुलवण्यासाठीची कलेची उपयुक्तता समजणे, हे टागोरांसारख्या प्रतिभावंतांचेच काम. त्यासाठी जगण्यावर निष्ठा हवी. समाजाच्या अंत:प्रवाहांचे भान हवे. कलांवर विलक्षण प्रेम हवे आणि अवतीभवतीच्या माणसांशी निसर्गासह नाते हवे. ग्रामीण सहकारी बँक उभारणे, बाग फुलवणे आणि शाळा चालवणे हे नोबेल विजेत्या कवीला तेव्हाच एका वेळी करता येऊ शकते! मला उगाच वाटतं. अगदी एवढी नसेल, पण त्या आसपास जाण्याची प्रतिभा पुलंमध्ये होती. म्हणून तर ते टागोरमय झाले. टागोरांचे प्रयोग पुलंनी मराठी मुलुखात केले असते तर मराठी भूमीचे भाग्य थोर ठरले असते. पण ती संधी घेता आली नाही. पुलंना टागोर थोडे उशिरा भेटले, हे त्याचे एक कारण असावे किंवा महाराष्ट्राने पुलंना ‘स्टारडम’च्या विळख्यात जखडून टाकल्याने त्यांना तेवढा श्वास घेता आला नसावा. अंतू बर्व्याचे किस्से आणि पुलंच्या कोट्यांनी आपल्या रसवंतीला बहर आणणाऱ्या पु. लं. प्रेमींना असे पु. ल. किती झेपले असते, हाही वादाचा विषय. टागोरांच्या प्रतिभेचे आज आपल्यात कोणी नसेलही, पण हा मूलगामी विचार घेऊन काम तर करावेच लागणार आहे.

## विचार-वेडे आणि वाकडे

# खरं सांगायचं तर ..



अवधुत परळकर

खरं सांगायचं तर खरं बोलण्यापेक्षा खोटं बोलणंच अधिक फायदेशीर असतं. माणसानं खरं कधी बोलू नये. पावलोपावली खोटं बोलत राहावं. दिवस असेच आहेत.

लोकप्रिय राहण्याचा आणि सगे सोयरे, मित्र मैत्रिणी यांच्याशी चांगले संबंध टिकवण्याचा नामी मंत्र म्हणजे खोटं बोलत राहणं. मित्रांच्या प्रत्येक कृतीला, प्रत्येक मत प्रदर्शनाला अनुमोदन देत राहणं. जवळच्या मित्रानं तरी आपल्याशी खोटं बालू ,वागू नये असं आपल्याला वाटत असतं. आपल्या लिखाणावर, आपल्या कलाकृतीवर, आपल्या स्टेज परफॉर्मन्सवर मी अगदी खरंखुरं मोकळेपणानं मत व्यक्त करावं असा माझ्या मित्रांचा नेहमी आग्रह असतो. पण मी तसं केलं, म्हणजे खरंखुरं मत व्यक्त केलं, की ते दुसऱ्या क्षणाला नाराज होतात. हा काय समजतो स्वत:ला, जगातलं सगळं शहाणपण याच्यापाशीच आहे की काय असं ते बोलू लागतात. काही जण माझ्याशी असलेले मैत्रीसंबंधच तोडून टाकतात.

त्यांना मला समजावून सांगाव लागतं, की बाबांनो, माफ करा, मी जे व्यक्त केलं ते माझं व्यक्तिगत मत आहे. तुम्ही ते मागितलंत म्हणून मी ते दिलं. तुमच्या दृष्टीनं चांगली गोष्ट म्हणजे, त्यात तथ्य असण्याची शक्यता फार कमी आहे. कारण माझी बुद्धी, माझा अभ्यास यथातथाच आहे, त्यामुळे माझं मत तुम्ही मनावर घ्यायची गरज नाही. अनेकांनी तुमची फोनवरून प्रशंसा केली आहे ती माझ्या अभिप्रायापेक्षा जास्त महत्वाची आहे; पण उपयोग होत नाही. त्यांना माझा हा नम्रपणा खोटा वाटतो, माझा डिफेन्स वाटतो. काय करायचं अशा परिस्थितीत? मग मी स्वत:हून माझ्या बौद्धीक क्षमतेविषयी (खरं तर अक्षमतेविषयी) थोडी अधिक माहिती देतो. त्यावरही त्यांचा विश्वास बसत नाही.

स्पष्टोक्ती माझा सर्वात प्रिय आहे असं निक्षून सांगणारे माझे अनेक मित्र माझ्या अशा स्पष्टोक्तीनंतर माझ्यापासून दहा हात दूर गेले आहे. मी रस्त्यात दिसतो की फूटपाथ बदलतात. याला माझा नाईलाज आहे. माझ्या स्वभावाला माझा नाईलाज आहे, असं मी त्यांना सांगून बघतो. त्यांची नाराजी काही दूर होत नाही. वास्तविक मला मत विचारून त्यांनी ती स्वत:हून ओढवून घेतलेली असते.

मी विज्ञानाचा आधार घेऊन त्यांना काही गोष्टी सांगू पाहतो.

मी त्यांना गुणसूत्रांबद्दल, डीएनए बद्दल सांगतो. आपले डीएनए आपले गुण, अवगुण, बौद्धीक क्षमता, बौद्धीक मर्यादा ठरवतात. माझा रंग सावळा असेल, माझं नाक लांब असेल तर त्याला जसा माझा नाईलाज आहे तसा माझ्या मनातल्या प्रतिक्रियांना माझा नाईलाज आहे. आपल्या रक्ताचा गट बी असेल तर त्याबद्दल जशी आपली तक्रार असता कामा नये, तशी आपल्या किंवा इतरांच्या स्वभावाबद्दल आपली तक्रार असता कामा नये. त्याबद्दल आपण फार कुरकुर करता कामा नये. दुसरा माणूस आपल्या मनासारखा वागत नाही. गैर बोलतो, वागतो म्हणून आपण चिंता करत बसू नये. आपं मनस्वास्थ्य बिघडवू नये. शक्य असेल तर आपण त्यांच्याशी संपर्कटाळावा; पण अनेकदा आपल्याकडून हे होत नाही. जगताना आपल्याला भोवती माणसं लागतात. ती आपल्याविषयी बरं बोलत राहिली की आपल्याला बरं वाटतं. आपल्याला काम करायला हुरूप येतो, आपली जगण्याची उमेद वाढते.सर्वांना, अगदी माझ्यासकट सर्वांना, मित्रांनी आपली खोटी स्तुती केलेली हवी असते.

किंबहुना त्यासाठीच आपण आपल्याभोवती मित्र परिवार गोळा केलेला असतो. आपल्याला श्रोते हवे असतात. सोमेगोमे श्रोते नव्हेत तर आपल्या विचाराला दाद देणारे श्रोते.

खुषमस्कऱ्यांच्या गराडयात राहायला केवळ राजकीय नेत्यांनाच नाही तर आपल्यालाही आवडते. आपण आता हे स्वत:शी कबुल करून टाकूया.

निंदकाचे घर असावे शेजारी.. असं आपण म्हणतो खरं पण ते शेजारी म्हणजे शेजारच्या राष्ट्रात, पाकिस्तानात किंवा चीनमध्ये असावे. शेजारचा फलॅट आपण आपल्या स्तुतिपाठकाला द्यावा.

अनेकदा आपण आपला शेजार याच धूर्त भावनेतून निवडतो. आपण लाईफ - माईन्डेड - म्हणजे समविचारी व्यक्तींना आपल्या परिवाराचा सदस्य करून घेतो. ही देखील एक प्रकारची जातीयता आहे.

ते काही असो. नातेवाईक निवडता येत नाहीत मित्र निवडता येतात ही फार छान सोय आहे. पण आपली निवड काही वेळा चुकते. आणि मग पश्चात्तापाची वेळ येते. कोठून याला आपल्या कळपात.. असं एखाद्याबाबत होऊन जातं. जी स्थिती आज माझ्या मित्रांची माझ्याबाबत झाली आहे.

घटस्फोट घेणं कटकटीचं असतं म्हणून अनेक जोडपी गुण्यागोविंदानं संसार करताना दिसतात, तसं सध्या चालू आहे.

या विवेचनावरून, आख्यानावरून तुम्हाला असं वाटेल की, मी कोणी स्पष्टवक्ता आहे आणि स्पष्टोक्तीमुळे परिवारात खूप खूप अप्रिय आहे. तर तो समज खोटा आहे हे मला स्वच्छपणे सांगायला पाहिजे. मी काही सदासर्वदा खरं बोलत नाही.

आपण नेहमी खरं बोलतो असा कोणी दावा करत असेल तर तो सर्वात खोटारडा माणूस असं पक्कं समजून चला.

आयशप्पत.. किंवा माँ की कसम .. अशी सुरूवात करून लोक धादांत खोटं बोलत असतात. कोर्टात नाही का खून केलेला माणूस गीतेवर हात ठेवून .. ईश्वरसाक्ष खरं सांगेन खोटं सांगणार नाही.. असं बिनधास्त बोलत असतो.

इथं मी गीतेवर हात न ठेवता तुम्हाला सांगू इच्छितो की, मी स्पष्टवक्ता नाही.

तुम्हाला म्हणून सांगायला हरकत नाही की अशा फार कमी वेळा आहेत की जेंव्हा मी खरं बोलतो. एरवी मी सर्रास खोटं बोलत असतो. मात्र ते बोलताना आपल्या खोटं बोलण्यानं कोणाचं काही नुकसान होणार नाही याची कायम काळजी घेत असतो. माझं खोटं बोलणं हा माझ्या बचावाचा, किंवा फायद्याचा भाग असतो. डिप्लोमॅसी म्हणू शकता तुम्ही.

काही वेळा खरं बोलून इतरांना दुखावण्यापेक्षा मी खोटं बोलणं पसंत करतो.

कालचचं सांगतो. वाचनालयातले एक गृहस्थ मला म्हणाले, प्रभाकर पेंढारकरांचे 'एका स्टुडिओचं

आत्मकथन' वाचलं की नाही? फार छान लिहिलेय हो.

मी त्यांना म्हटलं, की नाही वाचलं अजून.

खरं सांगायचं तर मी ते पुस्तक वाचलं होतं, पण मला ते अजिबात आवडलं नव्हतं.

'थ्री इडियटस्' चित्रपटाबाबत माझ्या एका मित्रात एकदा जोरदार चर्चा चालू होती. प्रत्येकजण आपल्याला तो किती आवडला हे सांगत होता. मी गप्प राहिलो. दोन दिवसापूर्वीच मी तो सिनेमा पाहिला होता, आणि मला तो अत्यंत बालिश वाटला.

अशाप्रकारे गप्प बसून स्वत:चं मत लपवणं हे देखील काही चांगल नाही. खोट बोलणंच असतं ते .. अशा प्रकारे खोटं मी अनेकदा बोलतो. खरं बोलायची पाळी आली की धूर्त मौन धारण करतो. नाटक संपल्यानंतर ग्रीनरूममध्ये जाऊन तुम्ही कधी तुमच्या कलाकार मित्रांना भेटलाय आहात?

तिथं तर खोटं बोलण्याची स्पर्धा सुरू असते. नाटक टुकार असलं तरी तसं ते कोणी आपल्या मित्राला कशाला सांगेल? चित्रकला प्रदर्शनाच्यावेळीही तेच.

पुस्तक प्रकाशन समारंभात तर व्यासपीठावरून पुस्तकावर खोटं खोटं बोलत राहाणं ही प्रथाच आहे. प्रसंगोचित भाषण म्हणजे दुसरं काय असतं? खरं बोलणं म्हणजे औचित्यभंगच नाही का? ऑफिसात बॉसशी बोलताना हरिश्चंद्राची भूमिका घेतली तर अर्धचंद्र मिळण्याची गॅरंटी.

मी तर ऑफिसात माझ्या सहकाऱ्यांशी खोटं बोलत असे. दूरदर्शनवर काम करत असता बातम्या वाचून रूममध्ये आलेल्या प्रत्येक वृत्तनिवेदकाला मी सांगत असे - दान वाचलंस म्हणून.

निवेदकाच्या चेहऱ्यावर एकदम प्रसन्न हास्य उमटत असे. वृत्तविभागात हा एकच हुशार माणूस आहे की ज्याला निवेदन तंत्राविषयी बरंच काही कळतं, असं तो इतरांना सांगत सुटायचा.

मी विचार केला उद्या मी एखाद्या वृत्तनिवेदकाला सांगितलं.. तुझे उच्चार सदोष आहेत आणि तूझी वाचण्याची पध्दतही चुकीची आहे... तर ? तर त्याचा मेक-अपच उतरून जायचा आणि तो मनात म्हणायचा, 'गाढव लेकाचा, उच्चाराबिच्चारातलं याला काय कळतं.'

तर खोट खोट बोलण्याच्या या खऱ्याखुऱ्या गमतीजमती जाऊ द्या.

एकूणात खोटं बोलणं हा आपल्या जीवनशैलीचा भाग झाला आहे हे तुम्हालाही मान्य होईल. माणसांना खास करून आपल्या प्रियजनांना न दुखावणं हा सद्हेतू त्यामागं असतो. त्यामुळे यात वाईट काय असं तुम्ही म्हणालं?

तुमच्या प्रश्नाचं खोटं उत्तर म्हणजे - वाईट काहीच नाही.

आणि खरं उत्तर आहे - वाईट आहे. निश्चित वाईट आहे.

याचे परिणाम दूरगामी आहेत. खोटं बोलून आपण काय साधतो?

खोटं बोलून आपण आपल्या माणसांमध्ये त्यांच्या क्षमतेविषयी चुकीचे भ्रम निर्माण करत असतो.

यातून घडत नाही, बिघडत जातो...

मित्रांच्या कलेविषयी, व्यक्तिमत्वाविषयी, खरा अभिप्राय दिल्यानं तो मित्र काही काळ नाराज होईल, कदाचित कायमचा नाराज होईल. तुम्ही त्याच्या मनातून उतराल, त्याच्या डायरीतून तुमचं नाव कटाप होईल, हे सगळं खरं आहे. पण तुम्ही त्याचे खरे हितचिंतक असाल तर मैत्री टिकावी एवढया स्वार्थी हेतुनं त्याच्या मनात भ्रम निर्माण करणार नाही. त्याच्या कलात्मक विकासाच्या आड यायला कारणीभूत ठरणार नाही.

तुम्ही त्याचं भलं चिंतू इच्छीता की वाईट यावर तुमचं हे स्पष्ट बोलणं, वागणं अवलंबून आहे. आपली कलाकृती चांगली नाही, आपलं लेखन दर्जेदार नाही, आपण जे बोलतोय त्यात तथ्यांश नाही. आपण आपली गुणवत्ता वाढवली पाहिजे हे या आपल्या मित्राला कधी कळणार?

आपण प्रामाणिकपणे आपलं त्याच्या कामाविषयी आपलं मत व्यक्त करण्यानं त्याची मैत्री कोसळून पडणार असेल तर अशी मैत्री काय योग्यतेची? ती कोसळून पडलेलीच बरी नाही का? कशाला हव्यात एकमेकांशी खोटया मैत्रया ? .. आणि असंही असू शकेल, तुमचं त्याच्याविषयीचं, त्याच्या कलेविषयीचं मत चुकीचंही असेल. विषयातलं काही कळत नसता त्यावर काही ना काही कॉमेंट करायची हौस आपल्याला असते ना? तुम्ही खरोखरची मतप्रदर्शन केलंत तर काही आभाळ कोसळणार नाही. मग कशासाठी खोटं बोलायचं?

स्वत:च्या बचावासाठी माणूस जेंव्हा खोटं बोलतो तेंव्हा मात्र त्याचं समर्थन करता येत नाही. पण त्याचबरोबर त्याच्याविरूध्दही बोलता येत नाही.

माझा फोन आला तर मी नाही म्हणून सांग.. अशी पालकांची बोधवचन ऐकत ऐकत तर आपण लहानाचे मोठे होतो. मुद्दामहून खोटं बोलण्याचं शिक्षण घ्यावंच लागत नाही. शाळेतले दिवस आठवा. कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय आपण शाळेत मास्तरांसमोर कसे सर्रास खोटं बोलायचो. मास्तर त्यांच्या हेडमास्तरांसमोर खोटं बोलायचे, हेडमास्तर स्कूल इन्स्पेक्टरसमोर.

मोठे होत गेलो आणि बघता बघता खोटं बोलणं ही श्वास घेण्यासारखीच ती एक सहज क्रिया होऊन बसली. खोटं बोलत बोलत मोठे झालो हे खरं असलं तरी खोटं बोलता येण्यासाठी मोठं होण्याची तशी गरज नव्हती. एकही शब्द बोलता येत नाही, आसपासची माणसं ओळखतो यत नाही अशा तान्हुल्या वयात मुलं दुधासाठी खोटं खोट रडतात.

भुकेपोटी खोटं बोलायची ही युक्ती मोठेपणी उपयोगी पडते.

पण भुकेप्रमाणे कसल्या न कसल्या भितीपोटीही माणसांना खोटं बोलावं लागतं.

गुन्हेगारांच्या तोंडून सत्य बाहेर यावं म्हणून पोलीस थर्ड डिग्रीचा वापर करतात. या माराच्या भितीनं तो खरं बोलावा ही अपेक्षा. पण बऱ्याचदा या माराच्या भीतीनं न केलेले गुन्हे आरोपी कबूल करतात. नंतर कोर्टात आपला जबाब फिरवतात.

लहानपणी वडिल आणि शिक्षक यांच्यासमोर आपल्याला खोटं बोलावं लागायचं ते तरी आणखी कशाच्या भितीनं? खोटं बोलल्याचं पालकांना कळल्यावर पुन्हा मार बसायचा तो वेगळा. पण अशा मारातून कोणीच कसले धडे घेत नाही. नसतातच घ्याचे. पुढील जीवनप्रवास सुकर होण्यासाठी ही कला कामाला येणार असते. होय कलाच. मोठेपणी खोटं बोलण्याला कार्यालयीन कामकाजात आणि बाहेरच्या जगातही कलेचा दर्जा प्राप्त होतो. या कलेत खूप प्राविण्य मिळवणारी माणसं राजकीय क्षेत्रातही छान करिअर करू शकता, अगदी राष्ट्राध्यक्ष पण बनू शकता.

खरं सांगायचं तर खरं बोलण्यापेक्षा खोटं बोलणं अधिक फायदेशीर असतं असं मी जे मघापासून तुम्हाला सांगू पाहतोय ते काही खोटं नाही.

# आय एम ए रेबेल



अखिलेश परब

ती वेगळी होती. तिच्या सगळ्याच बाबतीत स्वतंत्र संकल्पना होत्या, ध्येयं होती, स्वप्नं होती आणि पुस्तकी भाषेत मांडता येईल असं बरंच काही होतं! पण सगळं सगळं स्वतंत्र आणि वेगळं.. जाणवण्याइतपत वेगळं. एकटी रहायची, मोजका जनसंपर्क, घरात असली तर एका हातात पुस्तक आणि दुस-या हातात कॉफीचा मग अशा अवतारात. एखाद्या स्त्रीने ज्या पद्धतीने समाजात राहू नये, असं म्हणतात त्या पद्धतीनेच ती राहायची. बंडखोर प्रवृत्ती, बक्कळ पैसा..लोकांनी काढलेल्या चित्रांची प्रदर्शनं मांडून आणि ती विकून कमवलेला. पस्तीशी मध्ये देखील एखाद्या तरुणीला लाजवेल अशी फिगर.. मी तिच्याकडे जायला लागलो तेव्हा मला या गोष्टी कळत नव्हत्या, असं नव्हतं. पण ते नक्कीच तिकडे जायचं कारण नव्हतं! दरवाजावर तीन नॉक आणि एक थाप मारली तरंच दरवाजा उघडला जायचा आणि हे सगळ्यांना माहिती देखील नव्हतं.

ती आधी आमच्या सोसायटीत रहायची. लेटर बॉक्स मधून लाईट बिल्स कलेक्ट करायचं सौजन्य सुद्धा दाखवायची नाही. महिन्यांची लाईट बिल्स (तेव्हा आतासारखी एका महिन्यात लाईट कट व्हायचा प्रकार नव्हता, 'एमेसीबी' कधीच महावितरण एवढं कडक नव्हतं व्वा!), कुठल्या तरी प्रदर्शनं, एग्झिबिशनच्या आमंत्रणांनी तो लेटर बॉक्स ओसंडून वहायला लागला तेव्हा मीच एकदा तो सगळा कचरा गोळा करून तिच्या दरवाजात गेलो.. जनरल एटीकेट्सनुसार तीनदा नॉक केलं आणि माझ्या हातातून तो पसारा खाली कोसळला! आधार घ्यायला मी दरवाजाला हात लावला आणि अशा पद्धतीने मी पहिल्यांदा ती अलिबाबाची गुहा योगायोगाने उघडण्यात यशस्वी झालो! सगळंच नाटकी!

तिने दरवाजा उघडला तेव्हा मी तो पसारा गोळा करत होतो..

'तुमची पत्रं येतात खाली..एवढी आलीयेत'

'हौ डू यू नो द अक्सेस कोड?'

'व्हॉट अक्सेस कोड? आय डोन्ट नो एनी अक्सेस कोड'

ती विचलित झाली आणि दुस-या क्षणी सावरत मला म्हणाली 'कम ऑन इन..'

मग आम्ही बराच वेळ बोललो..गप्पा मारल्या. मस्त होती बोलायला... त्यानंतर मग कधीही एकटं एकटं वाटलं,कंटाळा आला, कोणाशी बडबड करावीशी वाटली, चर्चा करायची खुमखुमी आली, गप्पा माराव्याश्या वाटल्या कि मी बिनधास्त तीन नॉक्स आणि एक थाप मारून माहितीचे दरवाजे उघडू लागलो..

'तुम्ही..'

'मला एकेरी हाक मार'

'मी तुमच्यापेक्षा लहान आहे वयाने' मी म्हटलं.. 'तुमचं वय जास्त आहे' हे स्त्रीला डायरेक्टली सांगायचा हा दुसरा चांगला मार्ग!

'आई सुद्धा मोठी असते न? आणि मावशी ? आत्याला काय म्हणतोस? ताईला?'

'....'

'आपलं यातलं कुठलंच नातं नसलं तरी फक्त वयामुळे तू मला अहो जाहो करावंस हे मला मुळीच पटत नाही, अगं म्हटलंस तरी चालेल मला..'

'बरं... तू इथे देवपूजा करत नाहीस?'

'नाही..'

'कंटाळा आहे की तू नास्तिक आहेस?'

'माहित नाही'

'म्हणजे?

'देव आहे कि नाही मला माहित नाही'

'हे सगळं निर्माण करणारा कोणीतरी असेलच ना ? ती शक्ती म्हणजे 'देव' असं मानायला काय हरकत आहे?'

'मी एक विचारू?'

'विचार..पण जास्त कठीण नको..' मी म्हटलं

'चांगलं वागणा-या बरोबर तुझा देव चांगलं वागतो आणि वाईट वागणा-याला अद्दल घडवतो,बरोबर?'

'हो..' मी मान तुकवली

'मग माणसात आणि देवात फरक तो काय? आपली न्यायव्यवस्था तर तेच करत असते!'

'....'

'जर देव असेल तर तो वाईट गोष्टी मुळातच का होऊ देईल? स्वतःचं अस्तित्व सिद्ध करायला? हे धर्म , फॉलोअर्स आहेत तोपर्यंत ठीक आहे पण त्यांच्या प्रसारासाठी जिहाद, क्रूसेड्स , धर्मयुद्ध.. हे कुठला देव सांगतो आणि का? जो मला मानत नाही तो काफिर, तो सैतान असं अल्ला कसं काय म्हणत असेल? प्रोटेस्टन्ट, रोमन कथेलिक वगैरे प्रकार कशाला असले असते? हिंदूंमध्ये कोट्यावधी देव कसे काय असले असते? दोन वेगवेगळ्या धर्मातली युद्धं एकवेळ परवडली पण एकाच धर्मात दुजाभाव? मग कसा आणि का विश्वास ठेवायचा देवावर?'

'...' माझं ज्ञान तिची उत्तरं द्यायला फारच तोकडं होतं,किंबहुना मी असा तिरकस विचार केला नव्हता. स्पष्टच सांगायचं झालं तर डेअरिंग झालं नव्हतं देवाबद्दल अशा जाहीर प्रतिक्रिया व्यक्त करायचं!

'धर्म बापा ज्याचा त्यांनी,प्रिय मानावा प्राणाहुनी,परी विधर्म्याच्या ठिकाणी, अलोट प्रेम धरावे! या मताची आहे मी..'

'मस्त आहेस तू!' मी दिलखुलास प्रतिक्रिया देऊन टाकली.

'मी आणि मीच' हे तिचं जीवनसूत्र होतं बहुतेक. ना नातेवाईकांची बंधनं, ना कोणाच्या आणाभाकांचं गुंतलेपण! तिचा षश्र्रीं सुखवस्तू या कॅटेगिरित मोडत होता.. सगळ्या वस्तूंची रेलचेल. पण तिच्या घरातली मला आवडणारी गोष्ट म्हणजे मोठ्ठ्या बिन लरसी! कुठून आणल्या होत्या कोणास ठाऊक! सगळ्याच गोष्टी ती सांगायची असंही नाही.विचारल्या तरी! पण दोघांनाही असणा-या फावल्या वेळात जेव्हा तिच्याकडे जाणं व्हायचं तेव्हा त्या लरसी वर आरामात रेलून बसायचं आणि काहीबाही खात, टीव्ही बघत गप्पा कुटायच्या. ऑसम फिलींग!!

'तू अशी का राहतेस? एकटी एकटी? सोसायटीतल्या लोकांत जावं, इथल्या चारचौघात मिसळावं, मिटींग्ज अटेंड कराव्यात, मतं मांडावीत असं नाही वाटत तुला?'

'नाही'

'का?'

'कारण मला सहानुभूतीच्या नजरा नको आहेत..'

'कोण तुला कशाला सहानुभूती दाखवेल?'

'तू लहान आहेस अजून..'

'तुझी देव-धर्माविषयीची मतं ऐकून पचवणा-याला तू लहान म्हणतेस?'

'...'

'कोण दाखवतं तुला सहानुभूती?'

'पुरुष'

'...' मी निःशब्द...

'एक या वयातली स्त्री एकटी राहते म्हटल्यावर एकजात या जमातीच्या नजरा आपोआपच वळतात.. त्या वळणारच. स्वाभाविकच आहे ते. पण आता सवय झालीये.आय इग्नोर इट..बट आय डोन्ट वॉन्ट टू गिव्ह देम अ लहरपपशश्र !'

'तुझ्या कोणी प्रेमात नाही पडलं? किंवा तू कोणाच्या?'

ती मंद हसली. पण एव्हाना तिच्या हास्यातून जो अर्थ अपेक्षित असतो तो नसतो हे मला कळून चुकलं होतं. मी तो अर्थ शोधण्याच्या भानगडीत पडलो नाही!

'मी नाही पडले कोणाच्या प्रेमात.. माझ्या प्रेमात कित्येकजण पडले... पण मला काय करायचंय यापेक्षा काय करायचं नाही ते आधीपासूनच माहित होतं..'

'आई-बाबा?नातेवाईक?

'बाबा एक्स्पायर. माझ्या लहानपणीच. आणि त्यामुळे आई कोलमडलेली, आयुष्यभर देव देव करत होती, कोणाकोणाचं म्हणून वाईट केलं नाही बिचारीने. तरीसुद्धा तिला काय काय भोग भोगावे लागले.. '

'म्हणून तुझा देवावर विश्वास नाही?'

'तेही कारण असेल कदाचित..तू काय माझा इन्टरव्यू घेतोयस का?' ती हसत म्हणाली..'माझ्या आईने आयुष्यभर देवाचं केलं तर तिने नको नको ते भोगलं, मी नाही केलं तरी मी सुखात आहे. राजकारणी लोक, गुंड लोक भ्रष्टाचार करून मोठ्ठाली देवळं उभारतात, संगमरवरी देवघर बांधतात, देवस्थानांना मोठमोठ्या देणग्या देतात! करू शकतोस तू हे सगळं एक्स्प्लेन?'

'मागच्या जन्माची पापं असतील..म्हणजे अशीही एक थियरी आहे...' मी चाचरत म्हणालो

तू पुन्हा हसली.'असल्या थियरिज मांडून आपण आपलंच समाधान करून घेत असतो असं नाही वाटत तुला?'

मी-अर्थातच- गप्प बसायचो!!

--

आर्टीस्ट लोकांच्या आर्टला प्रदर्शनांची दालनं उघडी करून देणं हे तिचं काम! कुठून कशी ती या व्यवसायात शिरली ते देवालाच ठाऊक..नव्हे तिलाच ठाऊक..त्या बिचा-याने सुद्धा एवढं दुर्लक्ष करणारी व्यक्ती पाहून तिच्यात काडीमात्र इन्टरेस्ट ठेवला असेल असं मला वाटत नाही! पण अगदी टांकसाळ असल्यासारखे पैसे अक्षरशः छापत होती. खर्च स्वतःवर होईल तितकाच..काम तिला हवं तेव्हाच आणि हवं तितकंच.. बहुतेक मीटींग्ज बाहेर चांगल्याशा हॉटेल किंवा लाउंज मधेच होत असत त्यामुळे घरी कोणी येण्याचा आणि घरच्या गोष्टींमध्ये दखल देण्याचा प्रश्नच मिटला होता.

'तुझा उद्देश काय आहे या सगळ्यामागचा?' रससळ खाता खाता एकदा ती कसे पैसे कमवते आणि कशी उधळते हे सांगत असताना मी तिला विचारलं..'

‘म्हणजे ?‘

‘म्हणजे सामान्य लोकांचे पैसे कमवण्याचे उद्देश असतात चांगली जीवन-शैली, भविष्यात चांगलं कुटुंब,मुलं, त्यांची शिक्षणं,लग्न वगैरे वगैरे‘

‘मग बरोबर आहे ना? माझा उद्देश आहे चांगली जीवनशैली..बास! मी वर्तमानात जगतेय, माझ्या स्वतः साठी, वाटलंच तर इतरांसाठीही.. माझं घर आहे, गाडी आहे, ऐशोराम आहे, ही पुस्तकं आहेत ती माझी मित्र आहेत,प्रदर्शनातून थोरामोठ्यांचा सहवास मिळतो..नेहमी वेगवेगळी माणसं भेटतात, मला वाटतं त्या लोकांना मी भेटू शकते, माझं कामाचं स्वरूप सांगितल्यावर भल्या भल्या कलाकारांना मला टाळणं शक्य होत नाही!! मी मात्र मला नको त्या लोकांना टाळू शकते. पाहिजे ती गोष्ट,पाहिजे त्या वेळी पाहिजे तिथे मला मिळते..अजून काय हवं? नाहीतर म्हातारपणी हेच म्हणावं लागेल न कि जिवंत होते पण जगायचं राहून गेलं?‘

‘तरीपण...स्वतःचा संसार वगैरे...‘ मी चाचरत म्हणालो..

‘मला नको आहेत ही बंधनं..मुळात माझा सामान्य समाजाशी संपर्कच कमी आहे..त्यामुळे त्या समाजासाठी असल्या गोष्टींमध्ये गुंतून पडण्यात मला स्वारस्य नाही. आता त्या लॉ कॉलेज रोड वर एक अनाथालय आहे, तिथे मी देते देणगी..  मुलांसाठी..‘

ती उठून आत गेली आणि हातात कसलेसे कागद घेऊन बाहेर आली. ती प्रगती पुस्तकं होती. एक एव्हरेज प्रगती दाखवणारं आणि उरलेली दोन बिलो एव्हरेज!!

‘लोक इथे देणगी देतात आणि आपण पोसत असलेल्या मुलानं पहिलंच यावं अशी अपेक्षा ठेवतात! बाबांनो तुम्ही कधी एखाद्या इयत्तेत तरी पहिले आलात?‘ ती छद्मी हसली..‘मी या मुलांना पोसते.. कोणतीही अपेक्षा न ठेवता.. 'तुम्ही तुमचं जीवन तुमच्या पद्धतीनं जगा' एवढंच सांगणं असतं माझं त्यांना!'

‘पण..'

‘कशाला हवेत रे ‘पण' आणि ‘परंतु'? मी जगतेय तसं मला जगू देण्यात जगाला कसला त्रास आहे ते कळत नाही.. तू माझा सगळ्यात लहान सल्लागार आणि आई सगळ्यात मोठी! ‘

‘सल्ला नाही पण लोक काहीबाही बोलत राहतात..इव्हन आपल्या सोसायटीत...‘

‘बोलेनात का? अभिरुचीसंपन्न जगात वावरत राहिलं ना तर कदाचित गॉसिप्स, चारित्र्य, लग्न, मुलंबाळं यांमधलं - माझ्या भाषेत- या दुय्यम गोष्टीमधलं स्वारस्य कमी होतं आणि माझ्या बाबतीत तेच झालंय. व्हू सेज व्हॉट अबाउट मी--आय जस्ट डोन्ट केअर!‘खांदे उडवत ती म्हणाली ‘तू इथे येतोस तेव्हा तुझ्याबद्दल कोणी काही बोलत नाही आणि माझ्याबद्दल बोलतात यावरून सिद्ध काय होतं? हा लायकी नसणारा समाज नेहमी बाईलाच वाईट चालीचा ठरवतो.. हो कि नाही?‘ ती पुन्हा हसली..मी गडबडलो. अगदी मुळापासून हललो!

तिने सदाशिवेत एका महागड्या प्रोजेक्टमध्ये रेडी पझेशन षश्ररीं बुक केला हि न्यूज आमच्या सोसायटीत वा-यासारखी पसरली आणि त्यापेक्षा वेगाने फुटलं तिच्याबद्दलच्या अफवांचं पेव..! इतकं की तिच्या घरात जाणा-या प्रत्येक व्यक्तीवर नजर ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाने जणू स्वखुशीने घेतली होती. माझ्यासारख्या 'सामान्य' माणसाने आपलं स्वतःचं चारित्र्य आणि भविष्य जपायचं असेल तर तिच्या घरी न गेलेलं आणि तिच्या स्वच्छ चारित्र्याबद्दल इतरांकडे न बोललेलंच बरं हे माझं मीच ठरवून घेतलं. ती कधी समोर दिसली तर नजर टाळून कसं जाता येईल याकडे माझं लक्ष असायचं..

एकदा तिने मला थांबवलं.. ‘इतरांचं एक्स्पेक्टेड होतंच..पण माझे सगळे फंडे माहित असताना देखील निदान तुझ्याकडून अशा वागण्याची मला अपेक्षा नव्हती.पण तू सुद्धा...‘

‘माझं मन मला खात होतं, पण तू म्हणतेस त्या समाजाच्या कक्षा तोडायचे गट्स नाहीयेत गं माझ्यात.. तुझ्यासारखं उच्च अभिरुची असणा-या लोकांत मला वावरायचं नाहीये..मला या सामान्य कुवतीच्या लोकांमध्येच रहायचंय.. तू इथे असताना त्यांना विरोध करून मी राहू शकेनही कदाचित पण पुढे तू इथून गेल्यावर काय?‘

‘बरोबर आहे.. मी उद्याच निघतेय..‘

‘तुझा नवीन पत्ता...’

‘लिहून घेतोस?‘

‘अं..नको.. तू इथे पत्र पाठव कधीतरी...’ मी माझ्याच नकळत सेफ मार्ग शोधत होतो..एव्हाना वॉचमन पासून लहान मुलांबरोबर असणा-या बायकांपर्यंत सगळ्यांच्याच नजरा मला बोचायला लागल्या होत्या.. ती पुन्हा हसली..मी एक formality म्हणून पत्ता विचारलाय हे तिने ताडलं.. माझ्याबद्दलची कीव तिच्या त्या हास्याच्या लकेरीतून दिसत होती.

ती निघून गेली. अपेक्षेप्रमाणे नंतर तिचं काही पत्र वगैरे आलं नाही. त्यानंतरच्या काही दिवसांत सोसायटीतल्या काहीजणांनी माझ्याकडे पिंका टाकून तिचा अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. मीही त्यांच्यातलाच असल्याचं भासवलं. भासवलं कशाला? होतोच. मला तरी कुठे काय माहित होतं? आधीच म्हटल्याप्रमाणे काही गोष्टी ती, एनीवेज, विचारल्या तरी नाही सांगायची.आयुष्यातल्या एका अवचित स्त्रीचा अध्याय संपला पण त्यानंतर जाणवलं कि आपल्यालाही असंच जगणं जगायचं होतं; जे स्वैर नसेल पण स्वच्छंद असेल, जे कोणीतरी जुन्या काळात ठरवलेल्या किचकट नियमांनी बांधलेलं नसेल पण स्वतंत्र असेल,जे भविष्याची निष्कारण काळजी करणारं नसेल पण वर्तमानाचा यथेच्छ आनंद लुटणारं असेल.. नाहीतर पुढे जाऊन हेच म्हणावं लागणार आहे की जिवंत तर होतो पण सालं जगायचं राहूनच गेलं!!



लीना मेहेंदळे

# तरुणाईचे जग

तरूणाई म्हणजे अल्लडपणाचे , बागडण्याचे दिवस संपलेले. आता दिवस तळपण्याचे, सळसळण्याचे, स्वप्न पहाण्याचे आणि त्यांचा मागोवा घेण्याचे.

अवकाशात अंतरिक्षयान सोडतात तेव्हा चाचणीसाठी आधी एक किलोमीटर उडू शकणारे, नंतर दहा किलोमीटर उडू शकणारे यान सोडले जाते. त्यानंतर मात्र थेट अंतराळात झेप घेणारे यान सोडले जाते. तरूणाई ही त्या झेपावणाऱ्या यानासारखी असते 'गतिमान', पण दिशा मात्र नेमकी मिळालेली नसते. तो शोध अजून बाकीच असतो.

वय वर्षे १५ ते २०. सुमारे साठ टक्के मुलीमुलं मॅट्रिक झालेली. त्यातील सुमारे वीस टक्के कॉलेजात जाणारी. महाराष्ट्रात या वयोगटाची लोकसंख्या दीड कोटीच्या घरात आहे. म्हणजे सुमारे ६० लाख तरूण-तरूणी दहावीच्या खाली, सुमारे ६० लाख दहावी शिकलेली आणि सुमारे ३० लाख कॉलेज विश्वास रमलेली. प्रत्येकाकडे आहे. अक्षम्य उत्साह आणि ऊर्जा. पण दिशा आहे का? आव्हाने काय आहेत? आणि नैतिक मूल्ये काय आहेत? त्यांचे विचार काय आहेत - किती प्रगल्भ - किती मंथनातून आले आहेत? त्यामध्ये देश आणि समाज कुठे आहे? त्यांच्याकडे कौशल्य काय आहे?

स्वामी विवेकानंद म्हणत- मला क्रियाशील तरूणी-तरूण हवे आहेत. ते मंदिरात जात नसतील, पण रोज फूटबॉल खेळून शरीरात संपदा कमवीत असतील तर मला तेच आवडतील. भारत मोठा व्हायचा असेल तर तरूणाई क्रियाशील झाली पाहिजे.

एकूण दिशा, क्रियाशीलता, विचारमंथन, स्वप्न, कौशल्य आणि मूल्य एवढया सहा मुशीतून तावून-सुलाखून बाहेर पडेल ती तरूणाई - सामर्थ्यशाली व वैभवशाली असेल, पण मग अशा मुशी तयार करणारे कारागीर आणि त्यातून मूर्ती काढणारे शिल्पकार कुठे आहेत? त्यांचाही मागोवा घ्यावा लागेल.

असे शिल्पकार सापडण्याची एक जागा निर्माण केली आहे. TED या संस्थेने चिंतनशील व्यक्तींच्या कल्पना राबवल्या तर चांगले जग निर्माण होऊ शकेल या भावनेतून सुरू झालेली ही संस्था जगभरातील अफलातून मंडळींना सुरू केलेले काम सर्वासमोर मांडायची संधी देते व त्या त्या मंडळीच्या व्याख्यानाच्या चित्रफिती जगभरात कुणालाही पाहण्यासाठी इंटरनेट वर ठेवल्या जातात.

यापैकी एका कार्यक्रमातील अफलातून आणि भन्नाट आयडिया मुद्दाम इथे मांडत आहे. बहुतेक प्रत्येक नव्या संकेतस्थळावर सदस्यत्व देताना आपण पाहातो की, तिथे आपल्याला कॅरॅक्टर आयडेंटिफिकेशन करायला सांगतात. म्हणजेच विचित्र वळणांनी लिहिलेली अक्षरे आपल्यासमोर संगणक ठेऊन सांगतो की, ही अक्षरे ओळखून शेजारी दिलेल्या जागेत लिहून काढा. हेतू हा की तुम्ही एखादे प्रोग्रॅम्ड मशीन नसून माणूस असाल तरच तुम्हाला ती वेडया-वाकडया वळणांची अक्षर वाचता येईल. ही आपल्याला वाटणारी कटकट असली तरी याची गरज आपल्याला कळते व आपण त्याबरहुकूम वागतो.

आपले वागणे लक्षात घेऊन लुई व्हान आण या व्यक्तीने भन्नाट शक्कल लढविली. त्याने थोडा तपास केल्यावर लक्षात आले की, जगभरातून (म्हणजे सुमारे सातशे कोटी जनसंख्येतून) अशा पध्दतीने कॅरॅक्टर आयडेंटिफिकेशन करणारी दररोज सुमारे २० कोटी माणसे आहेत व प्रत्येकाचे दहा सेकंद मोजले तर दररोज सुमारे ५५० हजार तासांचा वेळ म्हटला तर निरर्थक पणाने वापरला जातो. हा एखाद्या सार्थक कामासाठी वापरता येईल का? पण ते काम असे असले पाहिजे की एका माणसाचे दहा पंधराच सेकंद वापरले जातील. कुठे बरे वापरावा हा वेळ? त्याने अशी जागा देखील शोधली.

बऱ्याच जुन्या इंग्लिश पुस्तकांचे पुनर्मद्रण झालेले नाही. त्यांची सॉफट (इलेक्ट्रॉनिक) कॉपी पटकन करता येईल. यासाठी जउठ हा प्रोग्रॅम विकसित केलेला आहे. पण अनुभव असा की, विभिन्न कारणांमुळे जउठ प्रोग्रॅम सुमारे ७० टक्केच यशस्वी होतो. किमान ३० टक्के शब्द त्याला ओळखता येत नाहीत. असे शब्द माणसांकडून तपासून घेऊन लिहून काढायचे म्हटल्यास पन्नास माणसांना सुमारे पाचशे वर्ष लागतील.

पण असा संगणकाला ओळखता न आलेला एकशब्द आणि ओळखता आलेला दुसरा शब्द शेजारी शेजारी ठेऊन डबल कॅरॅक्टर आयडेंटिफिकेशन करायला सांगितले तर दररोज सुमारे ९० कोटी शब्दांचे अचूक कॅरॅक्टर आयडेंटिफिकेशन व त्यांची सॉफट कॉपी संगणकाला मिळू शकते. मग हे सर्व शब्द ज्या त्या पुस्तकाच्या ज्या त्या पानावर व ओळीवर टाकण्याचे काम संगणकच करून टाकतो. या प्रकाराने जुन्या ग्रंथांच्या सॉफट कॉपीज करण्याचे काम वीस ते तीस वर्षात पूर्ण होऊ शकते.

ही आयडिया वापरणारी एक कंपनी लुई व्हान आनने काढली. ती इतकी यशस्वी झाली की ती गुगलला आवडली व त्यांनी विकत घेतली.

आता जगभर ही पद्धत सुरू झालेली आहे आणि झपाटयाने काम होत आहे.

तुम्हीही खूप वेळा हॅकिंगचा धोका सांगत डबल कॅरॅक्टर आयडेंटीफिकेशन करा अशी भलावण करणारे संदेश इंटरनेटवर वाचले असतील. त्या मागील मूळ डोकॅलिटी अशी आहे. आता पर्यंत ७५ कोटी लोकांनी आपली दहा सेकंद दिली आहेत.

ही कथा मी इथे का मांडली? माझ्या या लेखाच्या संदर्भात महत्वाची ती कथा नसून अशा प्लॅटफॉर्म निर्माण करणारी जी TED संस्था. ती महत्वाची आहे. ज्या शिल्पकारांचा मागोवा आपल्याला घ्यावा लागेल. अशी शिल्पकार संस्था ती आहे.

व इतर शिल्पकारांनाही तिनेच प्लॅटफॉर्म दिला आहे.

त्याच धर्तीवर, पण खूप छोटया पातळीवर, एक प्लॅटफॉर्म या लेखमालेतून उभा करायचा माझा प्रयत्न राहील. बघू या काय काय घडू शकते !



फोटोग्राफी आणि भ्रमंती ...तीही एका संवेदनशील तरुण मनाने केलेली ...एक ऑसम मिलाफ ...

**पंकज कोपार्डे**

# आठवणीतला गाव

मी अधाशी असेन फार किंवा उपासलेला, भुकेला, पण आता लळा सोडवत नाही; जोडलेलं मन तोडवत नाही. कुणी विचारलं तरी तेच एक सोप्पं गावंय नकाशावरती, महाराष्ट्राच्या, भारताच्या, जगाच्या! चिमटीत नाही मावत, पण पोफळीच्या मनात आठवणींच्या बागा आहेत माझ्या. किंवा माझ्या मनात तिच्या. आठवणीतला गाव. तिथं गेल्यावर आठवणच येणार, काम होणार नाही! मन नुस्तंच रेंगाळणार, पण जंगलाची विचकाविचकी करत फिरणार नाही! नसेल, तर नसू दे; चूक माझी नाही 'ये तो वक्त का इंतेजाम है भई! नाही करणार विचकाविचकी, कारण माहितीय कुठे काय आहे ते! मग ठरलं तर 'पोफळी तर पोफळी होऊन जाउ दे बार! किती फडफड करणार एक माणूस, शोधून शोधून किती शोधणार पक्षी-प्राणी? बरं, ठरलं तर मग. मग पोफळीत काय पाहणार मित्रा? पोफळीत कुंभार्ली घाट, सोनपात्रा, पिराचा दर्गा, माझी शाळा, वाघळाचा वड, महादेवाचं मंदिर, वाशिष्टीचं धरण आणि उनाड आंब्याच्या कोया! अजून काय पाहणार? ते झाड जिथं भलामोठा गरूड दिसला; ते ओलसर पात्र जिथं वाघोबाचा पंजा पाहून धूम ठोकली मी घराकडे, ती वाट जिथून जाताना कुठंच काही दिसायचं नाही; तिच ती घराची खिडकी जिथं शिंगचोच्याचं कुंटूब येऊन बसायचं; घरामागचा जांभूळ, जांभळावरचा हळद्या, आंब्यावरची माकडं, नारळाएवढा आंबा, भाताची शेती, केशरी डोक्याच्या कस्तूर, तो तुरूतुरू धावणारा हिरवा पारवा (emerald dove) आणि kill kill म्हणत गोळा केलेली त्याची झडलेली पिसं अजून आहेत ती, तळव्याएवढ्या पिशवीत एकत्र करून ठेवलेली किती पक्षी बघितले इतक्यात मी? संपलं का अप्रूप? नसावं, अजून दिसला हिरवा पारवा की नाचल्याशिवाय उरणार नाही मी! त्या एकट्या चष्मेवाल्याला पाहण्यात किती आनंदंय! त्या पिटकुल्या फुलटोच्याचे गाल किती मऊ उबदार आहेत! नाहीच संपलं मग अप्रूप; दुणावलं असेल कदाचित! त्याचं मोजमाप नाही. सुरू झालं इथून, परत आता मी फिरून इथेच. छानंय हा कार्यक्रम. मला यायचंच होतं या गावात. शिक्षण इथे झालं म्हणून नाही; पण बरंच काही द्यायचं उरलंय म्हणून. डेंिळपसी हा किती सुंदर शब्द आहे; ते द्यायचं कसं? सांगता येत नाही; पण देत असेन थोडंफ़ार मी इथे. काय माहिती; किंवा समजूत असेल माझी. अवघडंय सारं.

मग उंब्रज मागे राहतं नि उरूलचा घाट येतो. तो केविलवाणा आहे; तो कित्येक वर्षांपासून तसाच आहे. त्यात रस नाही, कस नाही; तळलेल्या पुरीसारखा नुस्ता गोलगोल नि एक टाचणी नि फुस्स कीव करावा असा. काय करावं याचं? जाऊ दे, तो फ़ार छोटाय, नकाशावर हरवल्यासारखा. पोफळीला जाणारा सगळाच रस्ता असा वर्षानुवर्षे बदलेलाच नाही. काय हे? किती वर्षं झाली दहावीला हे गाव सुटलं ते आत्ता निवांत येतोय मी झाली की आठ वर्षं! रस्ता तसाच आहे, काही बदल नाही शेतं, घरटी, म्हैशी, निवांत कारभार. कसं रे हे मित्रा, आठ वर्षं झाली दहावीत होतास आता अठरावीत आलास, किती तो मोठ्ठा बदल! आता अख्खं उलटून सुलटं केलं मला तरी आतला भाग, बाहेरच्या भागापेक्षा असेल वेगळा; गाव ते किती केविलवाणं, म्हातारं कसं बदलणार इतक्या झटपट?

पोफळीचा घाट येतो, घाटमाथा येतो नि गाडी उताराला लागते. दरी म्हाताऱ्या कातकरीण बाईसारखी बसलीय. बाणासारखी नजर लावून, बाणेरी हातांची, बाणेरी शरीराची. वय थकलं तरी टोकदारपणा गेला नाही, अंगावरच्या

सुरकुत्या डोंगर छानपैकी घडी करून वरून इस्त्री फिरवल्यासारखे उभे करून ठेवलेत. तिच्या खांद्यावरचा एक मोठ्ठा पहाड तसाच उभाय. डायनासोरसडायनासोर. आठवणी लागल्या मला. घाट सुरूच झालाय तसा. आता बांध फुटणार.



# कुंभार्लीची थोराड कातकरीण

वाशिष्ठीचं धरण. तगडं आहे उभं अजून. तिथं मी उभाय. जुना भिडू गेला, वाईट वाटलं, आता नविन आला. गळ्यात, खांद्यावर कुठेही अडकवून फिरत राहिलो तिला वर्षभर नि एके दिवशी काही न सांगता साथ सोडली तिनं. बायनो उजव्या डोळ्याचं भिंगच गमावून बसली. होत असतं असं, उगी उगी म्हणून तिला हवं तिथं नेलं; झालं काहीच नाही.वॉरंटी मे है, बदली कर देता हू! हो बदली तर होईलच, पण मला अशीच ग्रीपचा रंग उडालेली, भिंगाआड थोडी धूळ जमलेली हवी. हीच खरं तर, नविन नको; दुरूस्त करून द्या ना! नाही शक्य हे प्रेम जपणं, असं समोरच्यानं सांगितलं. नविन घेतली. मी फार आपमतलबी आहे हे माहितीय मला, पण मनाप्रमाणे घडतही नाही काही. नविन बायनो हातात लगेच बसत नाही, भिती वाटते. मी त्याच माणसाला पुन्हा विचारतो की समजा ही सुद्धा खराब झाली तर? तर? तर नाही बदलून मिळणार, तुम्हाला जी दिली ती सुध्दा खरंतर कंपनी डिफ़ेक्ट म्हणून नाही दिलेली हेवी यूज आहे, हेवी यूज! हेवी यूज? असं कधीच म्हटली नाही रे ती मला. तिचं तुटकं मुंडकं मी उगाच लावायचा प्रयत्न करतो, डोळ्यांत आसवं येत नाहीत, पण मनाला लागतं. संपलं जुनी ती गेली, बिनतक्रार, नवी ती हाती आली. एक शांत उच्छवास धरणाच्या बाजू ओलसर आहेत. समोरच्या झाडावर पोपट दिसतो, मी सेंकदभरही डोळ्याला बायनो लावत नाही, चष्मा डोळ्यांवर झटकन उतरवत म्हणतो, इर्श्रीेी हशरवशव रीरज्ञशशीं. दिसलं, पाहिलं, कळलं, आनंद. ऐट आहे बेट्याची. पोफळीत काय काय दिसतं ते मला माहिती नाही; आठवणींत डोकावणारे जे पक्षी आहेत ते नक्की आठवतात मात्र. तिथं मग पक्षीच पक्षी, उडणाऱ्या पाकोळ्या, बगळे, वटवटे नि भिरटे! आकाशपंख दिसतो! डींरश्र ढरळश्रशव उर्श्रीव थळपस. नाव जरा संथ नि विस्तीर्ण वाटतं; पण त्या रंगाला निळा म्हणणे शोभत नाही. आकाशी रंग, पंखावर एक छोटा ढग ठेवल्यासारखा

अद्दर. त्या धरणात रात्री पायासमोर झोपलेली क्वेल आहे, पालीसारख्या चेहऱ्याचा बेडूक आहे आणि धरणाच्या पात्रात दहाएक मिनिटांनी दिसणारा बिबटा आहे. पालीसारखा बेडूक रस्त्यावर उड्या मारत पळतोय नि मी हा बेडूक आहे, हा बेडूक आहे, हा बेडूक आहे.

## वाशिष्टीचं धरण

असा जप करत त्याला हळूच हातात पकडतोय. पात्रातला बिबट्या दिसला की मन पुन्हा डोळे चोळून पाहतंय तिथंच. कुणाचाच पत्ता नाही. भिती भिनलीय माझ्यात आता पालीचा चेहरा बघवत नाही, बिबट्याची कल्पना करवत नाही!

महाकालीच्या मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर नुस्तंच चालायलाही मला मज्जा वाटतेय. महाकालीचं छोटंसं मंदिर. तिथल्या गाभाऱ्यात एक चित्र घडवलेलं, भाऊ बहिणीला लाथ मारतोय तशा भावाच्या पायांत अळ्या पडताहेत. तिथंच जोरकस आवाजात अडल्या-नडल्यांचा नवस बयेला (देवीला) ओरडून सांगणारा चड्डी घातलेला बामण, महाकालीची यात्रा, तिथे घेतलेली दीडशे रूपयांची शॉटगण! तीत प्लास्टीकाऐवजी खडे भरून पाणकोंबड्या टपकावून त्या स्टफ करून ठेवण्याचे शाळेतले माझे बेत! मी खराखुरा नाही, आठवणींवरच चालतोय. रस्ता बदललाय आता, कच्च्याचा सिमेंटचा झाला. एक पीतकंठी चिमणी (उहर्शीपीं ड्ढोंश्रवशीशव झर्शीपळर) तारेवरून सुळकन खाली. तशा बऱ्याच दिसतात, वारा भरारा आहे. मधेच एखादं वावटळ भस्सकन अंगावर येतंय, मी त्या पाठ करून कॅमेरा नि बायनो वाचवायच्या प्रयत्नात!

पोफळीत पक्षी पाहिले नाहीत मी पुर्वी, नुस्ताच भाळत राहिलो जे जे पाहिलं त्यावरती. आता पाहतोय, तर आठवणी भाळताहेत माझ्यावर. गुंतावळ आहे नुस्ती. मना-मना, कसा रे तू गधड्या, उलथून पालथून, दाखवत फिरतोस, त्याच त्या गच्च आठवणी. गंडलोय मी पुरता.

......................

दुपारच्या वेळेला माळवदेंकडे येऊन थडकलोय जेवायला. किती वर्षं झाली, आता ओळखेल का कुणी? माळवदे काकू मला पाहताचक्षणी ओळखतात. मग गप्पा. लहानपणी पण फार उपद्व्यापी होतं कार्टं, घरी खारूटी पाळायचा, कोकिळ ठेवायचा वगैरे वगैरे. भावाचं लग्न झालं ना मोठ्या? आली होती पत्रिका आम्हाला, जमलं नाही यायला, काहीतरी काम निघालं वाटतं. मग आता तुझं कधी? कधी वाजणार? मी मोठ्याने हसतो. हो, तो प्रश्नच आहे की! अंगच्या पोकळ खोडातून भलामोठा हॅ हॅ आवाज तितका निघतो. बघू सोनपात्राचं गाव पण बदललंय सगळंच. नववीत असताना पोफळीतून चालत चालत तिकडे गेलेलो, दिवसभराचा सुमारे - किलोमीटर्सचा प्रवास नि ऊन. आता सोनपात्रापर्यंत गाडी जाते, चारचाकी. तिथे उतरतो आणि गळ्यात दुर्बिण बघून एक मिल्ट्रीमॅन जवळ येतो, दारूच्या वासाचा भपकारा येतो.

काय करताय?

पक्ष्यांचा अभ्यास

चुकीच्या वेळी आला तुमी, आता नाय दिसणार पक्षी. आणि इथं कुटं दिसणार पक्षी. पक्षी रानात घावणार.

याला भर म्हणून डाव्या कानात इअरफोन अडकवलेला एक येडपट माणूस भेटतो. मला नाही बघायचेत पक्षी, मी डोंगर बघायला आलोय. ते त्यांना नाही कळत; मला डोंगर बघायचाय, पायवाटा बघायच्यात, तिथून मी जंगलात जाईन नि पक्षी बघेन पुन्हा येऊन. ती लोकं बावचळलीयेत. डाव्या कानातला इअरफोन म्हणतो, पक्षी म्हणजे कुठले पक्षी?



जे दिसतील ते

नाही, म्हणजे चिमणी बघायचीय, कावळा बघायचाय की पोपट? तुमी सांगा मी दाखवतो, आपून यायला तयार आहे.

च्या वर पक्षी आहेत इथं, वेग-वेगळ्या जातींचे, ते सगळे तुम्हाला पण माहिती नसतील, मला पण माहिती नाहीत. तेच बघायला आलोय की काय काय दिसतं इथं ते!

अर्थ नाही. वाद आहे. इथे काही होणार नाही. मी गाडीत बसतो नि सोनपात्रातून बाहेर पडतो. सोनापात्राच्या डोंगरांवर कित्येक टॉवर्स उभे आहेत. अशा ठिकाणी जिथं वर्षानुवर्षे फक्त दाट जंगल पिकत राहिलं, माणूस पोहोचणं तर दुरापास्तच! कसं केलं असेल काम या लोकांनी? माझे आजोबा उभे करत होते अशेच टॉवर्स इथेच जवळपास! मोठा माणूस. रान, माणसं, अक्कल नि जीप. या सगळ्यांना बाळगून तो एकटा माणूस.

पोफळीजवळ जाऊन एका ओढ्याकाठून चालू लागतो. संध्याकाळचे चार वाजलेत, अंधारू लागलंय, आकाश सकाळपास्नंच ढगाळलंय. एके ठिकाणी खुरट्या झाडांची प्रजा आहे, त्यात कल्ला आहे. कित्ती ते पक्षी. वटवटे (रीलश्रशीी), सातबाया (लरललश्रशीी), शिंजीर (ीीपलळीव), सहेल्या (ाळपळींशीी), सुभग (ळेीर), खाटीक (ीहीळज्ञश) आणि बरंच काही. केशरी डोक्याच्या कस्तूराचं पिल्लू भरकटल्यासारखं बाहेर पडतं नि मुर्खासारखं उडत जातं. ते पौंगडावस्थेत असावं, तळ्यात मळ्यात! त्याच्या उडण्यात ऐट नाही, ते त्यात तरबेज नाही. सुंदर गुलाबीसर ीशषळपलह दिसते; पण आता अंधारलंय. झुडूपांतल्या पक्ष्यांना हाका घालून घसा कोरडा पडलाय. गाडी हव्या त्या रस्त्यावरून चालू लागलीय, त्या एका वळणावर जिथं कुंभार्ली घाट पोफळीला जोडला जातो, तिथं एक पायवाट आहे. असंच लहानपणी हट्टीपणाने शोधून काढलेली. गुरं उतरायची त्या वाटेने, मग ते बघून बघून गेलो एके दिवशी चढून. लांबलचक वाट आहे, सरळ घाटात पोहोचते, सोनपात्रापासून - किलोमीटर्स अलीकडे. तिच्या पायाशी एक ओढा आहे. तिथं अजून तशीच पुर्वीसारखी गजबजाट आहे. तिथं हिरवा पारवा उडतो, त्याचे पाचूसारखे पंख दिसतात; मी दोन उड्या मारतो. अंधार दाट होत जातो!

बेंदरकरांच्या अंगणातला झोपाळा षळशश्रव र्सीळवशी, बायनो, कॅमेरे नि लॅपटॉप यांनी भरून गेलाय. कुरकुराट आहे, पण ती सहन होण्यासारखी. हे घर छानंय, ऐसपैस. निवांत. आमची खोली लांबलचक, आहे,



तिला स्वयंपाकघरासारखी एक खोली नि हॉलसारखी जागा अशा दोन भागांत विभागलंय. स्वयंपाकघरात तीनेक फूट भिंतीचा आडोसा करून मोरी बनवलीय. तेच बेसिन नि बाथरूम आहे आमचं. मोरीतली गाणी हॉलपर्यंत जातात, हॉलमधला लॅपटॉप मोरीपर्यंत भंवरे की गुंजन म्हणतो. ही जागा छानंय! झोपाळ्यासमोर पायाशी राणी बसलीय. बेंदरकरांची गावठी कुत्री. सकाळ झाली नि आमची लगबग सुरू झाली की, राणीची परसातल्या चुलीजवळ ऊबेला झोपलेली गब्दुल पिल्लं आई, आई करत कोकलत भोकाड पसरतात. त्यांची आई शेपूट जोरजोरात हलवत प्रेमात येऊन माझ्या कंबरेवरती पाय ठेवायचा प्रयत्न करते. राणी गव्हाच्या रंगाचीय. तिचा डाव्या डोळ्याने आंधळीय बिचारी.

बेंदरकर काकू डखउ एजंट आहेत. आमच्या कामाविषयी ऐकून त्या मला पॉलीसीबद्दल विचारतात.

जंगलात काही झालं तर? पॉलिसी काढून घ्या!

नाही, तसं काही होत नाही. आणि माझी मेडीक्लेमची (शुळीश झाली वाटतं!) आहे पॉलिसी.

हं तसा पगार काय मिळतो तुम्हाला मग?
दहा हजार मी बेंदरकर काकूंना खरंच वाईट वाटू नये म्हणून थोडा वाढवून सांगतो.
इतकाच. तुम्ही एवढे शिकलेले असून?

शिक्षणाची नि पैसे कमवण्याची अक्कल या दोहोंच्या पट्ट्या किती वेगवेगळ्या असताता काकू काय सांगू तुम्हाला?

डास चावताहेत फार, आत बसतो मी काम करत

बेंदरकर काकू उठतात, मी ही माझं दप्तर आवरतो, राणी पिल्लांकडे जाते दिवस संपतो, पडदा पडतो.


बेंदरकरांची म्हातारी अजब आहे. करामती. तिचा चेहरा पुर्ण सुरकत्यांनी भरलाय, इस्त्री केल्यासारखा सुरकुत्या; त्या कधी कधी भेगाळलेल्या टाचांसारख्या वाटतात. कपाळावर, गालांवर, नाकावर सगळीकडे सुरकुत्या! बेंदरकरांच्या म्हातारीचं वय कळत नाही, सत्तरीची असावी हं सत्तरीची असावी. त्या वयाच्या जाणीवा आता मला कशा समजणार? असावी सत्तरीची. ती सहज मला बोलवते, ये बाळ, कढत पाणी काढून घे. मी ही लगबगीने तिच्या मागे जातो. परसात चुलीवर पाण्याचं भांडं तापत असतं. म्हातारी सहज दोन्ही उघड्या हातांनी भांडं उचलते! कापडही न लावता; इथे मी स्वत:चे हात (आपसूकच) मागे ओढतो. कशा कळणार मला सत्तरीच्या जाणीवा? इतके बसले चटके, आता ती आगच समजत नाही, बधिर झालं अंग, गोड स्पर्शही उमजत नाही! म्हातारी राकट चेहऱ्याची वाटते, वाकून चालते, कामात टाळाटाळ करत नाही आणि या सर्वाचं मला अजिबात वाईट वाटत नाही. ती हेच करत आली असावी आयुष्यभर, तिला नविन नसावं हे, तिचं आयुष्यच तसं असलं पाहिजे. मी बादली हातात धरून मोरीपर्यंत पोहोचायच्या आधीच ती पुन्हा एकदा ओरडते, तुझ्यानंतर बाया करणारेत ना? मी फक्त हुंकार भरतो; तिथं बाहेरचा बल्ब काढून लाव, बायामाणसास्नी दिवा लागल परसात बसून ती कोयत्याने सणासण जळणाची लाकडम फोडत बसते. म्हातारी आंधळ्या राणीसारखीच वाटते!

पश्चिम किनारपट्टीवर वादळ आलंय, इकडे पोफळीचं वातावरण ही बिघडलंय. नुस्तं ढगाळलंय, दोन तीन मिनीटं पाऊस पडतो नि परत तसंच बुरसटल्यासारखं होतं. कालची रात्र सरली. नुस्ता भरारा वारा होता. छप्पर वाजत होतं, अंगच्या थकव्यापुढे तो आवाज घोरण्यापेक्षा महत्त्वाचा काही वाटला नाही!

आता मी किती गोष्टी बघू लागलोय, पोफळीत त्या त्या सगळ्या दिसू लागल्याहेत आणि! मी हिरवी भिरणी पुर्वी कधी पाहिली नाही, पण दिसतेय की. नसेल माहिती मला, कधी निरखून पाहिली नसेल मग मी. River Helicodor दिसते. टिकेलचा निळा नर्तक शिट्टी मारत राहतो, त्याला शिट्टी मारली की कुतूहलाने बाहेर येऊन बघतो.

दिवस ढगाळलेलाय.

# तंत्राधिष्ठीत चित्रपट : एक सारासार विचार



श्रीनिवास नार्वेकर

जवळजवळ ४९ वर्षांपूर्वी १९५९ मध्ये विल्यम वायलरचा 'बेनहर' आला होता. त्या चित्रपटाने त्या वर्षी ११ ॲकॅडमी ॲवॉर्डस् पटकावली होती आणि तो विक्रम मोडायला कैक वर्षानंतर जेम्स कॅमेरुनचा 'टायटॅनिक' यावा लागला. 'बेनहर'मधील रथांची शर्यत आजही आपल्याला थरारुन टाकते. १९८३ मध्ये स्टिव्हन स्पिलबर्गचा 'जॉज' आला होता. काही वर्षांनंतर लोकांना कळले की, 'जॉज्'मधील शार्क मासा हा तंत्राधारीत होता. चित्रपटांमध्ये तंत्राचा हुकमी वापर करण्याची सवय आजतागायत चालत आलेली आहे. मग ते बॉलीवूडवाले असोत की हॉलीवूडवाले.... आता तर मराठी चित्रपटही तंत्राधिष्ठीत होऊ लागला आहे. चित्रपट तंत्राधारीत असणे वेगळे तंत्राधिष्ठित असणे वेगळे... चित्रपट तंत्राधिष्ठीत असण्याला विरोध असण्याचे काही कारण नाही पण, त्या तंत्राच्या वाढत्या हव्यासापोटी त्या प्रभावाखाली खरा (!) चित्रपट हरवतोय की काय, असे वाटण्याजोगी परिस्थिती हळुहळू निर्माण होऊ लागली आहे आणि एकूणच चित्रपटमाध्यमाच्या आणि आस्वादकतेच्या दृष्टीने हे गंभीर आहे.

या विषयाची सुरुवात मला एका महामानवाच्या चित्रपटांपासून करावीशी वाटते. हा महामानव अर्थातच रामगोपाल वर्मा... ज्याला अखखी इंडस्ट्री आज फॅक्टरी म्हणून ओळखते आणि या संज्ञेला तो पुरेपूर जागतोही. शिवा'पासून आत्ताच्या 'सरकारराज'पर्यंत रामगोपाल वर्माने आपला विशिष्ट असा ठसा- चांगला वाईट हा भाग अलाहिदा - उमटवलेला आहे. शिवा, रात, सत्त्या, जंगल, रंगीला या चित्रपटांपर्यंतचा त्याचा प्रवास आणि त्यानंतरच्या नाच, मैं माधुरी दिक्षित बनना चाहती हूं, डरना मना है, सरकार, नि:शब्द, आग व आता सरकारराज या चित्रपटांपर्यंतची त्याची वळणे निश्‍चितच वेगळी आहेत. दरम्यानच्या काळात अन्य दिग्दर्शकांप्रमाणेच रामूलादेखील आशयावर तंत्राची कुरघोडी करण्याचा हव्यास सुटला आणि त्यामध्ये एखाददुसरा अपवाद वगळता त्याचे सर्व प्रयत्न फसत गेले.

नाईटमेअर, ब्लॉब आणि काही प्रमाणात एक्झॉर्सिस्ट अशी सरमिसळ करुन बनवलेल्या 'रात'मध्ये तंत्राच्या वापराला प्रचंड वाव असूनही रामूने तो मोह टाळला होता आणि त्याच्यातील चित्रकर्मीच्या दृष्टीने ती नक्कीच आशादायी बाब होती. सत्या, रंगीला हेदेखील बव्हंशी आशयाला महत्त्व देणारे चित्रपट होते. व्यवसायाच्या दृष्टीने दोन्ही चित्रपट ट्रेन्डमेकर ठरले. पण पुढे काय? हेच आशयसातत्य रामूला कायम टिकवता आले नाही. 'शोले'चा रिमेक म्हणून त्याने जी काही 'आग' लावली, त्याबद्दल तर बोलायलाच नको. 'मैं माधुरी दिक्षित...'चे कथासूत्र चांगले आणि गंमतीशीर होते, पण तो अगदी पाट्या टाकल्यागत हाताळला गेला. अलीकडच्या काळातला रामूचा 'सरकार' हाच ('सरकारराज' नव्हे) तुलनात्मकदृष्ट्या सगळ्यात चांगला चित्रपट ठरावा. 'सरकारराज' फारच अवास्तव पध्दतीने रेखाटला गेला, त्यामुळे त्याची विश्वासार्हताच संपुष्टात आली. त्यामध्ये पॉजवर्कचा तर एवढा मारा आहे की, त्यामुळे अख्ख्या चित्रपटाची गतीच पार बिघडून जाते. पूर्वार्धात काहीशी पकड घेत गेलेला 'सरकारराज' नंतरनंतर कंटाळवाणा वाटू लागतो. आशयाच्या प्रवाहापेक्षाही तंत्राचा प्रभाव या चित्रपटात अधिक जाणवतो. लो ॲंगल्स, डार्क लाईट्स ही रामूची खासियत 'सरकारराज'मध्ये अधिक उठून दिसते. त्यामुळे दृश्यात्मक परिणाम चांगला होत असला, तरी आशयपरिणामाचे काय? खूप चांगली पटकथा असूनही 'सरकारराज' आशयाच्या दृष्टीने हरवतो, तो या अवास्तव पॉजवर्क आणि तंत्राधिष्ठिततेमुळे...

'नि:शब्द' हा रामगोपालने खूप सोपा करुन दाखवलेला चित्रपट आहे, असे मला वाटते. 'लोलीता' ही ब्लादिमीर नोबाकोव्हची अत्यंत गाजलेली कादंबरी. मारिओ कैझारने त्यावर केलेला चित्रपटही सुंदर.. पण त्या कादंबरी किंवा चित्रपटाच्या आशयातली तीव्रता 'नि:शब्द'मधून आपल्यामधून पोहोचत नाही, कारण कथेचे

भारतीयीकरण करण्याच्या नादात हा चित्रपट फसतो. बरे, एक वेळ तेही चालून गेले असते, पण त्यातही कोणत्याही पात्राची व्यक्तिरेखा म्हणून वाढ न झाल्यामुळे ती फार वरवरची प्रेमकथा वाटते. (आता या गोष्टीला प्रेमकथा म्हणावे का, हा भाग वेगळ्या चर्चेचा..) 'नि:शब्द'मध्ये साठ वर्षांच्या एका वृध्दाने परदेशाहून आलेल्या आपल्या मुलीच्या मैत्रिणीच्या प्रेमात पडावे, (मुलीची मैत्रीण - मुलगी नव्हे) यातच सगळा सोपेपणा सामावलेला आहे. त्यामुळे ही प्रेमकथा नात्यांमधल्या गुंतागुंतीची न होता म्हातारचळ लागलेल्या वृध्दची किंवा पोस्टमॉडर्न तरुणीची प्रेमकथा (?) बनून जाते. (ज्याप्रमाणे 'चीनी कम'मध्ये अमिताभ व तब्बू दोघांच्याही व्यक्तिरेखा स्पष्ट न झाल्यामुळे कशाचीच उत्तरे मिळत नाही आणि मग हे का, तर लेखक-दिग्दर्शकाला वाटले म्हणून! अनेक माणसे केवळ आपल्या कथासंकल्पनेच्याच प्रेमात पडतात, पण त्यावर सांगोपांग विचार करायची त्यांची तयारी नसते आणि ते वरवर काहीतरी करुन बसतात.) 'लोलीता'मध्ये मुळातच नात्याचे जे त्रांगडे आहे, त्यातच या प्रेमसंबंधांमधली भेदकता सामावली आहे. एक प्रोफेसर जिच्याकडे पेईंगगेस्ट म्हणून राहतो, तिच्याशीच कालांतराने लग्न करतो. तिच्या पहिल्या नवऱ्यापासून असलेली मुलगी लोलीता त्या प्रोफेसरला 'डॅड' म्हणूनच हाक मारु लागते. नंतर कधीतरी त्या बाईचा अचानक अपघाती मृत्यू होतो आणि लोलीताच्या संगोपनाची (?) जबाबदारी पूर्णपणे या प्रोफेसरवर येते. प्रोफेसरची कसरत सुरु होते आणि लोलीता ज्याला 'डॅड' म्हणून हाक मारत असते, त्यालाच ती एक दिवस विचारते, 'तुझा कुठल्याच बाईच्या शरीराशी कधी संबंध आला नाही का?' काय झाली असेल त्याची अवस्था? तशाच अवस्थेत 'मला तुझ्याबरोबर झोपायचंय' म्हणत लोलीता एका क्षणात प्रोफेसरच्या पुरुषीपणावर कब्जा मिळवत बापापेक्षाही पुरुषाचे नाते मान्य करते आणि प्रोफेसरही त्या क्षणी तिला विरोध करु शकत नाही. त्या क्षणापासून तो त्या गर्तेत अधिकाधिक फसतच जातो. 'लोलीता'मध्ये नात्यांचा हा खेळ पाहीला की 'नि:शब्द'मधला प्रेमाचा खेळ हा किती कचकड्याचा आहे, हे लक्षात येते. त्यातही 'लोलीता' आणि 'नि:शब्द' कितीतरी फ्रेम्स जशाच्या तशाच.. अगदी लोलीता आणि झिया खानचे भिजणेही सारखेच... आता बोला... मूळ आशयालाच बगल देऊन आपण काहीतरी प्रचंड वेगळे देतोय, या थाटात रामूने 'नि:शब्द' दिला, तोसुध्दा आशयावर तंत्राची कुरघोडी करुनच...

असाच तंत्राच्या हव्यासापोटी फसलेला आणखी एक चांगला चित्रपट संजय लीला भन्साळीचा 'ब्लॅक'... भन्साळीनेही या चित्रपटात अँग्लोइंडियन फॅमिली वापरुन सगळी कथाच सोपी करुन टाकली. कितीतरी वेळा चित्रपट इंग्लिश आहे की हिंदी हेच कळत नाही. त्याचा 'देवदास'मधल्या अवास्तव भव्यतेचा सोस अजूनही पुरता उतरला नव्हता, हेच 'ब्लॅक'मध्ये सिध्द झाले. आता आपल्याकडे अशा प्रकारचे चित्रपट पाहण्याची सवय नाही, हा भाग सोडून द्या. आपल्या लोकांनी 'ब्लॅक' नाकारला तो या कारणासाठी... पण त्यापलीकडे विचारांच्या आणि आशयाच्या पातळीवर विचार केला, तर राणी मुखर्जी व छोटी आयेशा यांचा अभिनय याच्याव्यतिरिक्त हाती काहीच लागत नाही. अमिताभने हा चित्रपट घेतला नसता, तर म्हणे भन्साळीने तसाच बासनात बांधून ठेवून दिला असता. पण अमिताभ हाच या व्यक्तिरेखेसाठी मिसकास्ट होता. इथूनच आशयावर कुरघोडी होण्याची सुरुवात होते. काही फ्रेम्स मात्र भन्साळीने अप्रतिम घेतल्या आहेत. (अर्थात ते त्याच्याकडून अपेक्षित आहेच, नाहीतर संजय लीला भन्साळी आणि डेव्हिड धवन यामध्ये फरक तो काय उरला !) पण चार-दोन फ्रेम्स आणि राणीचा अभिनय म्हणजे अख्खा चित्रपट नव्हे. चित्रपट छान (!) दिसण्याच्या उद्देशाने वापरलेला महाप्रचंड बंगला (ही नितीन देसाईंची किमया), अख्ख्या चित्रपटात वापरलेला ब्ल्यू टोन या दोन गोष्टी चित्रपटाच्या आशयालाच मारक ठरत होत्या, हे विचारपूर्वक काम करणाऱ्या भन्साळीला कळू नये, याचे आश्चर्य वाटते. 'ब्लॅक'मधली सर्वात महत्त्वाची घटनाच अनुत्तरीत राहते, ज्या शक्यतेचे उत्तर आजवर मला सापडलेले नाही. चित्रपटात एक प्रसंग आहे - राणीला फिरायला घेऊन आलेला अमिताभ तिला एका बाकावर बसवून तिच्यासाठी आईस्क्रिम आणायला आईस्क्रीम पार्लरमध्ये जायला निघालाय. जाता जाताच त्याला अल्झायमर्सचा अॅटॅक येतो, तेवढ्यातच त्याला एकाचा धक्का लागतो आणि तो पार्लरच्या विरुध्द दिशेला वळून चालू लागतो. फ्रेममध्ये - बाकावर बसलेली राणी एका टोकाला, आईस्क्रीम पार्लर दुसऱ्या टोकाला आणि नेमक्या विरुध्द रस्त्याने चालणारा अमिताभ

तिसऱ्या टोकाला असे चित्र दिसते. क्या बात है ! पटकथेत डोकं सुन्न करणारी शक्यता असावी तर ही अशी ! आता ही आंधळी, मुकी, बहीरी बाई घरी कशी जाईल? (हिंदी चित्रपटातील 'कोणीतरी ओळखीचा भेटला आणि तिला घरी सोडले' वगैरे योगायोग असल्या आशयघन (!) चित्रपटात संभवत नाहीत.) प्रचंड उत्कंठा ताणून पुढील प्रसंग पाहण्यासाठी सरसावून बसेपर्यंत राणी थेट तिच्या खोलीतच दिसते आणि काही क्षणांनी घरी आलेल्या अमिताभला 'मला एकटी सोडून कुठे गेलात' वगैरे विचारु लागते. राणीच्या व्यक्तिरेखेच्या अनुषंगाने अत्यंत गंभीर असलेली ही शक्यता लेखक-दिग्दर्शकाने तशीच सोडून दिली. कथानकाच्या एका महत्त्वाच्या शक्यतेचीच अशी बोळवण झाल्यामुळे कथेची पार हवाच निघून जाते. मग आपण फक्त छान छान फ्रेम्स बघत, हुकमी प्रसंगांना डोळ्यांतून पाणी काढत पुढला चित्रपट पाहतो आणि भन्साळी आपल्याला एक सर्वोत्कृष्ट चित्रपट दाखवल्याचा आभास निर्माण करतो. 'ब्लॅक' चांगला आहे, यात वाद नाही, पण अशा आशयघन चित्रपटामध्ये तंत्राच्या पडद्याआड महत्त्वाच्या शक्यताच अनुत्तरीत सोडून दिल्या की त्या चित्रपटाची, कथेची विश्वासार्हताच निघून जाते.

भन्साळीच्या 'देवदास'बद्दल तर काय बोलावे ? शरच्चंद्र चटर्जींच्या 'देवदास'च्या आशयावरच मात केलेला हा भन्साळीपट होता. कादंबरीचे कथानक आणि भन्साळीची व्यावसायिक गणिते यांची सरमिसळ करुन भन्साळीने प्रेक्षकांना भुलवले आणि आपले लोकही या वरलीया रंगाला भुलले. मुळात आज लोकांची अभिरुचीच एवढ्या विचित्र पध्दतीने बदलत चाललीय की, नेमके चांगले चांगले म्हणजे काय, हेच त्यांना कळत नाहीय. आजच्या तरुण पिढीचे तर काही विचारायलाच नको. चुन्नीलालसारखा लंडनरिटर्न बॅरिस्टर जेव्हा 'प से प्यार, द से दारु' वगैरे बरळू लागतो, तेव्हा लंडनसारख्या ठिकाणी हा बॅरिस्टर झालाच कसा, असा भन्साळीला न पडलेला प्रश्न आपल्याला पडतो. चुन्नीलालच्या बॅरिस्टरकीचा आब मोतीलालच्या चुन्नीलालमध्ये पहावा. (संदर्भ : बिमल रॉय दिग्दर्शित 'देवदास') आशयघनतेच्या दृष्टीने मला स्वत:ला पी. सी. बारुआचा सैगल अभिनीत 'देवदास' अधिक आवडतो, तर परिणामकारक सादरीकरणासाठी बिमल रॉयचा दिलीपकुमार अभिनीत 'देवदास' आवडतो. यामध्ये भन्साळीचा 'देवदास' कुठेच बसत नाही. कारण त्यामध्ये आशयावर (तोसुध्दा बदललेला) तंत्राच्या भुलभुलैय्याने मात केली आहे. केवळ भव्यता, चकचकीतपणा, माधुरी-ऐश्वर्याचे एकत्र येणे आणि बिरजू महाराजांनी केलेली कोरिओग्राफी हेच जर 'देवदास'चे यश असेल, तर भन्साळीबरोबरच त्याच्या 'देवदास'ला डोक्यावर घेणाऱ्या प्रेक्षकांच्या मानिसकतेचीही कीव करावीशी वाटते.

'साँवरिया'सुध्दा काहीसा असाच फसला. मात्र या प्रेमकथेत भन्साळीने वापरलेला ब्ल्यू टोन अगदी चपखल बसला, ज्याचा 'ब्लॅक' बघताना वारंवार त्रास होत होता आणि त्यामुळे त्या कथानकाची आशयघनताच कमी होत होती. भन्साळीचा मला आवडलेला चांगला चित्रपट म्हणजे नाना पाटेकर, सीमा विश्वास आणि मनिषा कोईरालाला घेऊन केलेला 'खामोशी-म्युझीकल'... कुठेही तंत्राचा मारा न करता केवळ आशयाला महत्त्व देऊन केलेला हा चित्रपट होता. त्यात तिन्ही कलाकारांची समर्थ साथ. असे असेल तर मग तंत्राचे अवडंबर हवेच कशाला? नाही का?

अशा परिस्थितीत मग भन्साळी आणि रामगोपालपेक्षाही विधु विनोद चोप्रा उजवा वाटू लागतो. विधु विनोद 'जाने भी दो यारों'च्या वेळी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करीत होता, त्यावरुनच त्याच्या विचारांचा प्रवास स्पष्ट व्हावा. परिन्दा, १९४२ ए लव्ह स्टोरी, मुन्नाभाई एमबीबीएस हे चित्रपट त्याच्या चित्रजाणीवेची साक्ष देतात. 'परिन्दा'मध्ये भडकपणा व तंत्राधिष्ठिततेला प्रचंड वाव असतानाही विधु विनोदने अत्यंत शांत व संयत चित्रपट केला. त्यामुळेच कदाचित या चित्रपटाची भेदकता अधिक प्रखर होत असावी.

'गॉडफादर' करताना फ्रान्सीस डी कपोलाने मार्लन ब्रॅण्डोच्या डोळ्यांचा एकही क्लोजअप घेतला नाही. त्याला दिग्दर्शन येतच नाही, काही कळतच नाही, अशी सूर टीकाकारांमधून आणि त्याच्या विरोधकांमधून उमटू लागला. त्यावर कपोलाचे उत्तर होते, 'ज्याच्या पेशीपेशीतच क्रूरपणा ठासून भरलेला आहे, तो क्रूरपणा त्याच्या डोळ्यांचा क्लोजअप घेऊन वेगळा दाखवण्याची गरजच काय?' ही दिग्दर्शकीय आशयघनतेची समज... क्लोज अप, लाँग

शॉट, मिड शॉट, ट्रॉली, क्रेन या गोष्टींचा आशयाच्या दृष्टीने त्यांचा म्हणून एक अर्थ असतो, हे कित्त्येकांच्या गावीही नसते.

आशयाच्या विचारांमध्ये माणूस कमी पडू लागला की तो तंत्राचा आधार घेतो आणि मग लोकांची फसगत सुरु होते. 'शिवाजी-द बॉस'च्या बाबतीत शंकरने तरी आणखी काय केले? त्याउलट सुंदरम श्रीनिवास रावने 'पुष्पक'मधून न बोलता खूप काही सांगितले. आणखी काय हवे?

आशयावर ठाम राहून काम करु पाहणारे आणखी दोन दिग्दर्शक मला दिसतात, ते म्हणजे अनुराग बासू आणि अनुराग कश्यप... अनुराग बासूचा 'मेट्रो' पाहिल्यानंतर तर त्याच्या परिपक्वतेची खात्रीच पटते. परंतु आज तांत्रिक झगमगाटात हरवलेल्या आणि त्यांना त्याच वातावरणात वावरु देणाऱ्या दिग्दर्शकांच्या भाऊगर्दीत 'मेट्रो'सारखा चांगला चित्रपट हरवून जातो, याचे वाईट वाटल्याशिवाय राहत नाही. 'मर्डर' आणि 'मेट्रो'मधला अनुराग बासू परस्परभिन्न आहे. 'मर्डर' ही तशी सर्वसाधारण मसाला कथा होती, पण बासूने त्याचे कौशल्य वापरुन ती खूप चांगली केली. पण त्यापेक्षाही कितीतरी अधिक चांगला त्याने 'मेट्रो' केला. 'मेट्रो'मध्ये त्याचा जणू कस पणाला लागला होता. वेगवेगळ्या सहा व्यक्तिरेखांची अप्रतिम गुंफण करुन तंत्राला कुठेही चढ होऊ न देता अनुराग बासूने 'मेट्रो' उभा केला. चित्रभाषेबरोबरच आशयघनतेची आगळीवेगळी उमज हा त्याचा महत्त्वाचा पैलू या चित्रपटाच्या निमित्ताने समोर आला. प्रीतमनेही या चित्रपटात गाण्यांचा वेगळा प्रकार वापरला आहे. या चित्रपटातील गाणी कथानकाला पुढे नेतात, जणू ती एका निवेदकाचे काम करतात. पण दुर्दैवाने अशा चांगल्या चित्रपटांना विचारतो कोण?

रामगोपाल वर्माच्या तालमीत तयार झालेल्या अनुराग कश्यपने 'ब्लॅक फ्रायडे'सारखा खूप चांगला चित्रपट दिला. तो खरे तर डॉक्युसिनेमा होता आणि तो मणीरत्नमच्या 'गुरु'पेक्षाही कितीतरी पटीने सरस होता. 'ब्लॅक फ्रायडे' ही मुंबई बॉम्बस्फोटानंतरची दंगल आणि त्यामागील कथानक यांची गोष्ट आहे. डॉक्युमेंटरीचाच विषय असलेला आणि त्याच पध्दतीने केलेला असूनही तो 'चित्रपट' म्हणून वेगळे भान देतो. प्रत्त्यक्ष बॉम्बस्फोटाच्या मागच्या पुढच्या बातम्यांमधल्या क्लिप्स त्याने अशा काही खुबीने वापरल्या आहेत, की जणू प्रत्त्यक्ष बॉम्बस्फोटाच्या वेळीच चित्रपटाचे चित्रीकरण केल्याचा भास व्हावा. दुर्दैवाने ज्या वेळेस हा चित्रपट यायला हवा होता, नेमक्या त्याचवेळी त्याच्यावर बंदी आली आणि ज्यावेळी बंदी उठून प्रदर्शित झाला, तोपर्यंत त्या विषयातील हवाच निघून गेली होती.

याउलट मणीरत्नमचा 'गुरु'... चित्रपटापेक्षा 'गुरु' ही अंबानींवरची डॉक्युमेंटरी वाटावी, हे मणीरत्नमचे अपयश आहे. 'बॉम्बे'सारखा आवरहित चित्रपट देणाऱ्या मणीरत्नकडून 'गुरु'च्या बाबतीत एवढ्या सपकपणाची अपेक्षा नव्हती. मणीरत्नम आशयापेक्षाही तंत्रामध्ये जास्त वाहवत गेल्याचे यामध्ये स्पष्टपणे जाणवते. त्यातही ऐश्वर्या राय नावाची प्लास्टीक डॉल घेऊन गाणे वगैरे देणे ही व्यावहारिक अपरिहार्यता होती. पण त्यामुळे 'गुरु'च हरवून गेला त्याचे काय ?

'विरासत', 'सजा-ए-काला पानी'सारखे वेगळे आशयघन चित्रपट आणि 'हेराफेरी' सारखा निखळ विनोदी चित्रपट खूप चांगल्या पद्धतीने देणाऱ्या प्रियदर्शनलाही 'भुलभुलैय्या'मध्ये तंत्राचा मोह आवरला नाही. अर्थात त्याने हुशारीने आशय आणि तंत्राला फिफ्टी फिफ्टी केले. त्यामुळे 'भुलभुलैय्या' किमान सुसह्य झाला. एका गाण्याचा अपवाद वगळता 'हेराफेरी' हृषीदांच्या चित्रपटांच्या जवळ जाणारा होता.

या एकूण प्रवासात एक नाव फार महत्त्वाचे आहे.. ते म्हणजे मधुर भांडारकर.. वास्तवदर्शी विषय संयमित सिनेमॅटीक शैलीमध्ये मस्ट बिलीव्ह करायला लावत, तेसुध्दा तंत्राचा नेमका व परिणामकारक वापर करुन मांडण्याची मधुरची हातोटी फार विलक्षण आहे. एक दूरदर्शन मालिका आणि 'त्रिशक्ती' नावाचा टुकार चित्रपट केल्यानंतर तब्बल चार वर्षांनी 'चांदनी बार' या चित्रपटाने मधुरला बॉलीवूडमधील महत्त्वाच्या दिग्दर्शकांच्या मांदियाळीत नेऊन बसवले. चांदनी बार, पेज थ्री, ट्रॅफिक सिग्नल, फॅशन हे त्याचे गाजलेले चित्रपट तंत्राधारीत आहेत, तंत्राधिष्ठित नाहीत. 'चांदनी बार'मध्ये तर तंत्राचा कोणताही वापर नव्हता. तंत्रावर भर देऊन प्रभाव

पाडण्यापेक्षा साध्या सरळ पध्दतीने पण बारीकबारीक तपशील गुंफत गोष्ट सांगणे मधुरला अधिक महत्त्वाचे वाटते. पण गोष्टींचा तपशील चटकदार पध्दतीने मांडण्याची मधुरची ही ताकत त्याला 'ट्रॅफिक सिग्नल'मध्ये बॅकफूटवर नेऊन सोडते आणि खूप काही तपशील मांडण्याच्या नादात त्या सरळसरळ कृत्रिम वाटणाऱ्या सेटवर आपण नाटक नाटक खेळत राहतो. व्यक्तिरेखा सच्च्या वाटल्या तरी त्या वातावरणाशी आपण एकरुप होऊ शकत नाही.

मधुरचे जवळजवळ सगळेच चित्रपट संपूर्ण चित्रपटभरात एक कथा संपवून शेवटाला दुसरी कथा सुरू करतात. त्याचे कारण मधुर एक कथा म्हणून चित्रपटात मांडत नाहीच. तो त्याच्या चित्रपटात एक सरळसोट वास्तव मांडतो, ज्याला ना प्रत्यक्षात अंत असतो, ना त्याच्या चित्रपटात. अशा प्रकारच्या वास्तवदर्शी शैलीने सादरीकरणाची पध्दत चित्रपटाला अधिक विश्वासार्ह बनवते. अगदी पंधरा आणि तीस सेकंदांचेही अत्यंत प्रभावी शॉटस् घेणाऱ्या मधुरची तंत्राधारीतता (तंत्राधिष्ठितता नव्हे) विषयानुरुप बदलते. त्याचे चित्रपट बघून पटकथेत फिलर्ससुध्दा किती बंदिस्त आणि महत्त्वाचे असतात याची खात्री पटते. 'चांदनी बार'मध्ये तंत्राचा वापर न केलेला मधुर 'पेज थ्री', 'कॉर्पोरेट' आणि 'फॅशन'मध्ये तंत्राचा नेमका आणि परिणामकारक वापर करतो. दुसरी फार महत्त्वाची गोष्ट, त्याच्यातला लेखक-दिग्दर्शक त्याच्या चित्रपटातील व्यक्तिरेखांना दयामाया न दाखवता वागवतो. त्यामुळे मधुर दिग्दर्शक म्हणून फार वेगळा ठरतो आणि म्हणूनच मधूरचे नाव एक विचारशील दिग्दर्शक म्हणून नक्कीच घ्यावे लागते.

आजघडीला वाढत्या तंत्राधिष्ठित चित्रपटांच्या पार्श्वभूमीवर चंद्रलेखा, आम्रपाली यासारखे चित्रपट किंवा मनोहर देसाई, महिपाल, बी. एम. व्यास, एस. एन. त्रिपाठी, जीवन वगैरेंचे पौराणिक चित्रपट तंत्राधारीत असूनही कधीही तंत्राधिष्ठित झाले नाहीत. चांगल्या व समर्थ आशयसूत्रांमध्ये तंत्राचा वापर नेमका किती आणि कशा पध्दतीने करायचा, हे त्या दिग्दर्शकांना चांगल्या प्रकारे ठाऊक होते. म्हणून तर 'आवारा'मधले 'घर आया मेरा परदेसी'चे चित्रीकरण आजही बघत रहावेसे वाटते. हे स्वप्नगीत करण्याचे ठरल्यानंतर कलादिग्दर्शक मनोहर आचरेकरना बरोबर घेऊन राज कपूर कित्येक दिवस चर्चा करीत असे. ते भव्य स्वर्गांगण, ती शंकराची भव्य मूर्ती, अक्राळविक्राळ चेहरे, सगळेच कसे भव्यदिव्य आणि त्या भव्यतेमध्येही न हरवलेले मन्नाडे-लता मंगेशकरचे गाणे... तू आऽऽजा... आणि त्यालाच जोडून आलेले 'घर आया मेरा परदेसी'.. हे संयमित स्वप्नगीत आजही आदर्शवत् मानले जाते. (अर्थात आदर्श हे मानण्यावर असतात, हे गृहीत धरुन). असे एखादे स्वप्नगीत पुन्हा करण्याबाबत राज कपूरला एकाने प्रश्न विचारला, तेव्हा तो उत्तरला होता - 'जरुर करेन.. नर्गिस, मनोहर आचरेकर, शंकर-जयकिशन, शैलेन्द्र, मन्नाडे आणि लता पुन्हा मिळाले, तर असे स्वप्नगीत जरुर करेन.'

राजा परांजपेंच्या चित्रपटात कुठे तंत्राचा बडेजाव होता? अत्यंत साधे-सोपे चित्रपट होते त्यांचे. त्यामध्ये आशयाला महत्त्व असायचे. म्हणून लाखाची गोष्ट, पेडगावचे शहाणे, जगाच्या पाठीवर हे चित्रपट आजही पहावेसे वाटतात. 'लाखाची गोष्ट'मधला चित्र काढण्यासाठी रेखा खुर्चीवर बसल्यानंतर बाईच्या पदराला हात कसा लावायचा, म्हणून हातातल्या पेन्सीलने तिचा पदर सारखा करु पाहणारे राजा परांजपे लाजवाब ! यांना कशासाठी तंत्राचा बडेजाव हवा?

'कागज के फूल'मध्ये 'वक्त ने किया' गाण्याच्या वेळी छपरामधून आलेला तिरपा कवडसा बरेच काही सांगून जातो. त्यावेळी गुरुदत्तना नाही कोणत्या तंत्राचा आधार घेण्याची गरज भासली. मुळात चित्रपटाच्या आशयाचे तंत्र डोक्यात भिनलेले असेल, तर अन्य कोणत्याही बाह्यतंत्राचा आधार घेण्याची गरज भासत नाही. 'आपली माणसं'सारखा साधा-सोपा-सरळ चित्रपट देणारे संजय सूरकरदेखील 'सातच्या आत घरात'मध्ये आशयापेक्षा तंत्रालाच महत्त्व देतात आणि लोकांनाही ते आवडते, याला काय म्हणावे ? आज प्रेक्षकांची अभिरुची बदलत चाललीय, त्यांना हवे ते द्यायला लागते, ठिक. पण त्यांना चांगले ते देणे हेदेखील आपल्याच हातात आहे. किमान, ज्यांनी दिलेले लोक स्वीकारतात, त्यांच्याकडून अशा चांगल्याची अपेक्षा केली, तर बिघडले कुठे?

थोडासा रुमानी हो जाये, एक डॉक्टर की मौत, एक रुका हुआ फैसला, जाने भी दो यारों, बासू चटर्जी किंवा

हृषीकेश मुखर्जींचे चित्रपट आजही पाहावेसे वाटतात. या चित्रपटांच्या आशयावर कोणतेही तंत्र मात करीत नाही. आशयावरच मजबूत पकड असल्यामुळे अशा कोणत्या बाह्यतंत्राची त्यांना गरजही भासत नाही. एकही गाणे नसलेला बी. आर. चोप्रांचा 'कानून' किंवा 'इत्तेफाक', अगदी गेला बाजार 'इन्साफ का तराजू'देखील कोणताही तांत्रिक आव नसतानादेखील आजही तेवढाच प्रभाव पाडतात. बी. आर. चोप्रांचा विषय आला म्हणून याच रांगेत यश चोप्रा आणि रमेश सिप्पींचा उल्लेख करावासा वाटतो. सिलसिला, कभी कभी, दिवार, त्रिशूल, काला पत्थर, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगेसारख्या वेगवेगळ्या विषयांचे चित्रपट देणाऱ्या यश चोप्रांना कधी तंत्राचा आधार घ्यावासा वाटला नाही. दिग्दर्शकाने आपल्या डोक्याचा जास्तीत जास्त वापर करावा, अशा मताची ही माणसे होती. अर्थात या चित्रपटांच्या दर्जाबद्दल दुमत असू शकेल, पण आपला विषय तंत्राधिष्ठितपणापुरता मर्यादित आहे. सिप्पींचा 'शोले' आज बघताना कितीतरी गोष्टी मूर्खपणाच्या होत्या, असे जाणवते. पण बाह्यतंत्राचा बडेजाव मिरवू न देताही तीन तास लोकांना खिळवून ठेवण्याची किमया 'शोले'ने साध्य केली होती. 'शक्ती'मधील एक प्रसंग तर संयत दिग्दर्शन व अभिनयाचा वस्तुपाठ ठरावा. अश्विनकुमारची - म्हणजे दिलीपकुमारची बायको (राखी) मरते, तेव्हा विजयला (अमिताभ) पोलिस घरी घेऊन येतात. तो आल्यापासून पुन्हा निघून जाईपर्यंतचा जवळजवळ सव्वा तीन मिनिटांचा प्रसंग एकही अक्षर न बोलता, पार्श्वसंगीताचा आघाती वापर न करता अत्यंत संयतपणे उभा केला आहे सिप्पींनी... याच्यासाठी आशयाची नेमकी जाण असावी लागते.

'भेजा फ्राय'सारखे उदाहरण चित्रपटांच्या इतिहासात दुर्मिळ ठरावे, असे आहे. तंत्र सोडाच, फारसा पैसाही खर्च न करता केवळ डोक्याने केलेला हा चित्रपट लोकांनी उचलून घेतला. त्याच वेळी यश चोप्रांचा बॅनर असूनही 'काबूल एक्सप्रेस'सारखा कबीर खान नावाच्या दिग्दर्शकाचा आशयघन चित्रपट मात्र साफ कोसळतो. अत्यंत भडक होऊ शकणारा विषय असतानाही त्या चित्रपटातून कबीर खानने चित्रभाषेच्या वापराने हा चित्रपट असा फुलवला आहे, की त्याला तोड नाही. या चित्रपटाचा दिग्दर्शक भन्साळी किंवा रामगोपाल असता तर कदाचित चित्रपट आहे तसा प्रचंड गाजलाही असता, कुणी सांगावे ! (लोकांची नेमकी अभिरुची निर्माण व्हायला हवी, ती अशा ठिकाणी...)

तंत्राधिष्ठित त्रिपटांच्या बाबतीत दोन परस्परविरोधी उदाहरणे म्हणजे संदीप सावंतचा 'श्वास' आणि निशिकांत कामतचा 'डोंबिवली फास्ट'... 'श्वास'मध्ये कोणताही तांत्रिक आव न आणता ती कथा उत्तम पटकथेच्या जोरावर कॅमेऱ्याच्या भाषेत पुढे सरकत गेली, तर 'डोंबिवली फास्ट'मध्ये आशयाच्या बरोबरीनेच तंत्रव्यवहारांची रेलचेलही जाणवली. रामगोपाल 'कौन'मध्ये खेळलेला साऊंड इफेक्टस्चा खेळ निशिकांत 'डोंबिवली फास्ट'मध्ये खेळला. अर्थात आशय व तंत्र यांच्या बऱ्यापैकी सांगड घालून ती वीण घट्ट जमवल्यामुळे आणि वेगवान पटकथेमुळे 'डोंबिवली फास्ट' किमान सुसह्य झाला. अन्यथा इन्स्पेक्टरची (संदेश जाधव) एन्ट्री ही अमिताभची एन्ट्री असल्याच्या थाटात घेतलेले शॉटस् आणि अगदी शेवटी इन्स्पेक्टरने ट्रेनमध्ये मोहन आपटेला गोळी घातल्यावर त्याचे 'इन्स्पेक्टरसाहेब, जरा खिडकीजवळ बसू का? आयुष्य गेलं चौथ्या सीटवर बसण्यात..' हे कशासाठी? हा शेवटचा डायलॉग अख्ख्या चित्रपटाचा परिणाम घालवून टाकतो. आता 'डोंबिवली फास्ट'च्या बाबतीत कथासूत्राच्या अनुषंगाने सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा - ज्या मुद्द्यावर अख्ख्या चित्रपटाचा डोलारा उभा आहे, तो मुद्दा - एखाद्या माणसाचे एवढे अध:पतन (त्या अध:पतनाच्या जवळ जाण्यासाठी कितीही कारणे असली तरी) केवळ दोन-तीन दिवसात होणे शक्य आहे का ? व्यक्तिरेखेच्या जडणघडणीचा विचार करता, अमुक एका निर्णयाप्रत जाण्यासाठी मानसिकतेची घडण होण्यासाठी किंवा ती बदलण्यासाठी मानसशास्त्रीयदृष्ट्या जो किमान वेळ लागायला हवा, तोच वेळ मुळी या चित्रपटात मिळत नाही आणि त्यामुळे हा चित्रपट आशयाचा गाभाच हरवून बसतो. मग आपण चित्रपट पाहतो, केवळ परिणामकारक वेगवान सादरीकरणामुळे...

'श्वास'च्या बाबतीत असा मूलभूत गोंधळ नसला, तरी परश्याला त्याच्या आजोबाने हॉस्पीटलमधून परस्पर बाहेर काढल्यानंतरचे जीवनाचा आनंद अनुभवण्याचे प्रसंग हे केवळ जत्रेत गंमत दाखवण्यासाठी फिरण्याच्या आनंदापुरते मर्यादित राहतात. त्याचे भावविश्व पूर्णपणे मोकळे होतच नाही. (अशा वेळी मुलांच्या मानसिकतेच्या

अंगाने जाणारा इराणी दिग्दर्शक माजिद माजिदी आठवतो. त्याचे चिल्ड्रेन ऑफ हेवन, कलर ऑफ पॅराडाईज हे केवळ मुलांचे भावविश्व प्रकट करणारे चित्रपट आपले मोठ्यांचेही विश्व उलथवून टाकतात.) हा एकमेव भाग वगळता चित्रभाषा आणि पटकथेच्या दृष्टीने 'श्वास' कितीतरी सरस चित्रपट वाटतो.

कॅमेऱ्याच्या - चित्रभाषेत बोलणारे दोन महत्त्वाचे दिग्दर्शक या निमित्ताने मला दिसतात, ते म्हणजे सत्त्यिजत राय आणि माजिद माजिदी... या दोघांनाही तांत्रिक बडेजावाचे वावडे. त्यामुळे सत्त्यजित रायची अपूत्रयी, चारुलता, गणशत्रू, शतरंज के खिलाडी तर माजिदींचे मुलांचे भावविश्व प्रकट करणार्या चित्रपटांसह विपिंग विलो, बरान हे चित्रपट मनात घर करुन राहतात. 'श्वास'च्या ऑस्करवारीच्या वेळी परदेशी चित्रपट विभागात 'यस्टरडे' नावाचा नेल्सन मंडेला फाऊण्डेशनचा एक चित्रपट होता. चित्रपट एडस्वरचा, पण अख्ख्या चित्रपटात एचआयव्ही किंवा एडस् हा शब्ददेखील नाही. संवादही अत्यंत मोजके. कॅमेऱ्याचा आक्रस्ताळी वापर नाही. संवादांपेक्षाही कॅमेरा बोलतो, तेव्हाच तो 'चित्रपट' होतो.

इ. टी., जॉज्, ज्युरासिक पार्कसारख्या तंत्राधिष्ठित चित्रपटांवर प्रचंड हुकमत असणाऱ्या स्टिव्हन स्पिलबर्गवर जेव्हा टीका होऊ लागली, तेव्हा त्या टीकेला उत्तर देण्यासाठी कोणत्याही तंत्राचा आधार न घेता त्याने 'शिंडलर्स लिस्ट' चक्क ब्लॅक अॅण्ड व्हाईटमध्ये केला. एकेक प्रसंग वन सीन वन शॉट.. पण त्याची चित्रभाषेवरची पकड एवढी घट्ट की कोठेही इथे शॉट कट करायला हवा होता किंवा इथे क्लोज अप घ्यायला हवा होता, असे जाणवत नाही. आल्फ्रेड हिचकॉकचा 'सायको' आणि 'रोप' याच मालिकेतील.. 'रोप' हा सुमारे दीड तासांचा चित्रपट अवघ्या दहा शॉटस्मध्ये आहे. ही चित्रभाषेवरची पकड आणि हुकमत ! कॅमेऱ्याच्या प्रत्त्येक फ्रेमचा आशयाच्या दृष्टीने विचार करणारे दिग्दर्शक विरळाच ! म्हणूनच हिचकॉक, रे, कपोला, माजिदी थोर दिग्दर्शक ठरतात. व्हिटोरिया डिसिकाचा 'बायसिकल थीफ'देखील याच जातकुळीतला...

हॉलीवूडपटांच्या बाबतीत बोलायचे झाले तर व्हिक्टर फ्लेमिंगचा 'गॉन विथ द विंड', डेव्हिड लीनचा 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' किंवा 'ब्रीज ऑन द रिव्हर क्वाय', विल्यम वायलरचा 'बेनहर' हे चित्रपट भव्यदिव्य असूनही तंत्राच्या आहारी न गेलेले होते. 'जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल'सारख्या रिचर्ड बाखच्या गाजलेल्या अप्रतिम कादंबरीवर तेवढाच अप्रतिम चित्रपटही निघतो. एकही माणूस चित्रपटात न घेता केवळ चार-पाचशे सीगल पक्ष्यांना घेऊन अप्रतिम चित्रपट करणे आजही अशक्य ! हा चित्रपट १९७३ सालचाच.. 'ब्रेव्हहार्ट' किंवा 'ग्लॅडीएटर'मधील भव्यता ही बव्हंशी तंत्राधिष्ठित आहे. कॉम्प्युटर ग्राफिक्सच्या आधाराने ही भव्यता खुलवण्यात आलेली आहे. पण ३०-४० वर्षांपूर्वीच्या बेनहर, टेन कमांडमेन्टस्, ब्रीज ऑन द रिव्हर क्वाय, लॉरेन्स ऑफ अरेबिया, चेंगीजखान, क्लिओपात्रा किंवा बॅटलफिल्ड, टेल ऑफ टू सिटीज्, व्हेअर इगल्स डेअरसारख्या कितीतरी युध्दपटांमधील भव्यता ही मानवनिर्मित होती. त्यामुळे त्यांचे महत्त्व अधिक वाढते.

लाघवी प्रेमकथेची किनार लाभल्यामुळे आणि लिओनार्डो डि कॅप्रिओ-केट विन्स्लेट या पाहताक्षणीच प्रेमात पडावे, अशा जोडीमुळे 'टायटॅनिक' अधिक प्रभावी ठरला. अर्थात त्यामागील जेम्स कॅमेरुनचा विचार आणि मेहनत चित्रपट बघत असताना दिसतेच. परंतु तरीही टायटॅनिक या जलसमाधी घेतलेल्या जहाजावरील चित्रपट म्हणून १९५७ साली निघालेला 'टायटॅनिक' विषयाच्या अधिक जवळ जाणारा वाटतो.

आज तंत्रामध्ये प्रचंड प्रमाणात प्रगती होऊनदेखील बर्याच वेळा त्याची आशयाशी नेमकेपणाने सांगड घातली जात नाही. परिणामी, त्या चित्रपटातील आशय हरवतो आणि मग तो चित्रपट केवळ तंत्राचाच होऊन बसतो. सामान्य प्रेक्षकांचाच नाही, तर अभ्यासपूर्ण (!) नजरेने चित्रपट पाहणार्यांचाही कधीकधी गोंधळ उडतो. खरं तर हा विषय वरवर साधा भासणारा आहे. परंतु चांगल्या दर्जाची अभिरुची घडवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या दृष्टीने हा लेखाजोखा मांडणे, मला आवश्यक वाटते. तंत्राधिष्ठित चित्रपटांच्या प्रभावाने दिपून न जाता त्या पलीकडे आशयविषयाचा विचार करुन पारंपारिक समजात्मकतेला छेद देण्याचा प्रयत्न करताना, या काही गोष्टींचा सकारात्मक विचार व्हावा, एवढीच माफक अपेक्षा आहे. त्यापेक्षा आपण करु तरी काय शकतो ?



सोनाली नवांगुळ

# एका चित्रकाराच्या नजरेतून

**(भारत सरकारच्या फिल्म डिव्हिजनद्वारे प्रस्तुत 'थ्रू द आईज ऑफ पेंटर' हा ख्यातनाम चित्रकार एम.एफ. हुसेन यांनी दिग्दर्शित केलेला व  व्या बर्लिन इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये 'गोल्डन बिअर' सन्मानाचा मानकरी ठरलेला लघुपट. गोव्यातील 'इफ्फी' मध्ये आणि कोल्हापुरातील थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिवलमध्ये हा लघुपट प्रदर्शित करण्यास काही गटांनी विरोध केला. कोणतंही वैर मृत्यूबरोबर संपायला हवं असं आपली संस्कृती सांगते, पण धर्मातल्या अशा गोष्टींचा मूलतत्त्ववाद्यांना नेहमीच विसर का पडतो? धर्म व्यापक होणं शिकवतो की संकुचित होणं? अशी बेकायदेशीर सॅन्सरशीप किती काळ चालणार?)**

काही माणसं भन्नाट असतात, अचाट बुद्धीमान असतात ... इतकी की ती कधी काय करतील, कसं वागतील, दाणकन् काय बोलतील आणि आपल्या कृतीतून रोज कोणते नवे वाद निर्माण करुन ठेवतील काहीच सांगता येत नाही... अशा त्यांच्या वादग्रस्तपणामुळं मग एखादी साधी निखळ कृती त्यांच्याकडून घडली तरी त्यात काही खोट सापडते का हेच सगळे शोधायला लागतात. त्यांच्या प्रत्येक कृतीमागचा अर्थ समजून त्यातलं सौंदर्य, विचार अनुभवावा इतका वेळ तरी कुणाला असतो म्हणा! बरं वेळ नसणं हा काही आपला दोष नाही ना! जगण्याचा वेगच इतका वाढलाय की उरस्फोड होते. राहून जातं चवीचवीनं आस्वाद घेणं आणि मग ती चव इतरांपर्यंत तितक्याच उत्सफूर्तपणे पोहोचवणं!!

चित्रकार एम.एफ.हुसेन यांचं व्यक्तिमत्व हे असंच कलंदर, जिप्सी आणि हो अर्थातच वादग्रस्त! इतर अनेक कलाकारांना कधी ना कधी पडला तसा हुसेननाही सिनेमाध्यमाचा मोह पडलाच होता! हुसेन यांनी दिग्दर्शित केलेल्या 'मीनाक्षी', 'गजगामिनी' या पूर्ण लांबीच्या सिनेमांबद्दल आपल्याला कदाचित माहिती असतं, पण हे माध्यम पहिल्यांदा हाताळून पाह्यचं त्यांनी ठरवलं तेव्हा म्हणजे १९६७ मध्ये त्यांनी एक लघुपट बनवला 'थ्रू द आईज ऑफ पेंटर'

'थ्रू द आईज ऑफ पेंटर' सुरु होतो तेव्हा सगळ्यात आधी हुसेन आपल्यासमोर येतात आणि सांगतात, ''चित्रातून मी जे सांगू पाहात होतो त्यापेक्षा आणखी वेगळ्या प्रकारे मला काही सांगायचं होतं. एकमेकांशी तसा दृश्यात्म किंवा एरवीही काही संबंध नसणारी हलती, चालती-बोलती वेगवेगळी चित्र एकमेकांच्यापुढे ओळीनं लावून त्या सगळ्यातून सलगपणानं काव्यात्म शैलीत काही मांडावं असं मला वाटलं. यातून रोजच्या जगण्यातली लय मला जाणवली!'' त्यांचं बोलणं संपतं तोच एक पाटी झळकते 'नो स्टोरी - इम्प्रेशन्स ऑफ पेंटर हुसेन ॲस ही पासेस थ्रू' आणि मग सुरु होतो एक प्रवास आणि तो घेऊन जातो आपल्याला राजस्थानात. राजस्थानातल्या बुंदी, चितौड, जैसलमेर या ठिकाणची रपेट आपण करतो पण ती हुसेन या गाईडसोबत.. म्हणूनच हा प्रवास बराचसा वेगळा होऊन जातो.

चेहऱ्यावर विशिष्ट वळणं असलेली, राजस्थानी पेहरावातली बाई व पुरुष आधी हुसेनच्या त्या प्रसिद्ध तेज फटकाऱ्यातून समोर येतात आणि मग प्रत्यक्षात! राजस्थानातली गोसंपदा दिसते. मोठाले नक्षीकामानं मढलेले राजवाडे, गवाक्षं, भलेथोरले दरवाजे, लयदार मूर्ती असं सगळं ऐश्वर्य टिपणारा हुसेन यांचा कॅमेरा गल्लीबोळ, त्यातली कौलारु छोटी घरं, रडकी मुलं, वाहाणारी गटार, केरकचऱ्यातून रोजच्या सवयीनं आपापल्या कामावर जाणारे लोक हेही पाहातो. अत्यंत देखणी अशी राजस्थानी चौकोनी बांधीव बावडी कोनाकोनातून न्याहाळताना तित कपडे धुणारी माणसंही पाहायला मिळतात. पाणी भरणाऱ्या बायका, गुरं चारणारे किंवा अन्य कामांमध्ये

गढलेले पुरुष व त्यातली वेगवेगळी लय अनुभवताना मजा येते. वाऱ्यामुळं वाळवंटात तयार झालेली नक्षी दिसतेच पण पायातला पारंपारिक जोडा, छत्री, गाय-बैल, कंदील व स्त्रीपुरुष जोडीचं रेखाटन हे या प्रवासात अधेमधे येत राहातात जणू तिथल्या दैनंदिन जीवनाची ही अविभाज्य प्रतीकं असावीत! एका ठिकाणी एक अत्यंत प्रमाणबद्ध, ऐटबाज हत्ती आपण वरुन पाहात येतो आणि लक्षात येतं की त्याच्या पायात दोरी आहे आणि दोरीला बांधलेली आहे एक शेळी! एका वाड्याच्या प्रवेशद्वाराच्या भिंतीवर दिसतात भलीमोठी चित्रं. त्या चित्रात दोन वाघ हिंस्रपणे खवळून एकमेकांवर गुरकावताहेत व दाराच्या दोन्ही बाजूला द्वारपाल आहेत. त्या दोन पैकी एका द्वारपालाच्या हातात आहे तलवार-भालासदृश काही आयुध आणि दुसऱ्याच्या हातात नळीची लांबसडक बंदूक. आकाशात मुक्तपणे एक जिवंत ससाणा घिरट्या घालतेय या पार्श्वभूमीवर एक खरीखुरी शेळी निवांत, नि:शंक शतपावली घालत फिरते आहे. हुसेन यांची विनोदबुद्धी आणि जगात साधारणपणे काय व कसं घडतं व निराळंही घडू शकतं याबद्दल दिलेली कॉमेंट पाहून हलकेहलके हसू तोंडभर पसरतं!

केवळ  मिनीटं या सगळ्याची सैर करताना या लघुपटात येणारं पार्श्वसंगीत याचा अतूट भाग बनून गेलंय. आंध्र प्रदेशातलं बासरीवादनातलं मोठं नाव पंडीत विजय राघव राव. या लघुपटाला संगीताचा प्रयोगशील साज चढवलेला आहे त्यांनीच. पारंपारिक बासरीवादन नव्या पिढीच्या अंतर्मनापर्यंत पोहोचवण्यासाठी पंडीतजींनी जीवाचं रान केलं. ते काही फक्त बासरीउस्ताद नव्हते तर संगीतज्ज्ञ, कोरियोग्राफर, कवी, कथालेखक या भूमिकाही त्यांनी उत्तम निभावलेल्या होत्या. रसिकांचं दुर्दैव असं की नुकतेच म्हणजे  नोव्हेंबरला  ला ते आपल्याला सोडून गेले. यामुळं रोजच्या जगण्यातल्या प्रत्येक कृतीमध्ये एक वेगळा नाद, ताल असतो हे आपलं बोट धरुन आपल्याला दाखवणाऱ्या हुसेनजी व पंडीत विजय राघव राव या दोघांच्यातल्या मनस्वी कलावंतांना आदरांजली म्हणून व त्यांच्यातल्या रसिकपणाच्या वाटेवर थोडं तरी चालता यावं म्हणून 'थ्रू द आईज ऑफ पेंटर' पाहायला हवाय ...



निलिमा देशपांडे

कधी प्रसिद्ध तर कधी अप्रसिद्ध ...शिक्षण ते कला ...एका पानाचीच छोटीशी ही ई भेट ....**मुलाखत**

# आयुष्यात पॅशन महत्वाची : अनुराधा कुबेर



अनुराधा कुबेर तरुण पिढीमधील प्रसिद्ध गायिका.त्यांनी पंधरा वर्षे भेंडी बझार घराण्याचे पं. टी.डी. जानोरीकर यांच्याकडे शास्त्रोक्त शिक्षण घेऊन गायकीचे सर्व पैलू आत्मसात केले. तसेच, सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक आणि संगीतज्ञ डॉक. अरविंद थत्ते यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली त्यांची वाटचाल सुरु आहे. कसदार आणि परिपक्व आवाज असे वैशिष्ठ्य असणाऱ्या अनुराधाजींचा शास्त्रीय आणि सुगम संगीतात सहज वावर त्यांच्या निपुणतेची साक्ष देतो.मधुर,कमावलेला आणि तीन ही सप्तकात तितक्याच सहजतेने फिरणारा आवाज, त्यांच्या गाण्याचे विशेष आहे.

त्यांनी सवाई गंधर्व महोत्सव, स्वर्ण स्वर प्रतिभा, भेंडी बझार घराणा संमेलन, पं. जितेंद्र अभिषेकी महोत्सव अशा अनेक नामांकित कार्यक्रमात आपले गाणे सादर केले आहे.

**प्रश्न :** आज शास्त्रीय संगीतात आपण जे नाव कमावलं आहे याची सुरुवात कशी झाली?

**उत्तर :** सुरुवात अस म्हणायचं तर,माझ्या आई चा आवाज खूप छान आहे,ती सुंदर गायची ,कदाचित तिथून गाणं माझ्यामध्ये आल असावं.मी साधारण दुसरी किंवा तिसरीत असताना माझ्यातील रिंश्रशपीं ओळखून आई ने गाण्याच्या क्लास ला घातलं.त्या नंतर अकरा -बाराव्या वर्षी गुरु पं. जानोरीकर बुवा यांच्याकडे शास्त्रोक्त शिक्षणाला सुरुवात झाली.

**प्रश्न :** म्हणजे लहानपणापासून च शास्त्रीय गाण्यात करियर करायचं अस ठरवलं होत का?

**उत्तर :** अगदी असंच नाही,परंतु गाण्याची आवड होतीच ,विशेष गोडी हि निर्माण झाली होती,म्हणून इंग्लिश मध्ये इअ केल्यानंतर संगीतात च अ करायचं ठरवलं.त्याप्रमाणे ड छ ऊ ढ मधून संगीतात च अ केला.

**प्रश्न :** शास्त्रीय संगीतात करियर करू इच्छिणाऱ्या तरुण पिढीसाठी काय सांगाल?

**उत्तर :** मुळात शास्त्रीय संगीतात काय किंवा आणखीही कुठल्या क्षेत्रात करियर करायचं म्हटलं तर रीीळेप हवीच ,फक्त रिंश्रशपीं असून चालत नाही.

जीींश्रळशिी नावाचं पुस्तक साध्या वाचतेय त्यांच्या म्हणण्य नुसार कुठल्या ही गोष्टीसाठी तुम्ही दहा हजार तास वेळ द्याल तर तुम्हाला त्यावर प्रभुत्व मिळवण अवघड नाही.म्हणजे साधारणपणे रोज आठ तास ;या प्रमाणे साडे तीन वर्ष.म्हणजे काय समर्पित भावनेने जेव्हा तुम्ही एखाद्या ध्येयासाठी काम करता तेह्वा अशक्य अस

काहीच नसत.अर्थात ,कार्यामाग्नाते बरोबर सातत्य ही सुद्धा तितकीच महत्त्वाची गोष्ट आहे.

**प्रश्न :** शास्त्रीय संगीतात 'घराण्याला' विशेष महत्त्व आहे त्या बद्दल काय सांगाल.?
**उत्तर :** घराण्याला महत्त्व आहे अस असण्याच कारण अस कि प्रत्येक घराण्याने काही विशिष्ट गोष्टींचा विचार करून त्याची बांधणी केली आहे,एखाद्या बंदिशी सारखी.म्हणजे रागात जसे काही स्वर वर्ज्य तर काही विशेष महत्त्वाचे ..वर्ज्य म्हणजे वाईट किंवा चुकीचे अस कधीच नसत,बरोबर न!.थोडस असंच या घराण्यांबद्दल म्हणता येईल.
अर्थात ,आजकाल अशी limitations आपण मानत नाही.तरी हि आमच्या भेंडीबाजार घराण्याच वैशिष्ट्य म्हणजे स्वर,लय आणि शब्दांचा सुरेल संगम आहे.या घराण्याच्या बंदिशी फार छान आहेत.

**प्रश्न :** गाणं शिकताना कोणत्या घराण्याच शिकावं,किंवा त्याबद्दल काही?
**उत्तर :** अस नक्की सांगण अवघड आहे....आई-वडिलांना जर गाण्याची जाण असेल तर ते या बाबत नक्कीच निर्णय घेवू शकतात.पण मला वाटत क मुख्यत : एखाद्या गायकाची गायकी आवडल्याने त्यांच्याकडे शिकलं जात.

**प्रश्न :** आज टि.व्ही.वर चालणाऱ्या रियालिटी शोज बद्दल आपलं मत काय आहे?
**उत्तर :** रियालिटी शोजचा 'दर्जा' लक्षात घेता,त्यात खर किती आणि managed किती हा प्रश्न उरतोच.आपण अश्या शोज मध्ये जेवा भाग घेतो तेव्हा तो आपलं वैयक्तिक निर्णय असतो.अशा वेळी तिथे मेडियाचा मार्केटिंगचा भाग म्हणू किंवा TRP साठी असणारी धडपड म्हणू,accept केल्यासारखी असते ,तेव्हा त्यांना दोष देण्यात काहीच अर्थ नाही,अस मला वाटत.अर्थात ,stage मिळण्यासाठी अस कराव लागत -वगैरे; मी तेच म्हणतेय कि personal desison आहे. त्याच बरोबर दुसर अस क -मघाशी तू म्हणालीस कि काही वेळा 'निर्णयाच' स्वागत होत नाही,depression येत....दुखावलं जाण्याची शक्यता असते.या बाबतीत मी म्हणेन कि अशा गोष्टींचा माध्यमाला काहीच फरक पडत नसतो,आणि आपणच स्वखुशीने या स्पर्धांमध्ये सहभागी झालेलो असतो ,अश्यावेळी असेल तो निर्णय मान्य करून पुढे जात राहाण चांगल.करियर तेवढ्याने सुरु ही होत नाही आणि संपत ही नाही.

**प्रश्न :** शास्त्रीय संगीत गाताना 'रियाजाची ' आणि 'नवनिर्मितीची ' सांगड कशी घालता येईल?
**उत्तर :** रियाजामुळे 'mastery ' येते.रियाजाला पर्याय नाही हे मी नव्याने सांगायची आवश्यकता नाही .'creativity ' वगळता technical aspects ,VmZoMm speed ,लयीची जाण,लयीवरच प्रभुत्व रियाजाने mechanise करता येत.asthetically मांडणी ही त्या त्या वेळची गोष्ट आहे.त्या त्या वेळच improvisation %पैकी %खरच नवनिर्मिती असते. therwise , %तसंच असत. नशीब वगैरे अस काही मला या बाबतीत वाटत नाही.हं,पण मांडणी बरेचदा 'माहौल' वर अवलंबून असते.

**प्रश्न :** आज या क्षेत्रात करियर करू इच्छिणाऱ्या तरुणाईला काय सांगाल?
**उत्तर :** Don 't make permanant desicions for temporary emotions . माझ तरी परखड म्हणण आहे कि family चा पूर्ण पाठींबा असेल तरच या क्षेत्रात या.कारण यासाठी पूर्ण वेळ देता येण खूप महत्त्वाची गोष्ट आहे. exeptional case मधेच चमत्कार वगैरे घडत असतात,त्याची वाट पाहू नका. कष्टाला पर्याय कधीच नव्हता ,नाही,नसेल.मुख्य म्हणजे ,गुरुंबद्दल आदर,श्रद्धा,विश्वास या गोष्टी तुम्हाला ध्येयापर्यंत पोहोचायला पथदर्शक ठरतात.

**प्रश्न :** 'रागमाला'या आपल्या संगीत अकादमीची ओळख आम्हाला करून देताना काय सांगाल?

**उत्तर :**'रागमाला'-acadami of hindustani classical music अस आमच्या या आकादमीच नुकतंच नामकरण झालेलं आहे.गेली - वर्ष मी शिकवतेय.सध्या - जण इथे शिकत आहेत. तसच,परदेशात असणाऱ्या इच्छुकांसाठी मी online ही शिकवतेय.अशी जण शिकत आहेत.आमचा 'गुरुपौर्णिमेचा' कार्यक्रम उत्साहात होतो,सगळ्यांना वर्षभर शिकलेलं इथे 'दाखवून' देता येत!

**प्रश्न :** शास्त्रीय संगीतासाठी काहीतरी वेगळा प्रयोग करायची इच्छा आहे अस म्हणालात,त्याबद्दल थोडस?

**उत्तर :** हो, मनापासून अस वाटत ,त्यासाठी माझ्या आजोबांच्या शंभराव्या जयंती निमित्त; सुमिरन' म्हणून एक कार्यक्रम सुरु केला आहे,तो असंच दरवर्षी करण्याची इच्छा आहे.या वर्षी, Dr.अरविंद थत्ते ,हार्मोनियम - वादक आणि संगीतज्ञ यांचा कार्यक्रम आयोजित केला होता.

शास्त्रीय संगीताची workshops मुख्यतः याची आवड निर्माण व्हावी हा या मागे हेतू आहे.लहान मुलांसाठी सुद्धा या प्रकारची workshops करण्याच मनात आहे.



विद्यासागर अध्यापक

# ‘ए लॉट कॅन हॅपन’

**(कॉलेज कॅन्टीन. सॅम उर्फ समीर बसलेला. सॅम थर्ड इअर इंजनिअरिंगला विद्यार्थी आहे. कॅन्टीनमधले लोकांचे बोलण्याचे आवाज. जवळून जाणाऱ्या निरनिराळ्या गाड्यांचे आणि रस्त्याच्या रहदारी आवाज. त्यातच कॅन्टीनमध्ये वाजत असलेला खरखरणारा रेडीओ. अंजली प्रवेश करते. कॅन्टीनमध्ये इकडे तिकडे पाहू लागते. परत जाऊ लागते.)**

सॅमः हे.... तुम्ही.. सेकंड इअर इंजिनिअरिंगला नां ?

अंजली :हो.. तुम्हाला कसं काय माहिती ?

सॅम :असंच. तुम्ही तुमच्या क्लासमधली शिल्पा आहे इथं कॅन्टीनमध्ये आहे का हे बघायला आला असाल नां ?

अंजली :हो..पण तुम्हाला कसं माहित ?

सॅम :असंच... बसा नां....

अंजली:नाही.... मी...मी जाते....

सॅम :अहो, तळपदे सरांचा पिरिएड चालू आहे नां ? तुम्हाला वर्गात नसेल घेतलं उशीरा आल्यामुळे...कुठं जाणार?...बसा....

अंजली:कमाल आहे...तुम्हाला माझ्याबद्दल इतकं कसं काय माहित ? मला तर तुमचं नावसुद्धा माहित नाही...

सॅम :( हसून ) ठिक आहे बसा....

अंजली :अं...नाही..नको...

सॅम :अनोळखी माणसासमोर कसं बसायचं हेच असंच नां ?

अंजली :अं...अगदीच काही तसं नाही...

सॅम :बसमध्ये बसता नां कुठल्याही प्रवाश्याच्या शेजारी ?

अंजली :पण मिस्टर हे कॅन्टीन आहे.

सॅम :तेच म्हणतोय. अगदी बसमध्ये बसल्यासारखं माझ्या शेजारी नका बसू...पण समोर बसलात तरी चालेल....

अंजली :पण कोण तुम्ही.... मला तुमच्याबद्दल काहीच नाही माहित..आणि...

सॅम :पण मला माहिती आहे नां तुमच्याबद्दल एवढी...

अंजली :तेच म्हणतेय मी..तुम्हाला एवढं कसं माहित माझ्याबद्दल...

सॅम :कसं माहित ? तुमच्याबद्दल मला एवढं सगळं माहित आहे. अजूनही मला तुमच्याबद्दल खुप काही माहिती आहे जे तुम्हाला अजून माहिती नाही... एक लंबी स्टोरी आहे ह्या सगळ्यामागे...

अंजली:काय ? कसं काय ?

सॅम :बसा... ( अंजली बसते ) चहा कि कॉफी ?
अंजली :काही नको...माझ्याबद्दलची तुमची ती लंबी स्टोरी सांगा...मी काही न घेताच ऐकते.
सॅम :असं नाही चालणार...शिवाय इथं काहीतरी चहा, कॉफी घ्यायलाच लागतं नाहीतर तो काऊंटरवरचा मालक मारकुट्या नजरेन बघत राहिल
आपल्याकडे...
अंजली :कॉफी सांगा...
सॅम :( वेटर )मित्रा... एक कॉफी. स्पेशल...
अंजली :( उत्सुकतनं ) सांगा...माझ्याबद्दल तुम्हाला इतकी कशी काय माहिती ? आणि तुमची ती माझ्याबद्दलची लंबी स्टोरी ?
सॅम :खरं म्हणजे...खरं म्हणजे... तुमच्या बद्दलची लंबी स्टोरी वगैरे काही नाही....
अंजली :म्हणजे ?
सॅम :काही नाही हो...तुम्ही बोलावत माझ्याशी दोनचार मिनिटं म्हणून थाप मारली मी...मला तुमचं नाव...तुमचं इअर आणि तुम्ही शिल्पाबरोबर असता एवढं सोडलं तर काही माहिती नाही...
अंजली :( चमकून ) काय ?
सॅम :अं...सॉरी...गंमत केली तुमची....
अंजली :यू...शीट....मी जाते..
सॅम :अहो, ..जाऊ नका...कॉफीची ऑर्डर दिलीय....
अंजली :त्या वेटरला माझ्या जागी बसवून प्या त्याच्याबरोबर...त्याच्याबद्दलपण तुम्हाला थोडीफार माहिती असेलच नां ?
सॅम :अहो, अंजली...जाऊ नका....एक मिनिट...ऐका माझं....
अंजली :सॉरी...
सॅम :अहो, ऐका तर...मी तुम्हाला तुमच्याबद्दल माहिती आहे असं म्हटलं म्हणून तुमची उत्सुकता चाळवली गेली... आणि तुमच्या आता लक्षात आलं कि मला काहीच माहिती नाही तुमच्याबद्दल...बरोबर आहे नां ? स्वतः बद्दल बोलण्यात नेहमी आपल्या इंटरेस्ट असतो....असतो कि नाही ?
अंजली :हं....तुमचं नावं ?
सॅम :तुझं म्हणा...सॅम...समीर...सगळे सॅम म्हणतात. मलाही सॅमच म्हटलेलं आवडतं. आता बघा...तुम्ही माझं नावसुद्धा विचारलं नाहीत आत्तापर्यंत...खरं म्हणजे...आपला फक्त आपल्यातच इंटरेस्ट असतो...
अंजली :हं....बरोबर आहे सॅम...
सॅमःबसा नां...
अंजली :( बसत ) मलाही अंजलीच म्हण. खरं म्हणजे...खरं म्हणजे तु खुप इंटरेस्टींग बोलतोस.
सॅम : t...hankr..
अंजली : कुठल्या इअरला ?
सॅम :थर्ड इअर...पण सध्या इअर डाऊन आहे माझं...
अंजली :काय ? पण मग इथं काय करतोयस ?
सॅम :मी बऱ्याचवेळा इथंच असतो...घरात गेलं कि आमचं थर्ड इअर राहिल्यामुळे बापाची थर्ड डिग्री ट्रिटमेंट सुरु होते...त्यामुळे बऱ्याचवेळा वास्तव्य इथंच.
अंजली :कमाल आहे...तुझ्याकडे बघून वाटत नाही....तुझं इअर डाऊन असेलसं...
सॅम :हं...आहे खरं...
अंजलीःअभ्यास पुरा नाही झाला ?

सॅम :नाही...केलाच नाही मी..

अंजली :आं ? म्हणजे...

सॅम :खरं सांगायचं तर  ळ रा लेपर्षीशिव... मी जे शिकतोय तेच मला शिकायचंय का ? असाच प्रश्ण पडतो मला नेहमी अंजली....पुस्तकं बघीतली कि वाटतं केव्हा वाचणार हे सगळं ? ते वाचून काही कळणार का ? कळून काही उपयोग होणार का आयुष्यात ? त्यात आपलं करिअर होणार का ? का कर्ज काढून लोकं मटका लावतात तसं करतोय मी माझ्या आयुष्याचसुद्धा ? इंजिनिअरिंगला अॅडमिशन घेऊन ?

अंजली:कुे ाराश? मलाही असंच वाटतं अरे...हे सगळं शिकून करिअर करायचं का ? ते होईल का ? कि पुढेमागे लग्न झाल्यावर काही करता येणार नाही आपल्याला...वाया जाईल शिकलेलं ? आणि आपण नक्की काय करायचं ?

सॅम :कॉफी प्यायची....

अंजली :आं ?

सॅम :कॉफी पी...थंड होईल ती आपल्यासारखी....

अंजली: funny !( कॉफी घेत ) पण मस्त वाटलं तुझ्याशी बोलून...

सॅम :मलाही....

अंजली :मला आज वेळ झाला यायला... लेक्चर चुकलं....पण चुकू देत...तुझ्याशी बोलता तर आलं...

सॅम :हं...चुकू देत... मला तर कंटाळा येतो ही लेक्चरचा...जो उठतो तो आपल्यालाच लेक्चर देत सुटतो च्यायला... आणि आपल्याला लेक्चर देणाऱ्यासुद्धा काही पुर्ण कळतं असतं असं नाही... पण तो झोडत असतो आपल्यासमोर स्वतः ज्ञानेश्वर असल्यासारखं. बरं पुर्ण लेक्चर दिल्यावर समाधीही घेत नाहीत ज्ञानेश्वरांसारखी...ती आपल्यालाच घ्यायला लागते... ( अंजली हसत सुटते. )

अंजली :कुठे रहातोस ?

सॅम :तुरुंगात...

अंजली:आं ?

सॅम :म्हणजे घरात...आईबाबांबरोबर.

अंजली :तु एकटा? का भाऊबहिण पण आहेत ?

सॅम :नाही...एकटाच... आई घरातच असते. बाप न्युरोसर्जन आहे. बापाच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्या षळशश्रव मधला तो बाप आहे फक्त त्याला माझ्या मेंदूतला बिघाड दुरुस्त करता येत नाहीये... त्याचं शास्त्र पराभुत करणारा मी जगातला एकमेव पेशंट आहे. त्याच्यामते...

अंजली :तु वडिलांना चक्क बाप म्हणतोस ?

सॅम :नाही. त्याच्या माघारी बाप.  तो समोर आला कि डॅड. पण मला वाटतं डॅड या शब्दानं मॅड या शब्दाच्या पाठोपाठच जन्म घेतला असावा या जगात. मला काय वाटतं ते कळतंच नाही त्याला.... गरजाच समजत नाहीत त्याला माझ्या...पॉकिटमनीसुद्धा नाही देत ही इअर डाऊन असल्यामुळे...

अंजली :खरंय...अगदी तुझ्यासारखं नाही पण माझ्याही बाबतीत बरचसं असंच होत. घरात गेल्यावर आई सगळं विचारते ....कॉलेजमध्ये गेल्यावर काय काय केलं ? दोन लेक्चरच्या मध्ये काय केलं ? कुणाकुणाशी बोलले ? काय काय बोलले ? सगळं विचारते. सी.बी. आय. इन्व्हेस्टिगेशन. मुलगी नां ? कुठे पाय वाकडा पडला तर ? त्यामुळे सातच्या आत घरात....भाऊरावांना मात्र त्यातून सूट पुरुष असल्यामुळे. ते घरात रात्री बारा वाजता उगवले तरी चालत.  राग येतो मला नेहमी या सगळ्याचा. एनी वे...कुछ नही कर सकते... आज लेक्चर बंक केलं हिसुद्धा माहिती आई कुठून तरी मिळवेल आणि सुरु करेल इन्व्हेस्टिगेशन...

सॅम :म्हणूनच तुरुंग म्हणालो घराला मघाशी..आईबाप इन्स्पेक्टर आपण कैदी. जन्मठेपेचे.... च्यायला घालावेत कशाला कैदी जन्माला जन्मठेपच द्यायची तर ? त्यांना स्वातंत्र्य द्यायचं नसेल तर ? जाऊ दे असले प्रश्ण

नाही बोलून सुटतं. बरं त्यांच वयही नसतं स्वभाव बदलण्याचं. अर्थात हेही त्यांचच मत असतं. आपलं मात्र स्वभाव बदलण्याचं वय असतं त्यांच्या म्हणण्याप्रमाणे.

अंजली :हं....एनी वे... निघायला हवं मला... पण खुप बरं वाटलं तुझ्याशी बोलून... थँक्स... चलते....

सॅमःओके.... सी यू....

अंजलीःएक...एक....एक...मिनिट....बील मी देते..

सॅम :नाही...नाही...मी देणार. अगं मी म्हणालो नां तुला कॉफी घे म्हणून...

अंजलीःनाही....पण आता हे बील मात्र माझ्याकडून... वेटर...बील घ्या....

सॅमः( जोरात ) येस.... थँक्यु अंजली....

अंजलीःका ? काय झालं ?

सॅम :आता सांगायला हरकत नाही. आमची मित्रांची पैज लागलीय. अनोळखी मुलींकडून मी त्यांच्या पैशानं चहा कॉफी प्यायची. पाच मुलींच टारगेट होतं. तु पाचवी. थँक्स अ लॉट.... माझ्या फालतू आत्मचरित्राची फालतू टेप ऐकणारी तु पाचवी कस्टमर. थँक्स...वाटलं होतं...कदाचित काहितरी खायला पण घालशील...पण जाऊ दे. कॉफीचं बिल दिलंस ते पुरे. पहिल्या दोघी तर एवढ्या मस्त मैत्रिणी झाल्या चक्क मला पिक्चरला घेऊन गेल्या त्यांच्या पैशानं. बघ...तुही विचार कर मला पिक्चरला घेऊन जायचा...मोकळाच असतो मी सध्या.

अंजली :( चिडून ) काय ?



लक्ष्मीकांत देशमुख

पाणी पाणी, इन्किलाब विरुद्ध जिहाद अशा प्रसिद्ध कादंबऱ्या आणि 'भारतीय प्रशासनाची बखर ' सारखी अभ्यासपुर्ण पुस्तके लिहिणाऱ्या देशमुखांची नवी कादंबरी

# आजची तरुणाई

**एक**

**मुंबई एअरपोर्ट-मध्यरात्र .**

मुंबईचं आंतरराष्ट्रीय विमानतळ. वेळ मध्यरात्रीची.

व्हि.आय.पी. लाऊंजमध्ये संजय ए.सी. च्या थंडगार हवेत शांत बसुन ब्लॅकबेरीवर ईमेल चेक करीत आहे. मन एक्साईट झालेलं. बराचसा आनंद आणि हातातुन निसटुन गेलेल्या पंधरा वर्षामधील कालखंडाच्या कडु-गोड आठवणीनं मन ढवळून निघत आहे. एक कसली तरी हुरहूर जाणवत आहे. बालपणीचं कांही तरी हरवल्याची सल ठसठसतेय. पंधरा वर्षापूर्वीचं मराठवाडयातलं सेलू गांव आठवतंय. तेंव्हा मॅट्रीकला असलेली चाळीस जणांची बॅच. दहा बारा मुली-बाकीची मुले. छोटं शहरवजा मोठं गांव, त्यामुळे घट्ट मैत्रीचे बंध होते.

मागील पंधरा वर्षात पुलाखालुन बरंच पाणी वाहुन गेलंय. संजयच्या मनात भावनांची-विचारांची असंख्य वर्तुळ उमटत आहेत. किती बदल झाला आहे. एकूण आयुष्यच एवढं वेगवान झालं आहे की, पंधरा वर्षे म्हणजे पंधरा दशके वाटावीत. १९९७ ते २०१२ या कालखंडात केवळ देश-राज्य नांही तर अगदी लहान गांवही बदलली. एक अपूर्व असं संक्रमण चालू आहे, त्यात अवघी तरुणाई घुसळून निघत आहे.

त्या सा-यांना पुन्हा एकदा आज-उद्या एकत्र आणायचं आहे. त्याचसाठी संजयचा प्रयत्न आहे. गेली पंधरा दिवस सा-यांशी संपर्क साधतो आहे. कांहीना एक नाही अनेकवार ई-मेल टाकुन झाले आहेत. चार-सहा जणांना निरोप गेलेत. काही जणांशी अद्याप संपर्क झालेला नाही. फेसबुकवर 'सेलू मॅट्रिक बॅच-१९८०' असा अकाऊंट पण ओपन केलाय.

संजय पुन्हा पुन्हा ई-मेल आल्याची रिंगटोन वाजताच ब्लॅकबेरी पहात आहे.

पंधर-सोळा वर्षापूर्वी मॅट्रीकला असणा-या सर्व मित्र-मैत्रिणींना २०१२ मध्ये एकत्र आणण्याची कल्पना मनोहरची. त्याचा तीन आठवड्यापुर्वीच ई-मेल आला, जो संजयनं किती वेळा तरी वाचला होता.

**दोन**

**मनोहरचा ई-मेल**

माय डिअर संजय,

मी महिनाभरासाठी इंडियात येतोय. ब-याच वर्षानी. त्यावेळी सर्वप्रथम तूं भेटायला हवास. कडकडुन मिठी

मारुन यारी- दोस्तान्याला उजाळा द्यायचा आहे. केवळ चॅटिंगवर समाधान नाही यार !

मुंबईतील तीन-चार सेलूकर मित्र सोडले तर मॅट्रिकचे आपले मित्र- मैत्रिणी कुठे आहेत हे मला माहीत नाही. पण त्या सा-यांना भेटावसं वाटतंय. तू पत्रकार आहेस, पूर्ण महाराष्ट्रात फिरत असतोस. मराठवाड्यात आपल्या सेलुला अधुन मधून जात पण असशील. तुला आपले सर्व शाळकरी मित्र- मैत्रिणी कुठेकुठे आहेत याची माहिती असेल असे मी गृहीत धरतो. त्या सा-यांना एकत्र आणता येईल का  चार  दिवस धमाल करायला? निमित्त माझ्या लग्नाचं. भारतात मुंबईत ताज हॉटेल मध्ये लग्न होणार आहे. माझा वुड बी फादर इन लॉ फिल्दी रिच आहे  इ्या सारखांच. तो फिल्म इंडस्ट्रितला एक मोठा फायनान्सर  आहे. त्याला माझं व मिठुचं (माझ्या होणा-या बायकोचं पेट नांव आहे. ते मला ही आवडतंय. कारण मी मनोहर मराठे-ती मिठु माखिजा.) लग्न ग्रँड फिल्मी स्टाईलनं करायचं आहे. मी ते मान्य केलं आहे. मॅट्रीकला असताना आपण 'हम आपके है कौन' सिनेमा किती वेळा तरी पाहीला होता. तसंच लग्न होणार आहे माझं. बाय द वे, त्या सिनेमाचा एक फायनान्सर माझा होणारा सासरा होता.

संजय, माझ्या मित्रा, तुला नवल वाटतंय ना ? समाज प्रबोधिनीच्या वर्गात जाणारे आपण. तो साधेपणा व ध्येयवाद आजही तु जपला आहेस. मी मात्र त्यापासुन  कोसो मैल दुर आलोय.

बोस्टनला मी एका ग्लोबल फिनान्शीयल कंपनीचा डिरेक्टर आहे. समाजवादी व डाव्या कम्युनिस्ट भाषेत सांगायचं झालं तर विकृत उपभोगात लोळतो आहे. मी भारताच्या आर्थिक उदारीकरणाचं प्रोडक्ट आहे- सेंट परसेंट कंझुमरिस्ट... नो रिग्रेटसं यार. पण आचार्यांची आठवण आली की लाज वाटते, मन हळुवार होतं. त्यावर उतारा म्हणुन मी भारतात गरीब मुलांसाठी काम करणा-या संस्थांना चॅरिटी म्हणुन भला मोठा डॉलर्सचा चेक पाठवतो....पण ही तात्पुरती मलमपट्टी.  तेंव्हाचे आदर्शवादी संस्कार मला नित्य नियमानं छळत असतात.

लेट इट बी. मी आय- पॅडच्या की बोर्डवर बोटं फिरविताना थोडा भरकटलोय. कारण मन सैरभैर झालंय. मला मीनलची आठवण येतेय. तिला मी मिठूशी जुळण्यापूर्वी तीन महिन्यापूर्वी लग्नाचं विचारलं होत, पण नकार दिला तिनं स्पष्टपणे. तिचं बरोबरंच आहे. त्यावेळी दहा वर्षापूर्वी करीअरच्या नशेत तिचं प्रेम ठोकरुन मी अमेरिकेत निघुन आलो...

या पाच वर्षात डिव्होर्स झाल्यावर दोन वेळी लिव्ह इन रिलेशनशिप मधुन गेलो. सध्या ज्युलिया बरोबर आहे. बट नो स्ट्रिंग्ज अटॅच्ड. ती टिपीकल आजच्या काळातील मॉर्डन अमेरिकन तरुणी आहे. करिअरीस्ट.  मेन-वुमन इक्वॉलिटीवर विश्वास ठेवणारी. मला तशी ती आवडते. पण तरीही कुठेतरी मनांत टीपीकल समर्पणशील भारतीय स्त्री मला पत्नी म्हणुन हवीय. त्यामुळेच रितसर दाखवून घेऊन कांदेपोहे नाहीतर बरिस्ता मध्ये कॉफी- सँडविच खाऊन पसंदी देऊन मिठुशी माझं अरेंज्ड मॅरेज ठरलंय.

त्यावेळी मला आपल्या मॅट्रिकच्या सेलुच्या सर्व वर्ग मित्र- मैत्रिणींना बोलवायचंय. ही कल्पना जेंव्हा मला सुचली ना तेंव्हा मी फार फार एक्साईट झालो होतो संजय. आता ई-मेल वर लिहितानाही तेवढीच उत्कंठा जाणवतेय. असं वाटतं की, आपले रुट आजही गावांत रुजलेले आहेत. स्ट्राँग  इंटॅक्ट ! ते रुट्स डिमांड करतात की मला  मेरे अपने दोस्त  भेटायला हवेत.....मैत्रिणी पण.  हंसलास ?  तेंव्हा आपण किती भोट होतो.  वर्ग मैत्रिणींशी नोटस् एक्सचेंज करतानाही किती घामाघुम व्हायचो आपण...

आपल्या सेलूच्या आपल्या सोबत मॅट्रीकला १९९७ मध्ये असणा-या बॅचच्या पूर्ण चाळीस मित्र- मैत्रिणींना तू माझ्या वतीनं इनव्हाईट कर ! मी पत्रिका 'ई करतो, ती छापून सर्वांना पाठव. सर्वांची वन विकची रहायची व्यवस्था ताज मध्ये केली आहे. मिठुच्या बापानं त्यासाठी तीस सुट बुक केले आहेत. सर्वांना एकत्र कर लग्नापूर्वी तीन दिवस व नंतर दोन दिवस आपण शक्य असेल तर एकत्र राहुन धमाल करु या. ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनी बायकांसह यावं. धमाल फॅमिली गेट टुगेदर करु या !

एकेकांची नाव आठवताहेत, चेहरे नजरेसमोर येताहेत- त्या निरागस कोवळ्या वयातले. तारुण्याच्या

उंबरठ्यावरचे.  जेंव्हा त्यांना भेटेन तेंव्हा  ते मला ओळखु येतील का?

मी सा-यांना भेटायला फार अधीरतोय. तूं सा-यांना एकत्र आणणार ना माझ्यासाठी?

वेटिंग फॉर रिस्पॉन्स...

युवर फ्रेंड.

मनोहर मराठे.

**तीन**

## मीनलच्या सुप्त मनातली हिरवी पालवी

संजयनं इतर सा-यां मित्र- मैत्रिणीं प्रमाणे मीनलला पण ई-मेल कला होता,

‘खरं तर तुला ई-मेल करावा की नाही या संभ्रमात मी होतो, आहे. पण, मनोहरनं आवर्जुन तुझी आठवण केलीय, म्हणुन त्याच्या विवाहाचं आमंत्रण देतोय. सातारा काही फार दुर नाही. तु खरंच ये. त्याच्यासाठी नाहीतर किमान माझ्यासाठी. स्वाती- माझी बायको पण येतेय औरंगाबादहुन सुट्टी काढुन. तिलाही तुला भेटायचं आहे . तु सध्या ज्या फेजमधुन जात आहेस, त्यामधुन थोडी सुटका. जरासा चेंज. येशील ना ?

तिच्या शिस्तशीर स्वभावाप्रमाणे चोवीस तासाच्या आत उत्तराचा ई-मेल आला. त्यात तिनं लिहलं होतं,‘या पांच वर्षात इतकं काही पाहिलं, सोसलं आहे की, मनोहरच्या तेंव्हांच्या वागण्याचं  प्रेम ठोकरुन परदेशी जाण्याचं, आज या क्षणी काही वाटत नाही. काळा बरोबर आलेल्या अनुभवांन मन बोथटलंय.

तरी मनांत कुठे तरी खोलवर मनोहरला भेटण्याची उर्मी आजही जिवंत आहे. याचं नवल वाटतंय. कदाचित पहिलं नवथर कोवळं प्रेम अंर्तयामी आजही हिरवं आहे.

तीन महिन्यापूर्वी त्यानं मला पुन्हा विचारलं होतं, पण एन.आर.आय. इंडियनची पत्नी म्हणुन अमेरीकेत शोभेची बाहुली म्हणुन मला मिरवण्यात काही स्वारस्य नाही. आज मी कांचनताईची सहकारी म्हणून, गेली दोन वर्षे ‘स्वयंसिध्दाच्या’ कामात झोकून देऊन काम करते आहे, त्यात मनस्वी समाधान आहे.

तीन वर्षापुर्वी विसंवादी संसार बंधन तोडून बाहेर पडले, तेव्हा पासून, पुरुष जातीपासून लांब आहे.  महिला बचत गटात काम करताना स्वतःला झोकुन दिलं आहे.  त्यामुळे कुणाची आठवण काढायला वेळ कुठं आहे ?

आताशी मला पुरुष जातीचा उबगच आहे. अपवाद फक्त तूं आहेस संजय. तेंव्हा मनोहर ऐवजी तुझ्या का नाही प्रेमात पडले ? तुम्ही दोघे शाळेतले सर्वांचे माझ्यासकट हिरो होतात. मग माझं मन त्याच्याकडे का झेपावलं? प्रेम आंधळ असतं ना ? खैर, ज्योतीला सांग. निर्धास्त रहा. मी कुणाशीही लग्न करेन पुन्हा असं मला वाटत नाही ...

पण मी लग्नाला येईन. मनोहरला शेवटचं पाहीन आणि मनातली हिरवी पालवी खुडुन टाकेन. मुख्य म्हणजे मलाही पुन्हा सेलू खुणावतंय, सारे  वर्ग मित्र- मैत्रिणी आठवताहेत. मॅट्रिक नंतर पुण्याला फर्ग्युसनला कॉलेज शिक्षण, झालेला अंतरजातीय पण असफल ठरलेला विवाह; त्यातुन बाहेर पडणं आणि साता-याला स्वयंसेवी संस्थेच्या कामात स्वतःला झोकुन देणं.... त्यामुळे तूं वगळता कुणाशी संपर्क राहीला नाही बघ. त्यामुळे मनोहरची त्याच्या दुस-या लग्नाच्या निमित्तानं का होईना सर्वांना एकत्र आणण्याची कल्पना मला फँटॉस्टिक वाटते. त्यामुळे मी चक्क आठवडाभर काम बाजुस सारुन येणार आहे.

एक मनातले सांगते. हसू नकोस किंवा कसलाही अर्थ काढु नकोस. मी कधीच फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये राहीले नाही. एन.जी.ओ. असुनही. कारण परदेशी डोनेशन न घेता काम करणारी आमची संस्था आहे.  ग्रास रुटला काम करणारी. त्यामुळे मनोहरचा सास-याच्या पैशानं ताज मध्ये आठवडाभर राहुन जरा ॲन्जाय करावं

म्हणतेय.

मी कधीच टब बाथ मध्ये स्नान नाही केलं. केवळ हिंदी सिनेमांत पाहिलंय... नाही, मला तुला किंवा मनोहरला सेड्युस करायचं नाहीय बाबा ! नो सेक्स प्लीज, वुई आर इंडियन हे मॉरल इंडियाचं पोकळ सुभाषित मला शिरोधार्थ आहे ... पण जरा अलिशान सुट मध्ये रहावं, मस्त खावं प्यावं (हो मला कधीतरी ड्रिंक्स घ्यायला आवडतं.) आणि लग्नात छानपैकी डिझायनदार साडी घालुन मिरवावं असं वाटतंय....

कांचनताईंना हे कळालं तर मला वेडयात काढतील. पण एवढी सुप्त मनोमन जपलेली इच्छा आहे. मनोहरच्या लग्नाच्या निमित्तानं पुर्ण करुन घ्यायचीय. कारण मी नोंदणी पध्दतीनं तेंव्हा लग्न केलं होतं. साध्या सुती साडीवर. मग पुन्हा आमचं साधं शुचितेचं आख्ख जीवन आहेच की-साधं, निष्कांचन! तर मी येतेय. मनोहरला कळव किंवा हाच मेल त्याला फॉरवर्ड कर. तुझ्या प्रेमात मी तेंव्हा का नाही पडले हे वाचून त्याला जरा कॉम्लेक्स येऊ दे... तेवढीच गंमत. पण तुझ्या बायकोला ज्योतीला फॉरवर्ड केलांस तर बघ हं. गांठ माझ्याशी आहे बच्चमजी !ब

**चार**

**बारीश कभी अच्छी लगती है**

जेव्हा मीनलचा हा मेल संजयनं मध्यरात्री वृतपत्रात रविवार पुरवणीसाठी लेख पाठवुन झोपण्यापूर्वी संवयीनं ई-मेल बॉक्स चेक केला. तेंव्हा वाचला आणि कांहीसा उत्तेजित झाला.

त्याच्या नजरेसमोर सेलू मधली शाळकरी दोन वेण्या घालणारी फ्रॉकमधली गोड मीनल तरळू लागली. त्या काळी पण किती धीट होती. मनोहरवर प्रेम आहे म्हणणारी. तेव्हा आपण मनोमन किती जळायंचो.

वाटायचं, आपल्यात काय कमी आहे मनोहरपेक्षा ?

आज मीनलनं कबुली दिलीय की, तेंव्हा तिला मीही आवडायचो. फक्त ती मनोहरकडे झेपावली एवढंच.

खरंच तेव्हा तसं झालं असतं तर?

संजयच्या मनात आता या क्षणी एअरपोर्टवर मध्यरात्री पुन्हा ती तरल भावना रुंजी घाततेय. मुळच्या रोमँटिक वृत्तीला फुलारीत कुरवाळतेय.

पण तसं कदाचित झालंही नसतं. कारण आपली परिस्थिती व घरच्या जबाबदा-या. मीनल तर मनोहर पाठोपाठ पुण्याला ठरवुन कॉलेज शिक्षणासाठी फर्ग्युसनला गेली. तिथं त्यांचं प्रेम बहरलं. मग आपण मनातुन तिच्या बाबतची ती अस्फुट भावना काढुन टाकली. तिच्याकडे तेंव्हा पासुन एक चांगली सख्खी जिवाभावाची मैत्रिण म्हणुन पहात वागत राहीलो.

मनोहरनं तिचं प्रेम ठोकरुन अमेरिकेला प्रयाण केलं, तेंव्हा आपणच तिला सांवरायचा प्रयत्न केला . तेंव्हा मात्र निखळ मैत्री भासना होती. आपण तेंव्हा ज्योतीशी एंगेजडं होतो. मग लग्न ही झालं.

आज का तो प्रश्न मनात एक अनाम पण उष्ण-गोड भावना निर्माण करीत आहे?

खरंच, माणसाचं मन मोठं अनाकननीय असतं!

पण तिला हा ई-मेल लिहीतांना 'मी तेंव्हा मनोहर ऐवजी का नाही रे तुझ्या प्रेमात पडले?' असं का लिहावसं वाटलं? कुठेतरी ती ही हरवलेल्या प्रेमाच्या आजही शोधात आहे?

संजयला स्वतःच्या मनात उठणा-या या प्रश्नांची गंमत वाटत होती.

ज्योती आणि मीनल...

आज मनाचा कौल निःसंशय ज्योतीच्या बाजुने पडतो आहे.

तरीही मनातली ही हिरवी पालवी तशीच ठेवावी वाटतेय, जसं मीनलनं मनोहर बद्दलची जपुन ठेवली आहे.

'ये कंबख्त दिल फिर क्यो.

वो गुजरे लम्हे याद करता है?

अपने भीतर छीपी

कुछ सोयी, कुछ खोयी

मीठीसी चुभन क्यो जगाता है?

आजकी आपाधापीपे उसे कुछ जगह नही.

सही है, फिरभी,

खट्टी मीठी इमली की तरहा

जिंदगीका स्वाद बढाने की ताकद इसमे तो है.

इस एहसास को क्या नाम दे?

फिर सोचता हुं

नाम देना क्या जरुरी है?

एक हसीन दिलचस्प मोड था जिंदगी का वो

उसे छोडे कई मौसम चले गये!

बेवक्त बारीश कभी कभार अच्छी लगती है

ऐसाही ये एहसास दिल को भाता जरुर है

बस उतनाही-जिसका कोई कल नही.

अरे, ही तर छानपैकी हिंदी नज्म झाली...

किती तरी दिवसांनी मनात सहजतेनं कविता फुलुन आली. संजयनं खिशातली छोटी डायरी काढली आणि ती भराभरा लिहुन काढली.

आणि पुन्हा पुन्हा ती वाचत राहीला. मीनलची याद होतीच, पण ज्योतीचीही होती. मनात एक भावविभोर भावना होती.

'बेवक्त बारीश कभी कभार अच्छी लगती है'

**पाच**

## बॉम्बे स्फोटातला आरोपी अस्लम

नवा एस.एम.एस. आला वाटतं !

संजय विचाराच्या तंद्रीतुन ब्लॅकबेरीमधुन आलेल्या आवाजानं भानावर आला. त्यानं आलेला एस.एम.एस. उघडला.

हिंदीतला मजकुर इंग्रजीतुन कंपोज केला होता.

'भाईजान, मै सायरा. तुम्हारा दोस्त अस्लम की बीबी. मै भी सेलूकी हुं. आपको जानती हुं. मियां अस्लमको मालेगांव बम्ब धमाको पे चार साल पहिले पकडा था, वो बेगुनाह शाबीत हुवे. वो जल्द रिहा हो, इसलिये क्या आप होम मिनीस्टर सागर साब-वो भी तुम्हारे दोस्त है-उन्हे बोल सकते हो? मै भी कल मनोहर भाई के शादीमे बिनबुलाये आ रही हुं-आपके भरोसे.' ओ माय गॉड!

आपण अस्लमला इनव्हाईट केलं नव्हतं. कारण त्याचा कांही ठावठिकाणा नव्हता. सेलूच्या

मॅट्रीकच्या वर्षानंतर त्याचा संपर्कच नव्हता.  बहुधा सायरानं फेसबुक अकाऊंट पाहीलं असणार!

अस्लम मालेगांवच्या बॉम्बस्फोटातला आरोपी होता?

मागच्या महिन्यात कोर्टानं एस.आय.टी.नं पुरावा नसल्याची कबुली दिल्यानंतर त्याच्या सह पांच जणाच्या सुटकेचे आदेश दिले होते!

सायरा आपल्या सेलूचीच आहे, पण तेंव्हा ती कधी भेटली नाही.  कशी भेटणार?  आजही मराठवाडयात मुस्लीमात पडदा पध्दत आहे.  ऋतुमती झाली की मुस्लीम मुलीला गोषा स्वीकारावाच लागतो.

उद्या ती कशी आपल्या सामोरं येईल?

तेंव्हाचा अस्लम आठवतोय.  देखणा, तगडा.  कोवळी दाढी राखणारा.  आपल्या वर्गात तीन चार जणांनाच तेंव्हा मिसरुड फुटल्या होत्या.  त्यात संजय जसा होता, तसा अस्लमही.  पण तेंव्हाही अस्फुट का हाईना तो दाढी राखायचा.  आपली इस्लामिक आयडेंटीटी कटाक्षानं जमायचा.  त्याचे आब्बाजान सेलूच्या एका मशिदीचे मौलवी होते.

अस्लमचं आडनांव काझी होतं.  काझी म्हणजे इस्लाम धर्माचे पंडीत!

तो खरंच दहशतवादाकडे झुकला असेल का?  की त्याला पोलीसांनी खोटया नाटया कारणावरुन संशयित म्हणुन पकडलं?

सागरला सांगुन त्याला लवकर सोडवलं पाहीजे.  त्याचा आपल्याला आपल्या वृत्तपत्रासाठी एक्स्लुझिव्ह इंटरव्यू घेता येईल!

सागर पण मनोहरला रिसिव्ह करण्यासाठी एअरपोर्टवर येतो असं दुपारी मंत्रालयात भेट झाली तेंव्हा म्हणाला होता.

आणि त्याचा एस.एम.एस. आलाच.

'मी एअरपोर्टवर कॅफे कॉफी डे मध्ये आलोय.  तिथं तूं ये.  तुझ्या सोबत मस्तपैकी कोल्ड कॉफी घेऊ व मनोहर येईपर्यंत गप्पा मारु!

## शब्द शलाका



पंकज झरेकर



फोटो: पंकज झरेकर

जंगलाचं एक बरं असतं. नागरतेचे पाश त्याच्या नरड्याला उगाच जाचत नाहीत. सगळाच अकृत्रिम आविष्कार! जंगलाचे नियम हे कलाकारांचे नियम. स्वच्छंदी, सरळ आणि नैसर्गिक. उगाच फुकाची गडबड नको की भांड्याला भांडं वाजणं नको.

गूढ भासणारं जंगल तुम्हाला थेट प्रतिभेच्या एखाद्या लाडक्या अपत्याची आठवण करून दिल्याखेरीज राहत नाही.

जंगलाला संवेदनांची बधिरता येत नाही कधीच. इतकी मुळे, फांद्या, खोडे असल्यावर आपल्या अस्तित्वाचं भान कोणं कसं विसरेल बरं?

काही वेळा या खास राखून ठेवलेल्या असतात. प्रशांत पहाटे ध्यानस्थ बसायची वेळ, अंधूक दिसणाऱ्या क्षितीजाकडे बघत घरी येणाऱ्याच्या गुणांना आठवायची सायंवेळ, घमघमणाऱ्या उत्तररात्रीच्या मदहोशीची वेळ आणि डोईवर सूर्य चढला की काढत्या पायाने खोपटी गाठायची वेळ.

तशीच जंगलाची आळस द्यायची पण एक वेळ असते. प्रातःकाळी किलबिलणाऱ्यांनी अलार्मचं काम चोख बजावलेलं आहे. पूर्वेचा कर्मयोगी दिनकर आपली बाही सरसावून प्रवासाला निघालेला आहे. त्याच्या किरणांनी पानांच्या जाळ्यांना बाजूला सारून एव्हाना जंगलाला गुदगुल्या करायला सुरूवात केली आहे. आता कस्सं सरसरून उठेल हे वन!!

ही घनदाट जाळी म्हणजेच जीवन. ह्या मायेने गुंतलेल्या फांद्या म्हणजेच जीवन. ही धुक्यात विरलेली पर्णराजी म्हणजेच जीवन. आणि एकही शब्द न बोलता कायम आपल्याला खुणावणारं हे जंगल म्हणजेच खरं तर जीवन....

जंगलाची मस्तानी कलंदर वृत्ती पुन्हा कलावंतासारखीच. आता पाचोळा वाजो किंवा घुमोत या कृष्णधवल आसमंताचे श्वास.... जंगल आपल्यामध्येच मस्त रमून राहतं. प्रश्न हा की जंगलभेटीला गेलेल्या तुम्ही-आम्ही पहायचं तरी काय?

**– शब्द : विक्रांत देशमुख**